
# बाईपणाच्या गोष्टी- १

स्वाती पाचपांडे



**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# बाईपणाच्या गोष्टी-१

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

**आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.**

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# बाईपणाच्या गोष्टी-१

लेखिका

## स्वाती किशोर पाचपांडे,

# बाईपणाच्या गोष्टी-१

लेखिका: स्वाती किशोर पाचपांडे,

12, प्रभूनक्षत्र, नवशा गणपती बसस्टॉप, गंगापूर रोड, नाशिक, 422013

व्हाट्सअप्प नंबर 9881274206

swtpachpande@gmail.com

चित्रकार: संतोष पाठक नाशिक :7350983700

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : १५ नोव्हेंबर २०२०(दिवाळी)**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे- आवश्यकआहे.

# सौ. स्वाती किशोर पाचपांडे



**BSc, MBA, MPM, BAMCJ**

**साहित्यभूषण** पदवी
(कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक)

मुक्त विद्यापीठ MBA समन्वयक

छंद-लिखाण, गायन आणि वाचन

स्वाती पाचपांडे सन 2005 पासून नाशिकच्या विविध वृत्तपत्रांमधून सातत्याने सदरलेखन करत आहे तसेच 2007 पासून नाशिक आकाशवाणीवर रानजाईचे संवादलेखन करत आहेत. स्त्रियांचे भावजीवन उलगडून दाखवणारे त्यांचे सुनंदिनी हे पुस्तक 2018 मध्ये प्रकाशित झाले आहे.. व्यवस्थापन विषयावरील 100 लेख नुकतेच पूर्ण झाले आहेत. त्याच विषयांवर व्याख्याती म्हणून कार्यरत आहेत. आकाशवाणीवर सखी कार्यक्रमात सहभाग असतो.

आजवर अनेक नामांकित मासिके तसेच दिवाळी अंक ह्यातून कथालेखन केले आहे. त्यात माहेर, स्त्री, मिळून साऱ्या जणी, व्यासपीठ इत्यादी अंकांचा सामावेश आहे.

त्या लेवा सखी मंडळ नाशिक पदाधिकारी असून त्या माध्यमातून आजवर विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. बराच काळ त्यांची विशेष कार्यकारी पदावर नेमणूक होती.

त्यांणी नाशिकच्या सावाना माध्यमातून अनेक वाचनप्रेरक उपक्रम घेतले आहेत. कृषीनगर येथील संत ज्ञानेश्वर सार्वजनिक वाचनालयाच्या सांस्कृतिक मंडळावर नियुक्ती झालेली आहे.

14 एप्रिल 2019 रोजी त्यांची दोन पुस्तके, मॅनेज मॅन 1 आणि मॅनेज मॅन 2, प्रकाशित करण्यात आली. दैनंदिन जीवनातील व्यवस्थेवर भाष्य करणारे मार्गदर्शक असे हे पुस्तक आहे. शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थी, शिक्षक ह्यांना उपयुक्त पुस्तक असा गौरव मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू श्री. सुहास पेडणेकर ह्यांनी केला.

# मनोगत..

लेखक हा भावनांशी जखडलेला माणूस असतो आणि मानवी भावभावनांचा गुंता त्याला आपल्या लेखणीद्वारे मोकळा करायचा असतो.. शब्दांच्या साहाय्याने जेव्हा गुंता मोकळा मोकळा होत जातो तेव्हा त्या निर्मितीला आपण साहित्य असे संबोधतो. साहित्याची बीजे त्याला आजूबाजूच्या वातावरणातून मिळत असतात.. काही प्रसंग असे असतात की जे काळजाला भिडतात आणि मग लेखणीतून झरझर उतरतात.

माझ्या प्रासंगिक सदरलेखनाला महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक असलेल्या महाराष्ट्र टाइम्स वृत्तपत्रातून वाव मिळाला आणि ते लिखाण वाचकांच्या मनापर्यंत झिरपत गेले.. वाचकांकडून मला उदंड प्रतिसाद मिळत गेला आणि मीच थक्क झाले.. मी जे शब्दातून मांडत असते अगदी तसेच किंवा थोड्याफार फरकाने वाचकांना देखील वाटत असते अशी जाणीव मला होते. इतकेच की मी ते सगळयांच्या मनातले कागदावर उतरवण्यास यशस्वी झालेली असते. जणू काही माझ्या शब्दांना पंख फुटले आहेत आणि ते त्यांच्यापर्यंत पोहोचले आहेत.. त्याक्षणी वाटले की माझे शब्द माझ्यासाठी संजीवनी ठरले आहेत.. शब्दांनी नाते जोपासली

गेली आहेत.. लिखाणवाचनाने समृद्ध अशी माणसे मी जोडली आहेत.. अशा रितीने लेखातले शब्द मला नेहमीच सन्मान देत गेले.. मग वाटले की ह्या शब्दांना पुस्तकांची छानशी चौकट द्यावी आणि वाचकांना ते लेख एकत्रितरित्या वाचता यावे याच हेतूने पुस्तकाची आखणी केली आहे. महाराष्ट्र टाइम्स वृत्तपत्राने त्यात प्रकाशित झालेल्या लेखांचा संग्रह करण्याची परवानगी देखील दिली.. गेल्या अडोतीस वर्षांपासून पत्रकारितेमध्ये ज्यांचे नाव आदराने घेतले जाते असे महाराष्ट्र टाइम्स नासिक समूहाचे निवासी संपादक श्री.शैलेंद्र तनपुरे यांनी माझ्या शब्दाला मान देत उत्कृष्ट अशी प्रस्तावना देखील लिहून दिली.2005 पासून मी वृत्तपत्रीय सदर लेखन करत असल्याची नोंद त्यांनी घेतली.अत्यंत बहुआयामी व्यक्तिमत्व लाभलेल्या तनपुरेसरांचे मनःपूर्वक आभार मानत आहे. महाराष्ट्र टाइम्स मैफल टीमचे प्रशांत भरवीरकर, अश्विनी पाटील तसेच गायत्री कुलकर्णी ह्यांचे देखील मनःपूर्वक आभार ज्यांच्या माध्यमातून माझे लिखाण सुजाण वाचकांच्या पर्यंत पोहचू शकले आहे.. लिखाणासाठी प्रेरणा देणाऱ्या माझ्या कुटुंबियांचे तसेच आप्तस्नेहीजनांचे देखील मी नेहमीच ऋण मानते.लिखाणासाठी विषय देणाऱ्या सख्यांचे मनापासून आभार..!

माझ्या पुस्तकाचे नाव आहे 'बाईपणाच्या गोष्टी'.. बाईपणाचा पसारा हा नेहमीच अफाट असतो आणि तो शब्दांच्या चिमटीत पकडण्याचा मी प्रयत्न केला आहे.ती तर कुटुंबाचा कणा असते. कुटुंबासाठी कुटुंबाच्या सुखासाठी तिचे सदैव धडपड असते.. त्या बाईचे मन जाणून घेताना आपण थक्क होत जातो.. तिचे भावोत्कट बोलणे खूप काही सांगून जाते आणि त्यातूनच तिचे अंतरंग उलगडत जाते.. ती जसे घर चालवते तसे विमानही चालवू शकते.. काळाची हाक ऐकत तिने आपला वेग वाढवला आहे आणि काळाच्या कसोटीवर स्वतःला सिद्ध केले आहे पण तिच्यातले बाईपण मात्र तेच आहे.. तिचे अंतरंग म्हणजे भावभावनांचे एक सप्तरंगी इंद्रधनू होय.. तिच्या आयुष्यातील विविध नातेसंबधांविषयी तिला नेमके काय वाटते हे जाणून घेणे गरजेचे असते.. तिच्या रोजच्या नेहमीच्या आयुष्यात खूप काही दडलेले असते.. विषय म्हंटले तर तसे अगदी साधे असतात पण ते जगण्यातील महत्त्वपूर्ण विषय असतात मग बाईपणाच्या गोष्टी ह्या जगण्याच्या गोष्टी वाटू लागतात.. तेच सर्व विषय सदरातून उलगडून दाखवले आहेत आणि त्यातूनच माझे हे पुस्तक साकारले आहे.. मला आशा आहे की माझे हे पुस्तक वाचकांच्या पसंतीस उतरणार आहे.

'किताबे करती है बाते बीते जमाने की..

दुनिया की.. इंसानों की.. आज की..

कल की.. एक एक पल की..

खुशियों की.. गमों की..

फुलों की.. जीत की.. हार की..

प्यार की.. मार की.. ' शायर सफदर हाश्मी यांच्या ह्या ओळी मला नेहमीच आवडतात आणि माझे पुस्तकप्रेम अधिकच बहरत जाते.. माझे हे पुस्तक देखील असेच जगण्यावरील भाष्य करणारे आहे.

बदलत्या काळाची हाक ऐकत पुस्तक डिजिटल स्वरूपात आणणाऱ्या ई साहित्य प्रकाशनचे मनःपूर्वक आभार..! ई साहित्य टीमचा हा प्रयत्न नक्कीच स्तुत्य आहे ज्यामुळे माझ्यासारख्या लेखकांना हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे.. त्यांच्या अविरत कार्यास मी शुभेच्छा व्यक्त करत आहे.

# समाजजीवनाचा अलवार परिचय


## शैलेन्द्र तनपुरे

स्वाती पाचपांडे या समाजजीवनातील विविध विषय अलवारपणे मांडणाऱ्या मनस्वी लेखिका आहेत. त्यांच्या लेखनाशी माझा परिचय साधारण पंधरा वर्षांपूर्वी आला. दै. गांवकरीच्या प्रतिमा या महिलांविषयक पुरवणीसाठी त्या लिहित असल्याने प्रथम त्यांच्या लेखनाचा व नंतर त्यांचा परिचय झाला. घर, कुटुंब, नातेसंबंध व त्याभोवती भिरभिरणारा समाज याला केंद्रस्थानी ठेवूनच त्यांनी बव्हंशी लेखन केले आहे. पुढे महाराष्ट्र टाइम्सच्या मैफल पुरवणीतही त्यांनी लेखनसंचार केला. बाईपणाच्या गोष्टी मांडतांना त्यांच्यातील प्रवाहपतीत न होणारी पण तटस्थपणे परस्परसंबंधाकडे पाहणारी व त्यातून सकारात्मक संदेश देणारी लेखिका प्रकर्षाने समोर येते. घराघरातील बारीक सारीक गोष्टींचा आठव त्यांच्या प्रत्येक कथेत येतो, तेव्हा त्यांच्यातील सूक्ष्मदर्शी व्यक्तिमत्वाचा उलगडा होतो. त्यातून त्यांच्या निरीक्षणशक्तीचा तसेच दांडग्या स्मृतीचाही परिचय होतो. सणवार, उत्सव, भांडीकुंडी, साड्या, दागदागिने आदी महिलांच्या जीवाभावाच्या विषयांना त्या हात घालतात तेव्हा ते चित्र एवढं जिवंत वाटायला लागतं की जणू त्या साऱ्या प्रसंगाचे आपण साक्षीदारच आहोत. एवढेच नव्हे तर पुराणातील गोष्टी, इतिहासातील संस्कार

आणि विद्यमान काळ व भविष्यात होणाऱ्या बदलांचा वेध असा सारा आसमंत त्या अलगदपणे उभा करतात. जमिनीशी नातं दृढ ठेवतांनाच आकाशाशीही ते संवादी करण्याचा त्यांचा आग्रह हा इतिहास, वर्तमान व भविष्याला बांधून ठेवणारा सेतू बनून जातो. स्वत: एक महिला असूनही अनेकदा त्या आपल्याच भगिनींच्या दोषांचीही थेटपणे चर्चा करतांना दिसतात, तेव्हा त्यांच्यातील तटस्थपणाचा प्रत्यय येतो. बाईपणाच्या गोष्टी त्या सांगत असल्या तरी त्यात पुरुषांबद्दल दुस्वास नसतो, किंबहूना हा भवसागर तरुन नेण्यासाठी या दोन्ही घटकांमधील संवादाची कशी आवश्यकता आहे, गरज आहे हेच अधोरेखित करण्याचा त्यांचा प्रयत्नही अनेक लेखांमध्ये दिसतो. लेख वा कथा लिहितांना त्या अनेकदा गाजलेले संगीत, चित्रपटातील गाणी, संताच्या रचना, शायरी, गझल असा विविधांगी खजिना उघड करतात तेव्हा त्यांच्या तील अष्टपैलुत्वाचे दर्शन होते. ललित लेखनात त्यांचा हातखंडा आहे. त्यातूनच अलगदपणे पुढे आलेल्या या बाईपणाच्या गोष्टी वाचकांना खिळवून ठेवतील, अशी खात्री आहे. स्वातीताईंना व त्यांच्या या पुस्तकास खुप खुप शुभेच्छा..

शैलेन्द्र तनपुरे

निवासी संपादक, महाराष्ट्र टाइम्स, नाशिक



**अर्पणपत्रिका**

**मोठी झालेली माझी समंजस मुले**

**तन्वी आणि सोहम..**

**ज्यांनी लिहितच जाणाऱ्या आपल्या आईला**

**नेहमीच समजून घेतले**

**आणि सदैव प्रेरणादायी शब्द दिले**

**अशा दोघांना**

**हे पुस्तक प्रेमपूर्वक अर्पण..!**

# अनुक्रम

बाईपणाच्या गोष्टी..
जीवनातील वास्तवता..
तस्मै व्हाट्सअँप देवाय नमः
मी आणि माझे 'स्पेसशीर' नाते..
त्यालाच संस्कार देणे गरजेचे...
पाऊल पाऊल.. ज्याची मनाला चाहूल..
तव मूळ ते शून्य
मन की खिडकी खोल दे जरा..
कप्पायन
आजा निंदिया रानी आजा दूर सितारोंसे..
शब्दावाचून कळले सारे शब्दांच्या पलीकडले..
क्षण निरोपाचा..
भेटी लागी जीवा लागलीसे आस..
बोलू कौतुके..
मुझ को मुझमें रहने दो..
खुशीया ही खुशीया हो दामन मे जिसके..
आगे भी जाने ना तू..
तुम इतना जो मुस्कुरा रहे हो..
मीच माझ्या जीवनाची सारथी ग..
मैत्रं प्रीतीरसायनम
थोडे सहजतेने का नसावे..?
शब्दांवाचून शब्दांपलीकडले..
नवे संकल्प नवे विकल्प..
शेअर ऍण्ड केअर..
नावडतीची कथा...

# 1

# बाईपणाच्या गोष्टी..



सोशल मीडियामुळे दुरावलेले मैत्र नक्कीच जवळ आले आहे.. भूतकाळ त्यामुळे आपल्या आयुष्यात नव्याने डेरेदाखल झाला आहे.. मधली काही वर्षे संभाषणाविना गेली खरी पण आता मात्र नवमाध्यमांशी दोस्ती करत त्या सुखद स्मृती नव्याने अनुभवता येत आहे.. असच त्या दिवशी आम्ही सर्व बालमैत्रिणी शाळेच्या ग्रुपवर गप्पा मारत होतो.. बत्तीस वर्षे नक्कीच झाली शाळा सोडून पण अजूनही शाळेच्या आठवणी तपशीलासह आठवत होत्या.. काय गम्मत असते ना की भले कालपरवाचे मेंदूला ताण देऊन आठवावे लागते पण बालपण सतत आठवणीत असते.. मनाच्या कुपीत त्या सुगंधी आठवणी बंदिस्त असतात.. व्हाट्सअँप बाबाच्या कृपेने स्मृतींना उजाळा मिळत असतो.

रविवारची ठराविक वेळ ठरवून घेतलेली असल्याने त्या दिवशी सगळ्याच सख्या ऑनलाईन दिसत होत्या.. नुसता चिवचिवाट चालू होता.. अग तुला त्या बाई आठवतात का .. अग किती छान मराठी शिकवायच्या आणि इतक्या काही तल्लीन होऊन जायच्या की वर्ग संपायची बेल कधी व्हायची ते समजायचे देखील नाही.. हो ग आणि त्या भूगोलाच्या बाई आठवतात का.. अजूनही भारताचा नकाशा लक्षात आहे.. सुटीचा बेत आखताना बाई मला आठवत राहतात.. दुसरी सखी म्हणाली अग चित्रकलेच्या बाई आठवतात का.. आज त्यांच्यामुळे मी कलाकलाक्षेत्रात रमू शकले ग.. सख्या आठवणीत हरवून गेल्या होत्या.. एकजण म्हणाली की अग माझी मुले मला खूप हसतात आणि म्हणतात हे काय ग मॉम तू सारखे बाई बाई करत असते.. आम्ही बघ कसे टीचर किंवा मिस म्हणत असतो.. त्यावर सगळ्याच जणी व्यक्त झाल्या.. सगळ्यांचे म्हणणे हेच की 'बाई ' शब्दाचा अर्थ तेव्हा आदरभाव ह्या अर्थाने अभिप्रेत होता जो आजही आहे.. तो शब्द उच्चारताच गुरूस्थानी असलेल्या बाई आठवत राहतात.. कालानुरूप प्रांतानुसार भाषेतही काही बदल झाले आणि त्यात काही पूर्वापार शब्द आपला चेहरामोहरा हरवून बसले इतकेच काय ते म्हणता येईल.

'बाई 'ह्या शब्दावर मग मनमोकळी चर्चा झाली.. बाई!बाई!बाई! अगदी थक्क व्हायला झाले.. बाईपणाचा इतका सखोल विचार जणू काही मी पहिल्यांदाच करत असल्यागत बाईपण आदळत गेले.. मुलगी जन्माला येते तेव्हापासून खरं तर बाई जन्माला येत असते.. बाईचा जन्म अस्तित्वात येतो.. मुलगी म्हणून जन्माला आली आहेस त्याचा जरा विचार कर असे तिच्या मनावर बिंबवले जाते आणि ती लहानाची मोठी होते.. मुग्ध कलिका अलगदपणे आता फुलात रूपांतरित होत जाते.. ती वयात येते तेव्हा अचानक मोठी होऊन जाते.. तिच्यातील अल्लड बालिका जणू संपून जाते कारण जगाच्या नजरा आता तिच्याकडे लागलेल्या असतात.. तिच्यावर बारीक लक्ष ठेवले जाते.. तिला समाजाच्या चौकटीत राहायला शिकवले जाते.. बाई तू सातच्या आत घरात असले पाहिजे बरं का असे दटावून सांगितले जाते.. त्यात अविश्वास नसतो तर खूपशी काळजी असते.. तीही खूपशी समजूतदार होऊन जाते जणू काही आपले बाल्य ती गाठोडीत बांधून ठेवत असते.. प्रेमात पडते तेव्हा गाण्यातून व्यक्त होते.. 'बाई बाई मनमोराचा कसा पिसारा फुलला.. बाई बाई.. '... बाई हा शब्द तिच्या मनातील हळव्या भावनांचा चित्कार असतो.. लाडिक पणे ती 'आम्ही नाही बाई जा.. '.. तेव्हा ते खरच लोभस वाटत राहते. 'बाई ग 'ह्या शब्दातून तिची व्यक्त होण्याची स्त्री सुलभता दिसून

येते.. स्वतःबद्दल तिला नव्याने उमजत जाते.. गाण्याचे बोल असतात.. 'बाई मी पतंग उडवत होते... 'अशा काही गीतांमधून ती आपल्याला भेटत जाते.. अगदी आताआताचा डीजेवालाही तेच गाणे वाजवत असतो.. 'बाई वाड्यावर या.. बाई वाड्यावर या.. '.. त्याचा अर्थ कळो ना कळो बालगोपालापासून तरुणाई त्यावर थिरकत राहते.. काय बोल असतात ना गाण्याचे असे म्हणत बाईपणाचे गाणे नकळत स्वीकारले देखील जाते.. पारंपरिक गाण्यातूनही बाई भेटत राहते.. 'बाई मी अशी.. बाई तू कशी..?'.. हे बाईपण मुलीच्या जातीला अगदी कातडीसारखे घट्ट चिकटून राहिलेले असते.

बाईचे भावजीवन समजून घेणारे संवेदनशील कवी संजय चौधरी आपल्या कवितेतून बाईपण उलगडून दाखवतात.. 'बाई सजते... तेव्हा दुःख कुठे लपवते?'... खरंच तर आहे ना की बाई जेव्हा हसते तेव्हाही दुःख कुठे लपवत असावी..?तेच कवी पुढे म्हणतात.. 'लावलात कान कुठल्याही बाईच्या काळजाला.. आज.. तर ऐकू येईल शतकांपासूनच्या दुःखसमुद्राची गाज.. '... बाईने आजवर किती सहन केले ह्यावर भाष्य करायला समुद्राची शाई करावी लागेल.. 'भोगले जे दुःख त्याला सुख म्हणावे लागले..

एवढे मी भोगिले की मज हसावे लागले.. '.. बाईला गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी समाजसुधारकांना फार मोठे योगदान द्यावे लागले आहे.. तिला शिक्षणाचे पंख लाभले तेव्हा ती आत्मनिर्भर होऊन गगनभरारी मारू शकली आहे.. बाई बुद्धिमान आहेच पण बाईपण वाईट आहे.. तिला गुलाम म्हणून वागवले गेले आहे.

आजही तिला बाईपणा मुळे विकले जात आहे तेव्हा बाई सुन्न होऊन जाते.. बाई मिटून जाते.. आजही तिचा जन्म नाकारला जातो आणि तिच्यातील मादीवर अत्याचार होत राहतो.. काही वेळा ती निमूट सहन करते तर कधीकधी अन्यायाविरुद्ध पेटून उठते.. बाईपण प्रवाहपतित होत जाते.. अक्षरश: कुस्करली जाते.. सोसण्याचे व्रत तिला आईकडून आजीकडून मिळाले असावे का?कुठून आला असेल इतका सोशिकपणा असा प्रश्न पडत जातो. बाईपणाचा संदर्भ तिच्या जगण्याला लावला जातो.. नकोच हा बाईचा जन्म असे ती वैतागून म्हणते तर कधी कधी ती म्हणते .. 'जन्म बाईचा बाईचा खूप घाईचा.. एक आईचा एक ताईचा.. '.. खरच तर आहे बाईपणाच्या परिघात ती अडकत जाते..

माझ्या शेजारी हिंदी भाषिक मंडळी राहायची आणि त्यांना बाई हा शब्द उच्चारला की मोलाने घरकाम करणारी कामवाली

एवढेच ज्ञात असायचे.. त्या सखीला कुणी आपल्याला बाई म्हणून संबोधन केलेले आवडत नसे.. काही दशकांपूर्वी राजकारणात काम करणाऱ्या स्त्रियांना बाई असे संबोधत असत.. त्यातही आदरभावना व्यक्त होत असे.. गुणाची बाय माझी म्हणून तिच्यावरून मीठमोहऱ्या ओवाळल्या जात असत.. बाईला बाईपणाची चाड असली पाहिजे तरच ती बाईच्या प्रश्नांवर लढू शकते.. बाईच्या समस्यांची जाण असली पाहिजे.. बाईला घडवणारा विधाता त्यालाही घडवत असतो हे विसरून चालणार नाही म्हणूनच बाईला आधी माणूस म्हणून समाजाने स्वीकारले पाहिजे तरच ती सुखी होऊ शकेल.. आणि त्यातूनच बाईमाणूस हा शब्द भाषा वापरात आला असावा असे वाटत राहते.

एकदा माझ्या गानसखीने मला एक किस्सा ऐकवला होता.. गाण्याचा कार्यक्रम होता.. गायिकेच्या नावापुढे बाई असा शब्द होता जो त्या कार्यक्रमासाठी आलेल्या बंगाली अभिनेत्रीला खटकत होता पण तिला बोलून दाखवता येत नव्हते कारण ती मराठी गावात आलेली होती.. दरम्यान सूत्रसंचालक म्हणाले की आदरणीय लता बाईंच्या गाण्याबद्दल मी काय बोलावे.. साक्षात भारताची गानकोकिळा आहे त्यावर ती अभिनेत्री आनंदित होऊन

म्हणाली अगर दिदी को बाई बोलके सन्मानित करते है तो मै भी मौसमीबाई हू.. सगळयांनी मनापासून टाळया वाजवल्या कारण की तिथे बाईपण सन्मानित झाले होते.. लताबाईंबद्दल आदर त्यातून व्यक्त झाला होता.. बाई जशी दागिन्यांनी सजते तशी मराठी भाषाही व्याकरणाने सजली होती.. ह्यात प्रांतागणिक बदलत जाणारी भाषा दुराव्याचे काम करत होती.. अर्थातच तो गैरसमज नंतर दूर होत गेला..

बाईपण आपल्या प्रचलित म्हणीमध्ये तसेच वाकप्रचारामध्ये आढळून येते.. जसे की नाव सोनुबाई हाती कथलाचा वाळा.. किंवा बाई तिथे बुवा.. असे शब्दप्रयोग कानावर पडत राहतात.. बाई तुझे ठायी असे असंख्य विषय असतात.. बाई आणि आई फारसे वेगळे शब्द नाही.. बाईचे विश्व अनाकलनीय असते.. खोल खोल समुद्रासारखे तिचे मन असते जे कधी कधी तिलाच उमजत नाही.. वयाच्या प्रत्येक वळणावर ती प्रगल्भ होत जाते आणि स्वतःलाच नव्याने भेटते सुद्धा.. बाईपण हवेहवेसे वाटते आणि त्याचा उत्कट सोहळा साजरा करावासा वाटतो आणि तो प्रत्येक बाईने साजरा केला पाहिजे.. बाईपण आता अभिमानाने मिरवता आले पाहिजे.. बाईच्या व्यथा कथेपुरत्या असल्या पाहिजे इतके चांगले सुरक्षित

दिवस बाई तुला आले पाहिजे ग.. बाईचे अंतर्मन कसे स्वच्छ स्वच्छ असले पाहिजे त्यात मनाचा तळ दिसला पाहिजे.. बाईपणाचे ऋतू आता बहरले पाहिजे.. अशा आहेत बाईच्या पसाभर गोष्टी.. जितक्या सांगाव्या तितक्या कमीच वाटतील आणि संपता संपणार नाही.. तरी त्या शब्दात पकडण्याचा प्रयत्न केला आहे.. हा प्रवास गार्गी मैत्रयीच्या काळापासून सुरूच आहे.. ती चालतेच आहे कधी पालखीतून तर कधी पायदळी.. बाई कशी आहे ना नक्की की तिला नवे बदल हवेसेही वाटतात आणि पाऊल पटकन पुढे पडत नाही.. खूप बोलायचे देखील आहे.. मनातले भरभरून बोलायचे देखील आहे.. तिला हवा आहे विश्वासपूर्ण मैत्रीचा हात.. असे सारे अवकाश तिला आयुष्यात लाभावे असे मनापासून वाटत राहते.. बाईपणाचा वसा आनंददायीच असला पाहिजे.. अर्थपूर्ण वाटू लागतात पुढील कवितेच्या ओळी..

'हुंदका असा तिच्या ओठी दाटून येतो.. अन आसवांचे मोती ओंजळीत घेतो... दाटलेल्या हुंदक्यात असते भूतकाळाची लाट, डोळ्यात तिच्या असते उज्वल भवितव्याची पहाट.. '

# 2

# जीवनातील वास्तवता..



तिथे त्या दूरच्या देशात लोक अगदी रस्त्यावर आले होते.. कसेही करून करोना प्रतिबंधक लॉकडाउन उठवा अशी मागणी करत होते.. त्यांचे हेच म्हणणे होते की असेही आणि तसेही ते भरडले जात आहेत तर काम सुरू करा.. आता त्यांना जीवापेक्षा काम महत्वाचे वाटत होते.. श्रमातून मिळणारा पैसा हवा होता.. आर्थिकदृष्टया संपन्न देश अशा रितीने हातघाईवर आला होता.. भूक त्यांना मारत होती.. त्यांच्याकडे करोनामुळे मृतांचा आकडा वाढतच चालला होता तरीही ते धोका पत्करायला तयार होते.. परदेशात राहणारे स्नेही म्हणाले की इथे कुणीच पैसे साठवून ठेवत नाही म्हणजे असे की आठवड्यात केलेली कमाई आठवड्याच्या शेवटी मौजमजा खाणेपिणे ह्यात उडवायची.. खिसे पूर्णपणे रिकामे झाले की पुन्हा नव्याने भरायचे.. आपल्याकडे तर

सात पिढ्या बसून खातील असा शब्दप्रयोग प्रचलित आहे.. कमवायचे आणि संपवायचे असा त्यांचा काहीसा जीवनक्रम आणि त्यात खंड पडला करोना विषाणूमुळे.. सक्तीने घरात बसायला लोक तयार नाही आणि मग करत आहेत निदर्शने रस्त्यावर येऊन.. ही सगळी दृश्ये बातम्यांमध्ये पाहत असतांना मन काहीसे विषण्ण देखील झाले. फुडपॅकेट्ससाठी मैलोनमैल गाड्यांची रांग पाहता मन अस्वस्थ झाले होते.. असे वाटले की हे असे जीवावर उदार का झाले असावेत..? जास्त काळ रोजगाराशिवाय अवघड आहे हे मान्य आहे पण जेमतेम महिना देखील काढता येऊ नये का..? खरंतर अपवाद असू शकेलही.. एकांगी पण वाटेल हा विचार पण त्या निमित्ताने विचारांचे तारू भरकटू लागले.. कदाचित हा विचारांमधील तसेच संस्कृतीमधील फरक असावा..

सहज लक्षात आले की गेल्या पंचवीस मार्चपासून आपणही घरात आहोत पण अगदीच घरात खायला काही नाही असे झाले नाही.. कडक संचारबंदीच्या काळात घरातल्या डाळीसाळी कामाला आल्या जेव्हा सहजसहजी भाजीपाला मिळत नव्हता.. वडेसांडगे आले डब्यातून बाहेर.. काही पारंपरिक पदार्थ आपण वेळ होता तर करत गेलो आणि आहे त्यात भागविण्याचा प्रयत्न

नक्कीच केला.. रोज नवीन पदार्थ करण्याचा उत्साह तर ओसंडून वाहत होता.. उन्हाळ्यात दरवर्षीपेक्षा जास्त वाळवणे केली गेली.. भाजीबाजारात गर्दी म्हणून तिथे सारखे जाणे टाळले.. फारच चवीढवीचे वा अमूकच पदार्थ हवा आताच्या आता असा आग्रह आपण धरला नाही.. घरातील सदस्यांनी एकमेकांच्या सहवाससुखाचा आनंद घेतला.. दिवाळी तसेच मे महिन्यात सुटी मिळायची त्यापेक्षा प्रदीर्घ सुट्या मिळाल्या आहेत विद्यार्थ्यांना.. कंटाळवाणे वाटू शकते पण अगदीच काही जीवघेणे वाटले नसेल घरात... ज्या घरासाठी आपण झुरत असतो त्या घरात राहायला मिळाले... गोष्टी सकारात्मकच घ्यायच्या म्हंटल्यावर आपोआपच मनात हे चिंतन उमटत जाते..

आपल्या घरात निदान काही घरांत तरी नक्कीच वर्षभराचे धान्य भरलेले असते.. तिखट, मसाला, हळद आणि वाळवणीचे पदार्थ इत्यादी इत्यादी असतेच असते.. कांदाबटाटा रस्सा ही चालतो की कधी कधी.. कधीतरी तिखटामीठाच्या पुऱ्या पण आवडतात.. गरजांचा महापूर नसला की व्यवस्थित भागविण्यास अवघड जात नाही.. घरात असणारी गृहिणी प्रत्यक्ष रोजगार कमवत नसली तरी आहे त्या सामुग्रीत भागविण्याचा तिचा काटेकोर प्रयत्न

असतो.. तिच्याकडे ते अंगभूत कौशल्य असते आणि त्यासाठी तिचे संसारात चित्त असणे आवश्यक आहे..

सहज एक प्रसंग आठवला.. रात्रीच्या जेवणानंतर मागचे आवरणे चालू होते.. पोळीचा डबा रिकामा ठेवू नये म्हणून त्यात चतकोर पोळी लावून ठेवली.. मुलाला एकदम हसू आले.. तो म्हणाला की ही इतकीशी पोळी का शिल्लक ठेवायची.. पोळीचा डबा टाक की घासायला.. आजी म्हणाली अरे असू द्यावे दुरडीला.. रात्री लक्ष्मी वावरत असते घरात तर घरात अन्नाचा घास हवा.. कुणी अवचित पाहुणा आला तर उपाशी नको जायला अशीही भावना असावी.. त्यांच्या बोलण्याच्या मागचे लॉजिक उकरण्यात मी वेळ घालवला नाही.. त्यामागील भावना समजून घेणे महत्वाचे होते.. आणि मी पण नकळतपणे तेच करत आले आहे.. घरातील कुठलीच वस्तू एकदम संपवायची नाही.. डब्यात वाटीभर साखर शिल्लक असतांना नवीन साखर आलेली असते.. तेच धान्याचेही.. आई म्हणते की जुने गहू चांगले असतात म्हणजे ह्या हंगामात घेतलेले लगेच वापरायचे नाही.. प्रत्येक जिन्नस मोठ्या डब्यातून लहान डब्यात काढतांना मोठा डबा अगदीच रिकामा करायचा नसतो.. आपली ही संस्कृती आपल्याला किती काही शिकवत असते आणि तेही सहज जाताजाता... तेच संस्कार

घरातील पुढील पिढीवर होत असतात.. दोन दिवस पुरेल इतकी कणिक घरात असतांनाच नवीन दळणाची तयारी करत असते.. हे सगळे वेगळे सांगायला नकोच ते स्वयंपाकघराच्या व्यवस्थापन तंत्रात ओघाने येतेच.. संपले.. रिकामे झाले.. उलगले असे शब्द देखील उच्चारायचे आपण टाळतो.. आधीच क्रियाशील होत जातो आणि डबे रिकामे ठणठण ठेवत नाही...

महिन्याला तुटपुंजी कमाई असणारी घरकाम करणारी ती दरमहा बचत करत जाते.. त्यातून तिला आपल्या चिमुरड्यांचे भविष्य घडवायचे असते.. असा दुरदर्शीपणा हवाच ना.. असे म्हणतात की टू सेव्ह इज टू अर्न.. पूर्वीचे लोक म्हणायचे की रुपया कमाई असेल तर त्यातील चाराणे तरी भविष्यासाठी राखून ठेवले पाहिजे.. सत्तरच्या दशकापूर्वी ज्यांचा जन्म झाला त्यांना कदाचित ही काटकसर ज्ञात असावी.. शेवटी काय तर तेही एक जीवनमूल्य आहे आणि आजच्या असुरक्षित वातावरणात हे मूल्य शाश्वत ठरत आहे.. आज जे आपल्याकडे आहे ते कदाचित उद्या नसेल किंवा असेलही.. पण त्यासाठी आजचे पाऊल काळजीपूर्वक टाकले पाहिजे..

काटकसरीने ज्यांनी संसार केले त्यांना कुठलीच वस्तू पटकन फेकता येत नाही हेही खरे आहे.. नवनवीन वस्तूंची आवड

असलेली माझी एक नवजेष्ठ सखी परवाच म्हणाली.. 'सुरुवातीला संसारात काटकसर म्हणून मनासारखा संसार मांडता आला नाही.. आता काहीबाही घेत रहावे तर एकुलती एक लेक म्हणते मला काहीच नको तुझ्या संसारातले.. अगदी सासूबाईंना पण तिने तेच सांगितले आहे.. कॅरिअरिस्ट असलेली ती इतका पसारा आवरूच शकत नाही.. ' तिला लहान वयातच आलेला सुज्ञपणा पाहता कौतुकही वाटते.. भविष्याची तरतूद तर हवीच पण त्या नादात वर्तमानाशी ताटातूट पण नको.. थोडक्यात काय तर हा सगळा जगण्यातील समतोल आपल्यालाच साधायचा आहे.. कुठेतरी मध्य नक्कीच साधता आला पाहिजे... करोना आपल्याला बरच काही शिकवून सोडणार आहे.

# 3

# तस्मै व्हाट्सअँप देवाय नमः



पूर्वीपासूनच मानव हा समूहप्रिय प्राणी आहे. एकटेपणावर मात करण्यासाठी त्याला समूह तयार करावासा वाटतो आणि समूहात त्याला नेहमीच काहीसे आश्वस्त वाटत असते.. आदिमानव ते यंत्रमानव असा फार मोठा प्रगतीचा टप्पा आपण सर्वांनी गाठला आहे.. हातातील स्मार्टफोन म्हणजे आपले ऑफिस बनले आहे.. संपर्काच्या कक्षा रुंदावू लागल्या आहेत.. पूर्वीची संपर्काची साधने आता मागे पडू लागली आहेत.. जगण्याचा वेग अतिशय वाढला तसे आपण तंत्रज्ञानाच्या हातातील बाहुले बनत गेलो.. प्रगतीची शिखरे गाठत असतांना आपण नकळत त्यात वाहवत कधी गेलो ते कळलेच नाही.. जाग येत गेली तसे लक्षात आले की हा वेग आपल्याला दडपून टाकत आहे.. आयुष्यातील निवांतता हरवली आहे.. आंतरिक शांती ढवळून निघाली आहे कारण आपल्या मोबाईलला व्हाट्स अँप आले आहे.

मोबाईलला व्हाट्स अँप आले आणि आपण सर्व सुखावलो.. मनातील भावनांचे सुरेख प्रकटीकरण करणे शक्य झाले.. संदेश दळणवळणाचे हे माध्यम आपल्याला हवेहवेसे वाटले.. आजवर दुरावलेले शालेय वर्गमित्रमैत्रिणी भेटले.. जीवलगांशी असलेले आभासी नाते आपण खरे समजत गेलो आणि मनाला प्रेरणाही मिळत गेली.. एक भाबडा प्रश्नही पडला की खरंच इतके सोपे दळणवळण पूर्वी नक्कीच नव्हते मग समारंभाची आमंत्रणे पण व्हाट्स अँपवर मिळू लागली.. व्हाट्स अँपवर संस्थेचे ग्रुप तयार झाले आणि तिथेच वेळ ठरवून मिटिंग्ज पण संपन्न होवू लागल्या आहेत.. सारे कसे स्मार्ट स्मार्ट बनू पाहत आहे ह्या गोष्टीचे आंतरिक समाधान पण मिळत आहे.

आमचा तर अगदी लय भारी व्हाट्स अँप ग्रुप आहे बरं का.. तिथे असे तसे फॉरवर्डस चालत नाहीत आणि हो तेच ते गुड मॉर्निंग गुड डे संदेश पण चालत नाही.. आमचा अडमीन भाऊ फार शिस्तीचा आहे तो लगेच रीमुव्ह करून टाकतो.. अहो शिस्त म्हणजे शिस्त ती पाळलीच गेली पाहिजे नाही का..?आपल्या लय भारी समूहात आता नवीन कुणी नकोच आणि आले तर सरळ मतदान घेतले जाते अर्थात एकछत्री कारभार खपवून घेतला जात नाही.. असा कोण अभिमान एकेकाला आपल्या समूहाबद्दल

असतो विचारूच नका.. आपल्यावर उपकार केल्याचा आव आणत तिथे ऍड केले जाते .. आपल्यालाही कृतकृत्य वाटते ना वाटते तोच लक्षात येते की इथे नेहमीचीच चारपाच डोकी कार्यरत आहेत आणि बाकीची मंडळी कावेबाजपणे केवळ पाहणी करत आहे.. कीर्तनाला चार पाच डोकी आणि गावजेवणाला आख्खे गाव असावे त्याप्रमाणं चालू असतो कारभार.. काही काही मंडळींना खरोखरच वेळ नसतो हे मान्य करावे लागते पण काही मंडळी केवळ हेरगिरी करत असतात आणि आपण त्या गावचेच नाही असे भासवत जातात..

व्हाट्स अँप समूह बनतात कारण तिथे काही न काही समानता असते.. समान धाग्याने बांधले गेलेले लोक भिन्न संस्कारातून आलेले असतात आणि प्रत्येकाची भावनिक पातळी भिन्न असते.. संवेदनशीलता भिन्न असते इतकेच काय तर प्रत्येकाचे दृष्टीकोन तसेच मानसिकता भिन्न असते आणि अशी भिन्न भिन्न मंडळी जेव्हा ग्रुपमध्ये नांदतात तेव्हा मतभिन्नता उघडउघडरित्या दिसून येते..

स्वतःच्या कोषात राहणारी स्वार्थी माणसे स्वतःचा उदो उदो करण्यात धन्य धन्य मानतात ज्यांना इतर लोकांच्या सुखदुःखाशी कर्तव्य नसते.. अनेक गमतीजमती घडतात पण मनापासून वाटते

की सोशलमिडियावर व्यक्त होत असताना जबाबदारीने वागले पाहिजे आणि इथे आपली मनमानी सोडली पाहिजे.. अनेकदा नकळत घडून जाते म्हणजे ग्रुपला सध्या काय चर्चा चालू आहे त्या गोष्टीचा आढावा न घेता उत्साहाने पोस्ट केले जाते.. अनेकदा नजरचुकीने चुकीच्या स्माायली जोडल्या जातात.. अपूर्ण ज्ञान नेहमीच घातक ठरते.. कुणाकुणाला वाटेल की ग्रुप म्हणजे शाळेचा वर्ग आहे का शिस्तीत वागायला पण तसे जाचक न वाटू देता काही जीवानमुल्यांकडे आपण दुर्लक्ष करून चालणार नाही.. असे प्रसंग वर्गमित्रांच्या ग्रुप वर हमखास होत असतात.. मोठे झालेले पन्नाशीच्या आसपास असलेले काही वर्गमित्र खऱ्या अर्थाने यशस्वी असतात.. मधले काही वर्षे संवादावीण गेलेले असतात .. खरंतर तो फार मोठा गॅप असतो आणि तो असा लगेच भरून येत नाही.. काही काही लोक जीवनाच्या लढाईत अयशस्वी असतात त्यांना उगाचच न्यूनगंड येतो.. एखादा अगदी कलेक्टर असला तरी त्याच्याकडे वेळेची मागणी केली जाते आणि तो सामील झाला नाही तर त्याला चुकीचे ठरवले जाते.. अति झाले की हसू होते असे काहीसे सध्या ह्या ग्रुप संदर्भात होत आहे.. तिथली बेशिस्त पाहता चांगल्या विचारांचे लोक निराश होत आहे आणि त्यांचा सहभाग कमी होत चालला आहे.. एरवी सामाजिक जीवनात घडत असते तसेच राजकारण ह्या आभासी विश्वात घडत आहे.. तिथल्या तिथे

वेगळी चूल मांडली जाते म्हणजे सबग्रुप तयार केले जातात.. ठराविक लोक ठराविक उत्तरे देत जातात पण त्यातही आक्षेपार्ह काहीच नाही असे म्हणता येईल.

असाच एक ग्रुपवरील प्रसंग नमूद करावासा वाटतो.. अतिशय मनमिळावू असलेल्या मैत्रिणीचे यजमान आजाराने निवर्तले.. ती भावनाविवश होऊन तिसऱ्याच दिवशी तिच्या आठवणी सांगत होती.. कौटुंबिक आनंदाचे क्षण पोस्ट करत होती.. ती खरोखरच कोलमडून पडली होती.. ग्रुपवरील वातावरण गंभीर होऊन गेले होते.. नियतीच्या खेळापुढे कुणाचेच काहीच चालत नाही म्हणतात त्याचा प्रत्यय सगळेजण घेत होते.. आजवर अगदी दोनचार ग्रुपमधील व्यक्ती तिच्या यजमानांना भेटल्या असाव्या त्यामुळे फारशी कनेक्टिव्हिटी साधली जात नव्हती म्हणजे त्यांचा चेहरा डोळ्यासमोर येत नव्हता. तेवढ्यात परदेशात असणाऱ्या वर्गमित्राने आपले सहलीवरचे धमाल करतांनाचे फोटो पोस्ट केले.. त्याच्यासाठी तो परम आनंदाचा क्षण होता.. खरं तर तो खूप संवेदनशील होता पण त्या मैत्रिणीवर जो आघात झाला त्याबद्दल अनभिज्ञ असल्याने नकळत असे घडून गेले होते.. त्याला त्याची जाणीव करून दिल्यावर तो वरमला आणि चुकीचे प्रायश्चित म्हणून ग्रुप सोडायची भाषा करू लागला.. एकतर तो कधीतरीच

डोकावायचा त्यामुळे संपर्ककक्षेच्या बाहेर असायचा.. त्यामुळे तो चुकीचा वागला असेही म्हणता येणार नाही.. असो .. त्या प्रसंगावर खूप चर्चा झाली. कुणावर कितीही आघात झाला तर आभासी सांत्वन तरी योग्य आहे का?. शब्द म्हणजे केवळ पोकळ बुडबुडे वाटू लागतात.. प्रत्यक्ष भेट घेणे गरजेचे असते.. अनेकवेळा खरोखरच भरीव आर्थिक मदत देखील केले जाते हे नक्कीच प्रशंसनीय आहे.. अशा आहेत पोस्ट करण्यासंदर्भातील अनेक बाबी.. नियमावली पण तयार केली जाते. फॉरवर्ड नको असे असतांना देखील काही लोक तसे मुद्दाम करत असतात तेव्हा ते नेमके काय साधत असावे असा प्रश्न पडतो.. आधीच आपल्या रोजच्या जगण्यात कमी प्रश्न असतात का त्यात हे सारे आपल्यावर आदळत असते.. सकाळी उठल्याउठल्या घराची साफसफाईमध्ये गुंतणारे आपण मोबाईलला स्वच्छ करत जातो म्हणजे नको ते साहित्य डिलीट करत जातो.. आलीया भोगासी म्हणत हे माध्यम आपल्यावर आक्रमण करू पाहत आहे. खरंच काय हरकत आहे विवेकबुद्धीने सकारात्मकरीतीने सोशल मीडियाला सामोरे जाण्याची..?तस्मै व्हाट्सअँप देवाय नमः!

# 4

# मी आणि माझे 'स्पेसशीर' नाते..



आपले जीवन नात्यांच्या अफाट पसाऱ्यात विसावलेले असते.. आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीशी आपण नाते संबंधाने बांधले जात असतो.. अगदी ठरवूनसवरून ही नाती प्रस्थापित होतात असेही नाही.. स्नेहाच्या धाग्याने आपोआप गुंफली जाणारी नाती मनाला हवीहवीशी वाटतात.. काही नाती तर अगदी अव्यक्त असतात.. म्हंटली तर ती नसतातही कारण प्रत्येक नात्याला नाव देता येते असे नाही.. प्रतिभासंपन्न कुसुमाग्रजांचे शब्द म्हणूनच काळजाचा ठाव घेतात.. 'नात्यास नाव आपुल्या देऊ नकोस काही.. साऱ्याच चांदण्यांची जगतास जाण नाही.. '.. किती गहनता दडली आहे ह्या शब्दांमध्ये.. काही नाती अभिमानाने जगाला ओरडून सांगावीशी वाटतात पण नाही सांगता येत असा काहीसा त्याचा अर्थ आहे. मनातला लखलखाट मनातच लपवून ठेवावा लागतो.

फुल जितक्या सहजतेने देठावर विसावलेले असते तितकी सहजता प्रत्येक नात्यात असली पाहिजे.. सहजतेने जोडले गेलेले निर्व्याज नाते आपोआप गहनतेच्या दिशेने प्रवास करू लागते.. त्या नात्याचा परिमळ मनाला सुखवून जातो.. नात्याच्या अलवार गाठी बांधल्या जातात आणि ते नाते आपल्या काळजात नकळत घर करून जाते.. नात्याचा परीघ विस्तारत जातो आणि अमाप सुख देऊन जातो.

खरंय.. नाते हे असेच असते.. नात्याचे झाड जाणीवपूर्वक जपावे लागते.. नात्यातील ओढ कधीच आटू नये असे आतून आतून वाटत जाते आणि नात्यात आपण खोलवर गुरफटत जातो.. आणि काय असे घडत जाते की जीवापाड जपलेले नाते अचानक 'फास 'वाटू लागते.. क्षणात होत्याचे नव्हते होऊन जाते.. असा एक दग्ध क्षण अचानक नात्यावर स्वारी करतो आणि नाते झुगारून द्यावेसे वाटते.. नात्याचे झाड करपू लागते.. झाडाला घुसमट होते तेव्हा मनाला असह्य वेदना होतात कारण तोडण्यासाठी नाते सुरुवातीपासूनच जोडलेले नसते.. तरीही असे का व्हावे हा प्रश्न मनाला छळत राहतो... नात्याला शाश्वती हवी असते पण ती शोधण्याच्या नादात नात्याचा पदर कधी हातातून सुटतो हे समजतच नाही. चिरंतनाची आस बाळगणारे नाते उध्वस्त होते.

नात्यातील विश्वास जेव्हा गळफास घेतो तेव्हा नाते मरणपंथाला लागते.. नात्यातील स्पेस जी अतिशय महत्वाची आहे ती प्रत्येकाला हवी असते आणि ती काही प्रमाणात नक्कीच गरजेची असावी पण ती इतकीही नसावी की ज्यामुळे अंतर प्रमाणापेक्षा जास्त वाढतच जाईल.. स्पेस म्हणजेच सुसह्य मोकळीक होय.. नात्याचे झाड बहरण्यासाठी नात्याची पाळेमुळे फारही लगटून नकोच.. मुळांवरची मऊशार माती भूशभूशीत असली पाहिजे.. त्यातून स्वच्छ सूर्यकिरणे खेळली पाहिजे.. मुळांचा जीव अजिबात घुसमटायला नको.. हे सारे ठाऊक असूनही झाडाच्या फांद्या बेछूट पणे छाटल्या जातात.. खरंच तर आहे स्पेसअभावी हे सारे घडले असावे का असा प्रश्न मनाला नक्की विचारता आला पाहिजे.. प्रश्न पडतो की ही स्पेस मॅनेजमेंट म्हणजे नक्की काय गौडबंगाल असावे बरे.. !

आता हेच बघा ना.. जगाच्या अफाट पसाऱ्यात त्या दोघांनी एकमेकांना अचूकपणे हेरले.. दोघेही सगळयाच बाबतीत एकमेकांना अतिशय अनुरूप आहेत हे मान्यच करावे लागेल इतकी समरसता दोघांच्या नात्यात आहे.. पाच वर्षांपासून दोघे डिस्टन्स रिलेशनशीपने बांधलेले आहेत.. सातासमुद्रापलीकडे तो राहतो आणि तीही त्याचा शिक्का मनावर लेवून आपले करिअर करत

आहे.. दोघांनी फोनवर बोलण्याची वेळ ठरवून घेतली आहे.. ती जरा जास्तच हळवी आणि तो वास्तवाशी जुळलेला.. एखाद्या हळव्या अलवार क्षणी ती त्याला साद घालू इच्छिते तेव्हा तो प्रचंड व्यस्त असतो.. त्याला खूप काही काळजात साचलेले सांगायचे असते पण त्याच्याकडे वेळच नसतो.. त्याचे म्हणणे हेच की तू माझी आहे .. मला खूप आवडते आणि आपले एकमेकांवर अपार प्रेम आहे हे रोज रोज कशाला सांगायला हवे.?. माझ्याशी रक्ताची नाती जशी बांधली गेली आहे तशीच तू पण एका हक्काच्या नात्याने आहेसच माझ्या आयुष्यात.. त्याचे बोलणे तिला कानात साठवून ठेवावेसे वाटते पण हे दृश्य अंतर मात्र सहन होत नाही मग ती त्याला शोधत राहते.. कधी हसते तर कधी रुसते.. काल तो आपल्या ऑफिसच्या मैत्रिणीबरोबर डिनरला गेला होता तो फोटो त्याने तिला पाठवला होता.. त्यांची ती ऑफिस मिटिंग होती हेही तिला माहीत होते तरीही ती विचलित झालीच.. स्पेसच्या लेबलमुळे तिला तसे सांगताही आले नाही.. अगदी असंच कधीतरी त्यालाही खटकत असेलच .. वेळेअभावी कधीतरीच गप्पांच्या तारा छेडल्या जातात.. कधीतरीच तो आभासी जगात तिच्या वाट्यावर येतो.. हो म्हणजे तिला तो स्पेस देतोय तशीच स्पेस ती पण त्याला देतेय तरीही अंतर आहेच.. त्याचे रुटीन व्यवस्थित चालू आहे.. तिला एकदा त्याला महत्वाचे सांगायचे

होते म्हणजे तिला तो तेव्हा हवाच होता तेव्हा तो फोनवर उपलब्ध झाला नाही.. तिला त्याचा प्रचंड राग आला आणि त्यांचे डिस्टन्स रिलशनशीपमधील पाहिलेवहिले भांडण झाले.. त्याने खूप मनवल्यावर ती त्याला म्हणाली.. 'काय नुसते स्पेस स्पेस करत बसतो रे.. जा स्पेस मध्येच आणि हो सुखी.. ' इतकेही नको ना जीवघेणे अंतर असे तिला लटक्या रागाने म्हणायचे होते.. आता लवकरच त्यांचा विरह संपणार आहे कारण दोघांनी लग्न करायचे ठरविले आहे.. तोपर्यंतचा काळ नात्यातील स्पेस जपत व्यतीत करायचा आहे कारण दोघांनीही एकमेकांना एकमेकांच्या स्पेससह स्वीकारले आहे... लग्नानंतरही पुन्हा स्पेसची लुडबुड असतेच असते.

खरंय.. माणसे अल्पावधीत दुरावतात ती ह्याचमुळे की त्यांना नात्यातील तोल सांभाळता आलेला नसतो.. व्यवस्थापन कुठेतरी चुकलेले असते.. स्पेस मायक्रो असावी अगदी दिसेल न दिसेल अशी.. नाहीतर दरी बांधली जाण्यास वेळ लागत नाही.. असंही तुटण्यासाठी एक क्षण पुरेसा असतो.. नात्यातील श्वास जीवित राहिला पाहिजे.. प्रेम शंभर टक्के हवे असते पण पेरणी करतांना स्पेसच्या नावाखाली हातचे राखून ठेवले जाते.. मग त्या नात्याला परिपूर्णता कशी लाभणार? लग्नातल्या सप्तपदीमध्ये हा एक फेरा

असला पाहिजे की आम्ही आयुष्यात एकमेकांना सुसह्य होईल अशी स्पेस नक्की देत जावू.. प्रसंगी मोबाईलचा पासवर्ड पण एकमेकांशी शेअर करू फक्त त्यात अपेक्षा कमी असावी.. व्यवहारिक विचार त्यात नक्कीच असावा.. माझे आभाळ तुला घे तुझे आभाळ मला.. अशी भव्य उदात्त आभाळाची देवाणघेवाण करणारे समृद्ध प्रेम स्पेसच्या नावाखाली दबून नको जायला असे मनापासून वाटते.. प्रेम म्हणजे सृजन मनाचा प्रकट अविष्कार त्याला अवकाशही दिला पाहिजे आणि पाशही वाटायला नको.. कारण स्वातंत्र्याचे आकर्षण इथे प्रत्येकालाच असते.. प्रत्येकालाच आपापल्या परीने जगायला आवडत असते.. स्पेस जपत एकमेकांना उमगून घ्यायचे असते.. अन्यथा एकाच दिशेने जाणाऱ्या वाटा अचानक वाट बदलवून घेतात.. त्यासाठी जगू या आनंदे स्पेससह.. !!

# 5

# त्यालाच संस्कार देणे गरजेचे...



आज सकाळी सायकलिंग केले आणि घराजवळच्या गार्डनमध्ये विसाव्यासाठी जाऊन बसले.. सकाळी आठ वाजेला ही ऊन जाणवत असते.. माझा आवडता कोपऱ्यातील बाक माझी वाट पाहत होता.. मेंदूमध्ये नवनवीन कथानकाची जुळवाजुळव करत होते.. घरी गेल्यावर नक्कीच कथेची प्रिंट बाहेर पडणार होती.. स्वतःशी असा निदान दहा मिनिटांचा तरी संवाद झाला पाहिजे..

मी असेच विचाराधीन होते आणि लक्षात आले की शेजारच्या बाकावरील एक चिमुरडी माझ्याकडे एकटक बघतेय.. तिच्या चेहऱ्यावर हास्य आणि कुतूहल होते.. ती माझी नक्कल करत होती.. तसाच व्यायाम करू पाहत होती.. मला एकदम हसू आले.. ती असावी सात वर्षांची आणि सोबत तिचा चार वर्षांचा भाऊ होता.. मुलगी निरोगी आणि चुणचुणीत भासली.. कष्टकरी

जमातीची ती मुलगी होती.. माझा अंदाज खरा ठरला.. तिचे आईवडील वेठबिगारी करत होते.

लहान मुले मला खूप मनापासून आवडतात.. काय ग काय नाव तुझे असं मी विचारलं आणि मग मीच धास्तावले.. बेचैन झाले.. बाळा असं एकट्याने यायचं नाही खेळायला.. कुणी काही खाऊ दिला तर घ्यायचा नाही इ. इ... मग एकदम वाटले मी बोलतेय तिच्याशी हेही तिच्या आईवडीलांना चुकीचे तर नाही वाटणार..?माझ्याच विचारांच्या गुंत्यात मीच अडकून गेले.. असं का व्हावे.. सहजतेने ही गोष्ट मी का घेऊ नये म्हणून स्वतःचाच राग पण आला. तिला टाटा करून मी तिथून बाहेर पडले.. ती माझ्या सायकलीकडे कौतुकाने पाहत राहिली..

अस्वस्थतेचे कारण म्हणजे माझे वर्तमानपत्र वाचन होय.. सध्या जम्मू-काश्मीरमधील कठुआ घटनेवर बातम्या येत आहेत आणि ते वाचून काय प्रतिक्रिया द्यावी असा संभ्रम प्रत्येक पापभिरू व्यक्तीला पडला आहे.. आठ वर्षच्या मुलीची हत्या म्हणजे क्रौर्याची परिसीमा होय.. सात काय आणि सत्तर वय काय कुठलीच स्त्री सुरक्षित नाही.. तिला सुरक्षिततेचे धडे देण्याबरोबरच आणखी काय करता येईल असा विचार पुढे येतो.. अन्यायकर्त्याला

सुरुवातीपासून चांगले संस्कार असते तर त्याने असे काम केलेच नसते..

कुटुंबातील मुलाला वाढवतांना त्याला स्त्रियांना आदर देण्याची शिकवण दिली गेली पाहिजे.. हाच मुलगा पुढे जबाबदार पुरुष म्हणून घडणार आहे.. आता तर वाटते शालेय अभ्यासक्रमात असे मूल्यशिक्षण दिले गेले पाहिजे जे जीवनाचे शिक्षण असणार आहे.. कसही करून त्याची पुरुषी मानसिकता बदलवली पाहिजे आणि तो जेव्हा लहान असतो तेव्हापासूनच समाजातील स्त्रियांना अभय देण्याचे वचन त्याच्याकडून घेतले गेले पाहिजे.. निषेध आणि आंदोलन ह्याबरोबर अशी उपाययोजना हवीच हवी.. निष्पाप कळ्या निर्भयपणे उमलल्या पाहिजे..

# 6

# पाऊल पाऊल.. ज्याची मनाला चाहूल..



सहा महिन्यांची ती गुटगुटीत सुदृढ बालिका मला फार आवडली.. गोरी गोरीपान असलेल्या गुडियाला पाहताच ती मला स्त्री जातीची छोटी प्रतिकृती भासली. किती निर्व्याज, निरागस, अवखळ आणि अल्लड बाल्य तिच्यात सामावलेले होते.. मला माझ्या स्त्री जातीची सुंदरता जणू काही नव्याने गवसली.. नात्याने ती माझी भाची.. जणू काही तिच्यात मी माझे तसेच माझ्या मोठ्या झालेल्या राजकन्येचे बालपण शोधत होते.. तिचे तांबूस गुलाबी गुबगुबीत इवलेसे पाऊल मी तळहातावर घेतले.. मला ते फारच लोभस वाटले.. लेकीला आदिमाया, आदिशक्ती मानणारे आपण आणि आपली हिंदू संस्कृती मग मला तिचे पाऊल महालक्ष्मीचे पाऊल भासले.. मी नकळत ते माथ्याला लावले.. तिथे बसलेली वहिनी म्हणाली.. आत्याबाई किती लाड करतेय लाडूबाईचे. मी छकुलीच्या बाललीला पाहण्यात रंगून गेले आणि मन मात्र त्या पावलात रंगून

गेले.. पाऊल ह्या शब्दाशी जुळलेले असंख्य संदर्भ मला त्या निमित्ताने आठवले..

हो.. आता ही छकुली पण दिसामासाने मोठी होईल.. तोल सांभाळत उभी राहील.. बाळी उभी राहिली कुणी नाही पाहिली किंवा डिगी डिगी डाला.. बाळा उभा राहीला.. असे गीत छकुलीला बोट पुढे सरसावताना घरातल्या मंडळींच्या ओठी असेल.. पालकत्व म्हणजे जणू काही सुरेल गीत असते.. त्यातून केवळ आनंद एके आनंद आपल्याला मिळत असतो.. तो प्रत्येक क्षण समरसून उपभोगायचा असतो म्हणजे काही हरवल्यासारखे भासत नाही.. उभे राहतांना आपल्या इवल्याशा पावलाला ती जपत असते.. मध्येच धपकन पडते देखील.. पडो झडो.. माल वाढो.. ती पुन्हा पुन्हा उभी राहते.. त्यासाठी वॉकरचाआधार घेते.. घरभर दुडुदुडू धावत सुटते.. आता काही खरं नाही बरे का.. इतके दिवस पाळण्यात होती तेव्हा सांभाळणे सोपे जात होते आता मात्र बाळीचे कार्यक्षेत्र वाढले आहे म्हणायचे असं म्हणत आजीही तिच्या मागे धावत सुटली आहे.. आता दिवस कधी उगवतो आणि कधी मावळतो ते कळतच नाही..

पहिले पाऊल टाकले तर सगळ्या जगाला अपूर्वाई झाली.. पहिल्या पहिल्याचा आनंद काय वर्णावा?. सारीच अपूर्वाई असते..

आता ती चालतच राहणार.. पावलोपावली धडपडत देखील जाणार त्याचे देखील अमाप कौतुक होणार अगदी तसेच कौतुक मोठेपणी तिला मिळाले पाहिजे ना असे मला मनापासून वाटले.. ती चालायला लागली की झंकार करणाऱ्या घुंगराच्या तोरड्या मी तिला घेऊन देणार आहे.. आता पायात छानसे वाळे तिला घातले आहे..

पाऊल.. आखीव रेखीव असते मग त्याला पदपद्म असेही संबोधले जाते.. दुर्गा आरती मध्ये शब्द आहेत.. नरहरी तल्लीन झाला पदपंकजलेशा.. आज पहिल्यांदाच मी पाऊल ह्या शब्दावर विचार करते आहे असे मला वाटू लागले.. जन्माच्या वेळेस आधी डोके बाहेर यायच्या ऐवजी बाळ पोटातच मुक्त विहार करत असते आणि मग चक्क पायाळू म्हणून जन्माला येते.. पायाळू लोकांना विशेष मानले जाते.. त्यांच्या पायाची लाथ पाठीत बसल्यावर कमरेत उसण भरलेली असल्यास ती बरी होते असा समज आहे.. बाळाला जगात पाऊल ठेवण्याची घाई झाली असावी.. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात अशी म्हण देखील प्रचलित आहे.

असे म्हणतात की बोले तैसा चाले त्याची वंदावे पावले... आदर्शवादाच्या भोवऱ्यात अडकलेले आपण मग नकळत म्हणतो की वंदन करावे अशी पावले आता कुठे शोधावी..?शोधाशोध

करण्यापेक्षा आपणच आदर्शतेच्या वाटेवर वाटचाल असू द्यावी.. पावले दिशा शोधत असतात.. वाटेचा आढावा घेत असतात.. पावलांना प्रेरणा हवी असते.. चार पावलांची वाटही कधीकधी पावलात अडखळू लागते.. दानपावले घालणारी पावले अतिशय सात्विक भासतात.. ज्ञानोबा माऊली तुकाराम म्हणत रिंगण घालणारी पावले अध्यात्माची आस दर्शवितात.. पावले चालती पंढरीची वाट.. सुखी संसाराचा सोडुनिया ध्यास.. पावले महानतेचे तत्व अंगिकारतात तेव्हा त्यांना पदकमले संबोधले जाते आणि वंदन केले जाते. त्याच पावलांच्या पुढे पादुका बनतात आणि देव्हाऱ्यात विराजमान होतात.

चुकीच्या पावलामुळे अब्रूची लक्तरे होतात.. कधी कुणाचे पाऊल घसरेल ते सांगता येत नाही.. जपून टाक पाऊल पोरी जपून टाक.. तुला पाहण्याऱ्या नजरेचा धाक.. पाऊल डगमगले तरी ते लगेच सावरणे देखील काहींना जमते.. वाट जोखून घ्यावी लागते.. पहिले पाऊल टाकताना जाणीवपूर्वक टाकले पाहिजे.. वाट निसरडी आहे हे जाणवल्यास पावले मागे सरली पाहिजे.. पावलांवर अशी खूप सारी जबाबदारी असते... पावले भक्कम रोवली पाहिजे त्यासाठी स्थिर पाया गरजेचा असतो..


सीतेला लक्ष्मणरेखा न पाळता आल्याने पुढचे रामायण घडले. सीतेच्या पावलांमुळे रामायण कथा पुढे गेली.. जीवनात मैत्रीचे पाऊल पडले की जीवन सुखावह होऊन जाते.. सुखदुःख सहन करतांना एक हक्काचे मैत्र लाभते.. मेहेंदी रेखलेले पाऊल सुंदर सुंदर क्षणांना सजवत असते.. पायलिया ओ हो ओ.. पावलांचा झंकार त्याच्या कुटीला सुखावून जातो.. संसाराचा शीण ती देवाच्या पायी ठेवून देते आणि माथा टेकवते.. संसारात पाऊल ठेवतांना मनी त्याग, समर्पण आणि निष्ठा ह्या भावना सोबत असतात.. सप्तपदी चालतांना प्रत्येक पावलाला अनन्यसाधारण महत्व असते.. तिचे आणि त्याचे पाऊल एकाच दिशेने असते कारण दोघांनाही सुखी संसाराची आस असते.. गृहप्रवेशाच्या वेळी ओल्या कुंकवात ती पावले ठेवते आणि घरभर पावलांचे ठसे उमटवत जाते.. ते ठसे रेशमी रुमालावर घेऊन तो रुमाल तिजोरीत ठेवला जातो.. संसारात पडले की दोघांच्या पायाला भिंगरी लागते.. दोघांच्या संसारात नवा पाहुणा येतो तेव्हा त्या लडिवाळ पावलांमुळे अंगण खुदकन हसू लागते…पाऊल डावे उजवे असते.. आधी उजवे पाऊल टाकावे असा संकेत असतो पण दोन्ही पावलांचे समान योगदान असते त्यामुळेच तर वाट सरू शकते.. दुसऱ्यासाठी पुढे जाऊ देण्यासाठी एक पाऊल मागे राहणे पण आनंददायीच आहे. पावलांचा प्रवास पूरक असला पाहिजे. पाऊल

पाऊल.. ज्याची मनाला चाहूल.. खरंच तर आहे कारण मनातल्या जिवलग व्यक्तींची आपण नेहमीच चाहूल घेत असतो.. जरा सी आहट होती है तो दिल कहता है.. कही ये वो तो नहीं.. ' पिया तोरे आवन की आस तिच्या मनाला लागलेली असते.. गाण्यातून तो तिला म्हणतो.. 'पाव छु लेने दो फुलोको इनायत होगी.. ' तिच्या कोमल पावलांकडे पाहत तो म्हणतो.. 'तुम्हारे पाव बहोत हसीन है.. उसे जमी पे मत रखना.. ' अर्थातच त्याच्या प्रेमात आकंठ बुडालेल्या तिचे पावले जमिनीवर नसतातच.. 'आजकल पाव जमी पें नहीं रहतें मेरे.. बोलो देखा है कभी तुमने मुझे उडते हुए.. 'पावले माणसांच्या गर्दीत हरवले तरी त्या पाऊलखुणा मनात राहतातच.. सात फेरे घेतांना पावले एकमेकांना सरणापर्यंतची साथ मागून घेतात..

देशाच्या सीमारेषेवर पाऊल टाकताना ते देशाच्या हद्दीत असले पाहिजे नाहीतर त्यावरून रण माजते.. असे हे पाऊल जबाबदारीनेच टाकले पाहिजे.. पूर्वजांच्या यशस्वी पावलावर पाऊल टाकत किर्तीध्वज उंचावला पाहिजे.. देखणी ती पावले ध्यासपंथे चालती.. वाळवंटातूनी चालतांना स्वस्तीपदमे रेखिती..

# 7

# तव मूळ ते शून्य



'काय रे इतका काय शून्यात बघतो आहेस.. '

'काय शेवटी हाती आले शून्य.. '

'अगदी शून्यातून विश्व निर्माण केले आहे.. '

'माझी किंमत अगदी शून्य आहे त्याच्या लेखी.. '

'आलोच आलोच.. पोहोचलोच.. अगदी शून्य मिनिटात.. !'

'मला खरंच त्याविषयी अगदी शून्य माहिती आहे.. '

म्हणायला शून्य पण त्याचा किती बोलबाला हा.. !

शून्य शून्य शून्य.. आयुष्यही एक शून्य म्हणजे एक वर्तुळ आहे.. जे जन्मापासून सुरुवात होवून मृत्यूपाशी पूर्ण होते.. दुनिया गोल है असे आपण अगदी सहजतेने म्हणतो. शून्य म्हणजे एक अंक.. ज्याची एक गंमतच असते.. जेव्हा ते एकटे असते तेव्हा किंमत शून्य आणि जेव्हा त्याच्या अलीकडे दशक स्थानी एखादी संख्या येते तेव्हा ती संख्या एकदम दहा पटीने वाढते.. शतक स्थानी संख्या आणि दशक-एकक स्थानी शून्य आले की चक्क 100 पट

किंमत वाढते.. संख्यारेषेवर तर आमचा मान फार मोठा असतो.. शून्य वाढतात तशी पट वाढते.. हजार, दशहजार, लक्ष, दक्षलक्ष असे वाढतच जाते.. एक कोटी म्हणजे एकावर सात शून्य असतात हे शाळेत पाठ करून ठेवले होते.. मध्यभागी दिमाखात उभे असते शून्य आणि आजूबाजूला अमर्याद संख्या.. उजवीकडे घन संख्या आणि डावीकडे ऋण संख्या.. त्यांची संख्या शून्यामुळे ठरत असते..

लेक बालवाडीत होती तेव्हा नुकतीच तिला अंकओळख झाली होती.. शून्य काढतांना ती हसायची आणि मोठा गोल काढायची.. मोठे शून्य म्हणजे मोठे वेटोळेच जणू काही.. शून्यला जोडून रेघ खालच्या दिशेने वाढवली की एक मग तीच रेघ आडवी केली की दोन असे शिकवत गेले होते.. शून्य लहान काढा की मोठे काढा ते शून्य एके शून्यच राहते..

आजूबाजूच्या जगात जेव्हा आपण अनुभवत असतो की माणुसकी हरवत चालली आहे तेव्हा नकळत म्हणतो की माणसाची किंमत पैशांपूढे अगदी शून्य आहे.. एखादी व्यक्ती सतत नाकारली जाते.. तिचे अस्तित्व शून्यागत असते.. कुणासाठी कितीही झिजले तरी त्याचे चीज शून्य असते.. नावडतीचे मीठ अळणी तसे काहीसे असते.. शून्य अगदीच नाकारून कसे

चालेल.?.. ती तर अंकशास्त्रातली एक किंमत आहे.. बीजगणितातले समीकरण सोडवतांना फार मजा वाटायची.. घन क्ष आधिक ऋण क्ष बरोबर शून्य.. मग ते उडवल्यावर समीकरण छोटे होत जायचे.. तसेच महत्व आहेच ना शून्याचे जीवनातही.. शून्य म्हणजे जीवघेणी पोकळी होय.. एखादी व्यक्ती काही कारणाने आयुष्यातून नाहीशी होते तेव्हा उणीव जाणवत राहते.. भौतिक पातळीवर वस्तूचे असणे नाकारले जाते.. नाकारणे हे वरकरणी असते कारण मनात तर ते वसलेले असतेच असते.. तुझ्या मनात माझ्यासाठी थोडीतरी जागा ठेव.. एकतरी कोपरा माझा असू दे.. आठवणींची किंमत अगदीच शून्य नको करू असे जेव्हा ती म्हणते तेव्हा तिला काही आशा असतात.. शून्य स्वीकारणे अवघड जाते.. जगण्याला काहीच अर्थ नाही असे ती म्हणते.. 'अर्थशून्य भासे मज हा कलह जीवनाचा.. '.. माणसे खूप छोट्या छोट्या गोष्टीत अडकून पडतात.. नाहक एकमेकांचा दुस्वास करतात तेव्हा सारे काही अर्थहीन वाटायला लागते..

आपल्या भारत देशाला प्राचीन गणिती परंपरा आहे.. जगभरात शून्याचा शोध भारत देशाने लावला आहे. आर्यभट ह्यांच्या ग्रंथात उल्लेख सापडतो.. नंतर ब्रम्हगुप्त ह्यांनी शून्याच्या

उपयोजनाविषयी लिहून ठेवले आहे.. मग देशाचा अभिमान आणखीनच दुणावतो..

संत ज्ञानेश्वरांनी अगदी लहान वयात ज्ञानेश्वरी लिहिली आहे.. एकतरी ओवी जीवनात प्रत्येकाने अनुभवावी असे म्हंटले जाते.. अलौकिक ज्ञान

त्यातून पाझरत आहे.. त्यांनी म्हंटले आहे..

'शून्य जैसे गृह |का चैतन्यवीण देह|

तैसे जीवीत ते संमोह| ज्ञानहीन |'

शरीरात चैतन्य आहे म्हणजे आपण जिवंत आहोत.. शून्य म्हणजे चैतन्याचा अभाव आहे.. 'शून्य घेती उठाउठी|तेही मातेचि किरीटी| पावती गा||'अतिशय गहन अर्थ इथे अभिप्रेत आहे.. सारा खेळ द्वैत आणि अद्वैत असा आहे.. संत अभ्यासक ते उलगडून सांगू शकतील..


मीराबाई एका कीर्तनात म्हणतात.. 'संसाराच्या नामे घालूनी शून्य.. वाढता पुण्यधर्म केला.. 'सांगायचे हेच की संतसाहित्यात देखील शून्याचा उल्लेख आहे.. त्याचा अर्थ पारमार्थिक आहे..

शून्याला इंग्लिशमध्ये झिरो म्हणतात.. झिरो बजेट असते ज्यात झिरो हा पाया धरून जास्तीत जास्त लाभ कमी किमतीत मिळवून दिला जातो.. प्रत्येक खर्च प्रत्येक नवीन टप्प्यावर तपासून घेतला जातो.. सदर बजेट शिस्तीत कार्यान्वित केले जाते आणि त्यात लवचिकता असते.. झिरो बजेट शेती म्हणजे त्यात खत नसते की कीटकनाशक नसते म्हणजेच प्रदूषण नसते.. शून्य खर्चाची नैसर्गिक शेती ही तर काळाची गरज आहे..

झिरो फिगरचे आकर्षण तरुणींना असते हे तर सर्वश्रुत आहेच पण त्या नादात शरीर कुपोषित राहते.. मध्यंतरी झिरो नावाचा सिनेमा प्रदर्शित झाला होता.. स्वतःला हिरो समजणारा झिरोही असू शकतो.. तर अशा अनेक गमतीजमती आहेत शून्याच्या.. शून्यावरही भरभरून प्रेम केले पाहिजे.. कारण त्याच्यामुळेच असण्याला अर्थ आहे.. नसण्याशी तुलना केल्याने असणे ज्ञात होत असते.. अंधार आहे म्हणून प्रकाशाला किंमत आहे.. असे आहे हे शून्यायन.. !

# 8

# मन की खिडकी खोल दे जरा..



लग्नाच्या निमित्ताने मागच्या आठवड्यात बाहेरगावी गेले होते.. लगेच डोळ्यासमोर घर तरळू लागले.. धावतच घरी आले.. भराभर घर आवरले मग घरही हसू लागले.. घरातील दारखिडक्यांना जाग आली.. माझी आवडती खिडकी मला साद घालू लागली .. खिडकी स्वच्छ केली.. छानशी कॉफी तयार केली आणि खिडकीजवळ येऊन बसले.. काय आश्चर्य की क्षणात श्रमपरिहार झाल्याचे जाणवले.. ही खिडकी मला फार मनापासून आवडते.. मी घरी नव्हते तर खिडकी बंद होती.. जणू काही ती देखील मी येण्याची वाट पाहत असावी.. हे घर घेतले तेव्हा घरातील उंचच उंच खिडक्यांनी मला खुणावले होते.. पाऊण दरवाजा इतकी उंची असलेल्या खिडक्या मनापासून भावल्या.. मनाला नेहमीच मुक्ततेची ओढ असते नाही का.. त्यावर झुळझुळीत पडदे विराजमान झाले.. काळ्या ढगांच्या आडून चंद्रदर्शन व्हावे तसे अचानक खिडकीतून तिचे दर्शन व्हावे

असे कविमनाला वाटत असते.. प्रत्येकाला जगण्यासाठी अवकाश हवा असतो जो खिडकीतून आकाशाच्या रूपाने भेटत असतो... बंद कोंदट वातावरण मनाला नेहमीच घुसमटून टाकते.. खिडकीशिवाय घर ही कल्पना देखील असह्य वाटते..

खिडकी... भिंत बांधतांना सोडलेला चौकोनी मोकळा भाग.. हाच मोकळा भाग छपरावर असतो तेव्हा त्याला झरोका असे म्हणतात.. खिडकी उघडताच हवेची झुळूक सुरकन आत येते.. उजेडाची तिरीप घरात पडते.. आणि बाहेरच्या जगातले नाद आपोआप ज्ञात होत जातात.. विस्तीर्ण नभाचे प्रसन्न दर्शन होते.. आतातर आधुनिक बांधकाम शास्त्रात खिडक्यांचे विविध प्रकार आपण पाहतो.. जुन्या घरांच्या लाकडी दारे असलेल्या खिडक्या आठवतात जो लहानपणी आमचा फळा असायचा.. पेशवेकालीन वाड्याच्या लाकडी कोरीवकाम केलेल्या खिडक्या ऐश्वर्यसंपन्न भासतात.. खिडकीवर विश्वासाने घरटी बांधणारी पाखरे चिवचिव करत येतात.. मधूनच आल्हाददायक झुळूक येते.. पण त्यासाठी खिडकी उघडी ठेवली पाहिजे हेच खरे.. ! बाहेरचे जग आणि आतले जग त्यामुळे जोडले जाते.. समोरच्या घरातील दोन वर्षांचा मुलगा टाचा उंच करून खिडकीतून हाका मारत असतो.. जणू काही त्याला बाहेरच्या जगाची ओळख खिडकी करून देत असते..

आई कामात असते आणि हा जगाशी संवाद साधू इच्छित असतो... खिडकीतल्या त्याच्या बाळगप्पा ऐकण्यासारख्या असतात.. एक घास काऊचा आणि एक घास चिऊचा इथेच भरवला जातो.. चंद्राचा चांदोमामा इथेच झालेला असतो.. त्यालाही खिडकी प्रिय असते.

लहानपणी सुटीत आम्ही आजोबांच्या गावी जायचो तिथे बैठी धाब्याची घरे असायची.. धाब्यावर पश्चिमेकडे एक मोठी खिडकी होती.. त्या खिडकीत एका वेळेस आम्ही चारपाच भावंडे दाटीवाटीने बसायचो.. खिडकीवरून भांडण जुंपायचे.. एकत्र जेवणही तिथेच व्हायचे.. तिथेच भातुकली मांडायचो.. सुटी संपायला आली की आईपप्पा घ्यायला यायचे तेव्हा ह्याच खिडकीत बसून वाट पाहणे व्हायचे.. एकदा काही कारणाने त्यांचे येणे लांबले होते तेव्हा वाट पाहत मी खिडकीतच निद्राधीन झाले होते.. ! आजही स्वप्नात ती खिडकी येते आणि तिथे बसून कल्पनेने ढगांना निरनिराळे आकार देत असलेलो आम्ही आठवत जातो.. प्रवासात देखील खिडकीजवळील जागा सर्वांना हवी असते.. विंडोसीट असली की प्रवास रटाळवाणा होत नाही.

खिडकी ही माणसाची ओळखही असू शकते.. सकाळी फिरायला जात असते तेव्हा वाटेवरील त्या एकाकी बंगल्याच्या

खिडकीत एक आजीबाई नेहमी दिसायच्या.. कधीतरी ओळखीचे स्मित द्यायच्या.. आज अचानक खिडकी रिती दिसली आणि बंगल्यात खूप सारी गर्दी.. हीच गर्दी आजींच्या सोबतीला का आली नसावी..?काळजात खोलवर एक कळ उमटली.. विझलेल्या डोळयांनी कुणाच्या तरी पावलांवर काळजाची वाट अंथरलेल्या आजीबाई आज दूरच्या प्रवासाला निघून गेल्या होत्या.. आता ही खिडकी सुनी सुनी वाटत होती.. ह्या खिडकीशी त्यांनी किती गुजगोष्टी केल्या असतील नाही का.. आता मी वाट बदलून घेतली आहे.. खिडकी दिसली की खिडकीतून दूरवर नजर लावलेल्या नाव माहीत नसलेल्या आजीबाई आठवतात.. मागे एकदा पोरबंदर येथे गांधीजींचे निवासस्थान पाहिले तिथे भव्य खिडकी होती.. गाईड म्हणाला ह्या खिडकीत गांधीजी बसायचे.. तिथे बसून सगळेच जण फोटो काढत होते.. माहीत नाही पण तिथे बसल्यावर दिव्यत्वाची सळसळ जाणवली..

खिडकी आणि मी .. आणि सोबत स्वतःशीच मारलेल्या गप्पा.. दूरवर पसरलेले विस्तीर्ण आकाश पाहतांना मी हरवून जाते.. संध्याकाळ होताच सांज खुलून येते आणि पक्ष्यांचे ठिपके घरट्याकडे परतू लागतात.. घराची ओढ अशी सर्वांनाच असते.. मीही खिडकीत पणती लावते.. पणतीला थोडासा आडोसा दिला

की ती वाऱ्याशी झुंजत राहते आणि खिडकी उजळून जाते.. अंधाराला टक्कर देण्याचे सामर्थ्य ह्या इवल्याश्या ज्योतीत सामावलेले असते.. हळूहळू अंधाराचे साम्राज्य सर्वदूर पसरते.. अशा वेळेस घरापासून दूर असलेल्या प्रियजनांच्या आठवणीने मन देखील कातर होऊन जाते.. खिडकीवर अचानक चंद्र किरणांची फौज दाखल होते.. खिडकी पुन्हा खुलून हसते आणि चंद्राच्या स्वागताला सज्ज होते.. तिथून होणारे मनोहर चंद्रदर्शन मनाला उभारी देत जाते.. चांदणभुल आणि खिडकी .. दोन्हीही आपल्या भावविश्वाचे साक्षीदार बनतात.. चंद्र असतो विचारांच्या साक्षीला आणि सोबतीला देखील.. मग एकटेपण धूसर होत जाते.. थंडीतही खिडकीची छोटीशी फट उघडी ठेवली जाते.. मोकळया हवेची मनाला नेहमीच आस असते.. पंख्याची कृत्रिम हवा नको वाटते.. चोराच्या भीतीने खिडक्या बंद होतात.. गूढ मालिकेतील खिडकीवरील दस्तक काळजातील धडधड वाढवते.. दूरवर पहाट फटफटते आणि आशेचा सूर्य उगवत असतो.. नवेकोरे चोवीस तास आपल्या दिमतीला हजर होतात मग आपणही उत्साहाने खिडकी उघडतो.. सूर्यकिरणे घरात किरणांची रांगोळी घालतात आणि आपण दिवसाच्या स्वागताला सज्ज होतो.. खिडकीत चिमण्यांची लगबग जाणवते त्यांच्यासाठी मग मी आवर्जून दाणापाणी भरून ठेवते आणि आंतरिक समाधानाने रोजचे आन्हिके आटोपत जाते..

मधूनच खिडकीतून बाहेर डोकावते आणि बाहेरच्या जगाशी स्वतःला जोडून घेते..

प्रेमीजीवांच्या जगतात खिडकी हमखास येते.. 'आज तू मनाची खिडकी उघडी ठेव.. तुझ्या स्वप्नात मी येणार आहे.. मग तुला हसतांना बघतांना माझे दुःख दूर पळून जाईल.. ' किंवा एखादी अभिसारिका प्रियकराला म्हणते.. 'मनाच्या खिडकीतून तरीही तू आठवणीच्या रूपाने येत असतो.. कितीही खिडकी बंद केली तरीही.. ''खिडकी तर उघडी आहे पण तुझे येणे झालेच नाही.. तुला केवळ डोळे भरून पाहायचे होते.. ' खिडकीतून दिसणारा चंद्र तर हक्काचा असतो.. त्याच्याजवळ दुःख वेदना व्यक्त केले जाते.. एखादी रुपगर्विता तर खिडकीतला चंद्र आपल्याकडे पाहतोय ह्या विचाराने स्वतःवर गर्व करत असते.. 'श्याम ढले खिडकी तले.. ' 'मेरे सामनेवाली खिडकी मे एक चांद का तुकडा रहता है.. ' 'ये खिडकी जो बंद रहती.. ' 'खिडकीवाली तू कल फिर आना.. ' अशा सदाबहार गाण्यातून खिडकी आपल्याला भेटत असते.. मग ती खिडकी डोळ्यांना असते तर कधी मनाला असते.. त्यातून जन्माला येते हे गाणे 'अखियोंके झरोखोंसे मैने देखा जो सावरे.. ' म्हणजेच काय तर डोळ्याच्या खिडकीतून मनाच्या दरवाजापर्यंत तू आलीस आणि मनाचा दरवाजा उघडला किंवा 'दिल के झरोखे


मे तुझको बिठाकर.. ' अशा गाण्यातून हा झरोखा आपल्याला भेटत असतो..

अशी ही खिडकी म्हणजे कल्पनेचे प्रारूप असते.. प्रत्यक्षात तर ती असतेच पण ती विचारांमध्ये देखील असते.. खिडकी म्हणजे दृष्टी असाही अर्थ होतो.. जाणिवा समृद्ध असल्या की जगण्याच्या खिडक्या खाडकन उघडतात आणि जगण्याला अर्थ येत जातो.. आणि मनाची खिडकी तर नेहमीच विचारांती उघडली पाहिजे.. चांगलेवाईट समजून घेण्याची सम्यक बुद्धी त्यासाठी गरजेची असते.. मनाची खिडकी बंद ठेवली तर भावना प्रवाही राहणार नाही... मोकळेपणाने दूतर्फी संवाद झालाच पाहिजे त्यासाठी मनाला खिडकी हवीच.. तिथे प्रत्येकाला व्यक्त होता येते.. खिडकी म्हणूनच मला खूप खूप प्रिय आहे.

# 9

# कप्पायन

घरात मागे एकदा सुतारकाम चालू होते.. कार्पेन्टर मला म्हणाला..



'हा पहा मी तुमच्या लाकडी कपाटात बनवलेला चोरकप्पा.. अहो तुमच्याशिवाय कुणालाच ओळखू येणार नाही इथे कप्पा आहे असं.. आता त्यात तुम्ही खुशाल किमती वस्तू ठेवू शकता.. '

स्वतःच्या कल्पकतेवर तो बेहद्द खुश झाला होता आणि माझ्या प्रतिक्रियेची वाट पाहत होता..

मी म्हंटले.. 'अरे वा खरंच छान कल्पना आहे पण जास्त चोरकप्पे नकोच.. शोधाशोध वाढते.. अडचणीचे होते. 'त्यावर त्याच्या चेहऱ्यावर प्रश्नार्थक भाव उमटले.. 'अहो लोक कुठे कुठे असे कप्पे बनवायला सांगतात आम्हाला.. ' मनात म्हंटले बाबा

असे कितीही जरी कप्पे केले तरी जे आपले असते ते आपल्या सोबत राहते.. जायचे ते जात असते.. नकळत मागे झालेल्या घरफोडीची कटू आठवण उचंबळून आली.. नकोच आठवण सुद्धा..

अहोजी वैतागतात कधीकधी आणि म्हणतात आख्खे मोठे कपाट त्यात तुझ्याच वस्तू सगळ्या आणि माझे दोनच कप्पे त्यातही ही इस्त्री केलेली साडी कशी काय आली?.. मी उत्तरादाखल काहीच बोलत नाही कारण बाईपणाचा पसारा असतोच इतका सारा त्याला मी तरी काय करणार.. हौस ना जीवाला.. असो.. मुले लहान होती तेव्हा त्यांच्या अभ्यासाच्या पुस्तकांचा कप्पा आवरायचे.. दोघेही छान कप्पा आवरून ठेवायचे.. त्यात सोहमची कप्पा आवरायची पद्धत अशी असायची.. तो त्याच्या नसलेल्या वस्तू बाहेर फेकायचा की झाला कप्पा आवरून.. मग आपण तो पसारा आवरायचा.. नको ते फेकता आलेच पाहिजे हे लहान वयात त्याला कळले होते.. आमच्या लहानपणी शाळेसाठी खाकी दप्तर आई शिवून द्यायची त्याला कप्पा हवाच असा आमचा आग्रह असायचा.. पूर्वी प्रवासात जातांना ओळखीच्या काकू परकराला आतल्या बाजूने दागिने

ठेवायला चोरखिसा शिवायच्या आणि दागिने ठेवायच्या. साध्या पर्सला पण आतले चोरकप्पे असतातच..

पूर्वीच्या काळी राजमहालाला गुप्तद्वार असायचे.. भिंतीला कोनाडे आणि कोनाड्यात चोरकप्पे असायचे.. तिथे भुयारही असायचेच ना.. किती किती गुपिते दडली असावी ना त्यात.. !

खरंच असे कप्पे प्रत्येकाच्या आयुष्यात देखील असतात नाही का.. ! विचारांती लक्षात आले की जन्माला आल्यापासून असे अनेक कप्पे आपण नकळत सांभाळत असतो आणि त्यांची इतकी सवय होवून जाते की आयुष्याचा तो एक कप्पा आपण नकळत सांभाळून ठेवतो.. कधीतरी उघडावा तो आठवणींचा कप्पा आणि माराव्यात स्वतःशीच मनमुराद गप्पा.. मैत्रीचा एक सुखद कप्पा असतो.. कर्तव्य-जबाबदारी सांभाळणारा एक कप्पा असतो.. समूहामध्ये मैत्री आपली सगळ्यांशीच असते पण एखादी मैत्रिण जास्त आपुलकीची विश्वासाची वाटते.. आपला गप्पांचा एक कप्पा तिथे हमखास असतोच असतो.. नातेसंबंधातही असेच असते.. काही लोकांशी आपले विशेष सूर जुळतात.. काही लोक आयुष्यात बिनकामाची लुडबुड करतात आणि मनःस्ताप देत राहतात.. त्यांचाही एक कप्पा असतोच तो चुकूनही उघडायचा नसतो.. विखारी डंख मारणारी ही माणसे आयुष्यात डोकावत

असतात त्यांचे उपद्रवमूल्य कधीच कमी होत नाही.. चांगलेवाईट असे दोन कप्पे असतात आयुष्याचे.. चांगली माणसे एका कप्प्यात तर वाईट एका कप्प्यात.. त्यांचे कप्पे बदलतही जातात.. अदलाबदल होत जाते शेवटी काय तर आयुष्य प्रवाही राहणे महत्वाचे ठरते.. माणसं ओळखता आली की झाले.. सुदैवाने माझ्यासाठी चांगल्या माणसांचा कप्पा भरून गेला आहे त्याबद्दल देवाचे आभार मानलेच पाहिजे.

असावाच फक्त दोघांचा कप्पा त्यात नसावी कुणाचीच लुडबुड.. आता हेच पहा ना लग्नाला तीन दशके उलटून गेली तरी तिला कळेच ना की नवऱ्याने खास माझ्यासाठी कप्पा राखला आहे की नाही?प्रेम तर आहे त्याचे खूप.. '.. तिच्याकडे होता त्याचा खास कप्पा पण त्याने मात्र सर्व नातेवाईकांना त्यात बसवले होते.. तिच्याशी कुणी कसेही वागले तरी हिने चांगलेच वागले पाहिजे अशी त्याची अपेक्षा.. तरच तो चांगले वागणार.. ती झुकतच गेली पण आता तिचेही स्वत्व जागे झाले होते.. फक्त आपल्या दोघांचे जग का असू नये असं राहून राहून वाटत रहायचं.. त्याचा इतरांसोबत असलेला कप्पा तिला मान्य होताच कारण ती नंतर आली होती त्याच्या आयुष्यात.. कळकळीने म्हणायची आपलं दोघांचं नातं पण तितकंच महत्वाचे नाही का..?.. तर त्यावरून

लक्षात येते की कप्पे अलिप्त ठेवणेही किती महत्वाचे आहे.. एखादी चांगली व्यक्ती गैरसमजाने दुरावा ठेवते तेव्हा असं वाटत राहते आपण तर नात्याचा समृद्ध कप्पा आजवर सांभाळला ना मग अचानक कुणाच्या तरी हस्तक्षेपाला वाव कशाला हवा?.. प्रत्यक्षच विचारले असते ना दुराग्रहाबद्दल.. मग कप्पा अचानक बंद होतो..

तर असे आहे हे कप्पायन..

**10**

# आजा निंदिया रानी आजा दूर सितारोंसे..



घरातील एकेक दिवा मालवला.. आणि तो निद्रादेवीची आराधना करू लागला.. तरीही खिडकीबाहेरच्या प्रकाशाची तिरीप डोळ्यावर येतच होती मग त्याने डोक्यावरून घट्टपणे पांघरूण लपेटून घेतले आणि झोपेला साद घालू लागला... आता झोपेच्या सीमारेषेवरील तो स्वतःला सूचना देवू लागला.. निदान पाच तास तरी झोप झालीच पाहिजे.. दिवसभराच्या कष्टाने थकलेली गात्रे आता शिथिल होवू पाहत होती कारण उद्या त्यांना परत नव्या दिवसाचे स्वागत करायचे होते.. हा आपला अंधाराला कवटाळू पाहतोय पण मनातला दिवा काही केल्या विझवता येत नाहीय.. डोळे बंद केले तरी आत चांदण्यांची लुकलुक आहेच.. तिथे उजेडच उजेड आहे.. मन टक्क जागे आहे.. विचारांचा लखलखाट आहे.. विचारांचे प्रवाहीपण आहे.. विचार मग ते चांगले वाईट असे सर्व प्रकारचे आहेत.. नानाविध ताणतणाव फेर धरत नृत्य करत आहे.. वाढती स्पर्धा आणि त्यामुळे स्वतःचे स्थान अढळ करण्यासाठी करावी लागणारी मेहनत..

स्वत्वाच्या भावनेतून नकळत झालेले जिव्हारी अपमान हे सारे सारे त्याला त्या क्षणी आठवत होते.. आपले नेमके काय चुकत आहे ह्या विचारात तो हरवून गेला आहे.. आपले हेतू तर खूपसे उदात्त होते तरी लोक मला चुकीचे का समजत असावे हे त्याच्या भाबड्या मनाला उमजत नव्हते.. काय आणि कसे समजून सांगावे काही केल्या विचारांचा गुंता सुटत नव्हता. हेही कळत होते की जे लोक मनाने चांगले असतात ते नेहमीच समजून घेतात आणि त्यांना स्पष्टीकरण देणे गरजेचे नसते.. चुकीच्या लोकांना कितीही जीव तोडून सांगितले तरी ते निरर्थक असते…पापभिरू आणि कुणाला शब्दानेही न दुखवणारा तो आज विचारांच्या जंजाळात अडकला होता.. मन आनंदी असले पाहिजे हे समजत असूनही तो फारसा आनंदी नव्हता.. विचार आणि फक्त विचार.. एका विचाराचे बोट धरून दुसरा विचार मग त्याचे बोट धरून तिसरा विचार अशी विचारशृंखला त्याला छळत होती.. दिवसभर विचार करायला वेळ मिळाला नाही आणि आता मात्र विचार त्याचा पिच्छा सोडत नव्हते.

मनात अशी एखादी कळ असायला पाहिजे होती जी दाबताच मन झोपेसाठी तयार व्हावे.. श्रांत होवून जावे.. सूचनांचे मग पालन झाले असते.. म्हणजे जर त्याने ठरविले की आता रात्रीचे अकरा

वाजले आहेत आणि मला ह्या क्षणी गाढ झोपायचे आहे तर पापण्यांनी लगेच मिटून घेतले असते.. क्षणार्धात तो झोपेच्या स्वाधीन झाला असता आणि पापण्यांच्या आड स्वप्नांची वसाहत सजली असती.. पण तसे होत नाहीय.. त्याची स्वतःवर प्रचंड चिडचिड होत आहे.. आठवणींचा कंदील आता बाहेरच्या काळोखाला पळवून लावत आहे.. त्या कंदिलाच्या उजेडात डोळ्याला डोळा लावणे अवघड झाले आहे.. पापण्या जडावल्या पण मिटता मिटत नाही त्यामुळे तो हतबल झाला आहे.. नेमके हे कशामुळे होत असावे ह्या विचारात तो हरवून गेला आहे.. आठवणींचे दिवे प्रकाशतात तेव्हा जाणिवांना खाडकन जाग आलेली असते.. मनाच्या सांदीकोपऱ्यात साचलेली काजळी ह्याच दिव्यामुळे तयार झालेली असते.. आता तरी तिने अंधाराला शरण जावे ना पण तसे होत नाहीय.. तो टक्क जागा आहे.. बाहेर घड्याळाचे टोल पडत आहे.. घड्याळ आपले काम करत आहे आणि हा अस्वस्थ जीव निद्रानाशाच्या जाळ्यात सापडला आहे.. जगण्याच्या लढाईत त्याला यशस्वी व्हायचेच होते.. झोप नाही झाली तर ओघाने डोकेदुखी, थकवा आलेच जे त्याला नको वाटत होते.. झोपडीत राहणारा कामगार शांत झोपू शकतो मग त्याचाही हेवा वाटला.. वयाच्या प्रत्येक वळणावर जाणवणारी असुरक्षितता त्याला छळत होती.. ह्याला सात गाद्याखालील वाटाणा तर टोचत

नाही ना..?सगळे शेवटी आपल्या मानसिकतेवरच असते.. मन खंबीर केलेच पाहिजे.. त्याने डोळे जाणीवपूर्वक मिटले आणि बघताबघता तो बालपणीच्या राज्यात गेला..

'बाळा झो झो रे.. ' 'नीज रे लडिवाळा' लहान असतांना आजी नाहीतर आई छानशी गोष्ट रंगवून सांगायची तेव्हा झोप अगदी घेरून यायची.. 'निजल्या तान्ह्यावरी माऊली.. 'हे गाणे अर्थपूर्ण वाटू लागले होते.. आई प्रेमळपणे थोपटत जायची आणि त्याला झोपेची गुंगी यायची.. 'आज माझ्या पाडसाला झोप का ग येत नाही.. '. तान्हा असतांना कधीतरी खूप वेळ झोपायचा तेव्हा घरात कुणालाच करमायचे नाही.. आई म्हणायची अगदी महाभारतातील कुंभकर्ण आहे.. रम्य दिवस असतात बाळ असतांनाचे जेव्हा आई अंगाईगीत गात बाळाला झोपवत असते.. लोरी ऐकत बाळ निद्राधीन होते.. 'निंदिया आ जा रे आ जा.. ' 'सुरमई आखीयो मे .. सपना दे जा रे.. प्रेमात पडल्यावर तर सगळ्यात आधी झोपेवर हल्ला होत असावा.. 'राम करे ऐसा हो जाये मेरी निंदिया तोहे मिल जाये.. 'किंवा'निंद चुराई आपने.. ' मुझे निंद ना आये' इत्यादी इत्यादी.. ' शाळेत बालसंस्कार वर्गात श्लोक शिकविले होते तेही त्याने म्हणून पाहिले.. 'सुसंगती सदा घडो सुजनवाक्य कानी पडो . कलंक मतिचा झडो विषय सर्वथा नावडो.. ' आजी मंत्र म्हणायची..

अजूनही ते शब्द आठवतात.. 'शांताकारं भुजगशयनं पदमनाभम सुरेशम'.. झोप यावी म्हणून सगळे प्रयत्न होते.. रटाळ पुस्तक वाचावे का हा विचार डोक्यात आला पण उठायचा कंटाळा आला.. अतिवापराने डोळ्याला त्रास होतो म्हणून मोबाईल तर नकोच मग त्याने मनोमन ठरविले की आता ऑफिस संपल्यानंतर चालण्याचा व्यायाम सुरू केला पाहिजे.. शरीर थकले की मन पण शरण जाईल आणि झोप येईल.. प्रदीर्घ ओंकारसाधना सुरू करावी असा निग्रह केला तेव्हा त्याला थोडे पेंगुळल्यासारखे वाटू लागले.. दिवसभरातील मनाला समाधान देणारे प्रसंगाची उजळणी करत गेला.. कटू प्रसंग जाणीवपूर्वक मनातून दूर सारण्याचा प्रयत्न केला.. परत वाटले की मनात एक स्विचबोर्ड हवा होता जो हवा तसा वापरता येईल.. आयुष्य जसे काही एक उपकरण बानू पाहत होते.. कामापुरते स्वार्थासाठी जग माणसाला जवळ करत असते हे कटू सत्य त्याला अस्वस्थ करत होते आणि झोप अधिकच त्याच्यावर रुसत होती.. दूरवर क्षितिजावरील चंद्र झुकला.. पहाट फटफटू लागली तेव्हा त्याला झोप अनावर झाली आणि तो झोपी गेला.

खरंय.. झोप म्हणजे माणसाला मिळालेले मोठे वरदानच म्हणावे लागेल.. श्रम परिहारासाठी ठराविक तासांच्या झोपेची आपल्याला नितांत आवश्यकता असते.. चोवीस तासातील आठ


तास झोप म्हणजे आपले एक तृतीयांश आयुष्य झोपेत व्यतित होत असते.. जागतिक स्तरावर झोपेचे महत्व मान्य आहे त्यासाठी 16 मार्च हा दिवस जागतिक निद्रा दिन म्हणून साजरा केला जातो.. दिवसभराच्या धावपळीतून काहीशी काही तासांसाठी मुक्तता मिळत असते.. झोप झाली की आपण ताजेतवाने होत जातो.. काहींना दुपारच्या जेवणानंतर वामकुक्षी हवी असते.. ही पॉवरनॅप त्यांना उर्जा देत असते..

झोपेतही आपले सुप्त मन सदैव जागे असते.. काही लोक मोठमोठ्याने घोरतात पण आजूबाजूच्या वातावरणाची नोंदही झोपेत घेत असतात.. काहींची झोप सावध असते जी जराश्या आवाजाने मोडते.. झोपेचे सोंग घेतलेल्या व्यक्तीस जागे करणे अवघडच असते.. झोप आणि जागृतावस्था ह्यात आपण हरवून जातो.. झोपेच्या तंद्रीच्या अवस्थेत आपण आपली स्वप्ने पाहत असतो.. चेतन मन गप्प असते तर अचेतन मनाचा कारभार सुरू असतो.. ते कधीच झोपत नसते.. त्याला सुचना देताच ते कामाला लागते.. अचेतन मनाशी गप्पा मारायला ही सर्वात उत्तम वेळ असते.. आपली स्वप्ने आणि वास्तव ह्यात नक्कीच ताळमेळ असला पाहिजे.. झोप आपली आणि स्वप्ने दुसऱ्यांची असे काहीसे अनाकलनीय गणित असते.. आपण कल्पना करू शकतो ही मोठी

शक्तीच समजावी लागेल.. आपण स्वतःला जिथे कल्पनेत चित्रित करत असतो अगदी तसेच प्रत्यक्ष आयुष्यात घडत असते.. अशा वेळेस सकारात्मक संवाद गरजेचा असतो.. स्वप्नांची मालिका एखाद्या चलत चित्रपटाप्रमाणे आपण पाहत असतो.. स्वप्ने सुखावह असतात तर कधी खूपशी भयप्रद देखील.. सगळ्यांनाच स्वप्न पडतात असे नाही.. काहीशा भावनाशील संवेदनशील मनाला स्वप्न पडत असते.. काही स्वप्ने तर कधी संपूच नये असे वाटत राहते.. मनी वसे ते स्वप्नी दिसे असे म्हणतात.. पण तसही नसावे कारण एखादे स्वप्न अगदीच अनाकलनीय असू शकते.. काळजातील व्यक्ती ओझरते दर्शन देते ज्यांच्याबद्दल विचार करायला दिवसभरात वेळही मिळालेला नसतो.. मनाच्या तळाशी जे साचलेले असते ते अवचित स्वप्नात भेटत जाते.. झोपमोड झाली की स्वप्ने खंडित होतात.. जाग येते तेव्हा आपण वास्तवाचे बोट धरलेले असते.. स्वप्ने तर असंख्य असतात.. कधी कधी उघड्या डोळ्यांनाही ती पडत असतात.. ते एक मृगजळही असू शकते.. कदाचित ती एक जगण्याची धडपडही असू शकते.. सुखद स्वप्नांची सफर हवी तर झोप आलीच पाहिजे.. नाही का.. !

## 11

# शब्दावाचून कळले सारे शब्दांच्या पलीकडले..



गणपतीला जास्वंदीच्या कळ्यांचा हार खुप खुलून दिसत होता.. ही तर लालचुटुक रंगाची मुकी जास्वंद.. किती विविधता असावी ना निसर्गाकडे की हे फुल असेच आणि इतकेच फुलत असावे आणि मोहकता अशी ठासून भरलेली.! मुकी जास्वंद पाहून मला संगीतकार आणि गायक श्रीधर फडके ह्यांच्या गाण्याच्या ओळी आठवल्या..

’काही बोलायचे आहे पण बोलणार नाही.. देवळाच्या दारामध्ये भक्ती तोलणार नाही..

माझ्या अंतरात गंध कल्प कुसुमांचा दाटे.. पण पाकळी त्यांची, कधी खुलणार नाही.. ’

माझ्या मनात सहज आले की असे किती तरी अव्यक्त मुकेपण जगात असावे.. काही बोलण्याआधी शब्द मुके होऊन जातात.. परवा एक पंचात्तरीच्या आजी म्हणाल्या माझे मेलीचे मुके दुखणे

आहे.. अंगात सतत कणकण असते.. अंग दुखते पण ताप कधी येत नाही म्हणजे त्यांना असा म्हणायचे होते की मी दिसते अशी ठणठणीत पण माझे मलाच माहित मुके दुखणे.. मी परत विचारात पडले.. मुके दुखणे म्हणजे काय असावे बरे? खरच की बरेच वेळा असे होते की निबोलका माणूस बोलतच नाही.. मनातले शल्य ओठावर येवू देत नाही आणि त्याची वेदना मुकी राहते.. जगाला वाटते काय सुखी माणूस आहे.. पण दिसते तसे नसते हेच खरे.. अपघातात रक्तपात दिसला की आपण भयंकर दचकतो पण तितकाच त्रासदायक मुका मार असतो जो जावे त्याच्या वंश त्यालाच कळते..

आतड्याची माया सुटता सुटत नाही.. पोटच्या लेकराची तगमग पाहवत नाही.. विशेषतः लग्न झालेल्या मुलीला अप्रत्यक्ष सासुरवास असला तर तो चारचौघांमध्ये सांगताही येत नाही.. म्हणतात ना मान सांगावा जगात आणि अपमान ठेवावा मनात.. मनाच्या तळघरात सारे काही डांबून ठेवावे लागते त्यात खुपसे शल्य असते.. न सांगता येणारे काही अपमान असतात.. पराभव असतात.. जे चारचौघांमध्ये सांगता येत नाही.. कपोकल्पिताला आपण घाबरत असतो आणि निमूटपणे सहन करतो.. काही सुशिक्षित घरांमध्ये मुका ताणताणाव असतो.. कमी शिकलेला

अडाणी माणूस तरी आरडाओरडा करून गल्ली जमवतो.. मोठमोठ्याने भांडतो पण तथाकथित मानापमान कवटाळत सृजन आर्त मुकेपणात हरवून जातो. अवघड जागेचे दुक्ख म्हणून आपण सोडून देतो.. अफाट शब्द्जंजाळातून शब्द सापडू नये इतके मुकेपण त्या भावनांना असते.. जणू काही शब्दावाचून कळले सारे शब्दांच्या पलीकडले.. निशब्द सारे खूप काही बोलून जाते... मुकेपणात गूढ गह्नीय अर्थ भरलेला असतो.. जसे सहजीवनाची पंचविशी ओलांडली की आपोआपच समजते की आपल्या जोडीदाराला नेमके काय आवडते.. त्याची आवडनिवड काय आहे? किंवा आज तो असा रुसून का आहे? नेमकी कुठली गोष्ट त्याला खटकते आहे त्यासाठी शब्दांची गरज नसतेच.. वर्षानुवर्षाच्या सहवासाची ही किमया असते... मुकी अबोल प्रणयभावना एकमेकांच्या प्रेमात अखंड बुडलेल्या प्रेमीजनांना असते.. कवी सहजतेने म्हणतो.. ’शब्द मुके होतात तेव्हा नजर तुझी बोलते.. शब्दांची घागर भरते आणि मनातले राज खुलते.. ’.

त्या दिवशी माझ्याकडे काम करणारी आरती मला हाक मारत म्हणाली, . पहा ना मागच्या जंगलात पाच-सहा लोक खड्डा खणत आहे.. मी एकदम हबकले.. आधीच काहीबाही दूरदर्शनला

पाहिलेले असते तेच एकदम आठवले.. पाहिले तर त्यात शेजारचचे शेतमालक आणि त्यांची माणसे होती.. दोघांनी गोणपाटाची झोळी करून त्यात काळेकाळे काहीतरी आणले.. आरती म्हणाली अहो हे त्यांच्या म्हशीचे पिल्लू आहे.. थंडीने मेले असावे.. मला एकदम कसेसे झाले.. मोकाट कुत्र्यांपासून सुरक्षा म्हणून त्या रेडकूला मातीत गाडत असावे... कालपरवा तर जातायेता ते अशक्त रेडकू मी पाहिले होते.. शेवटी काय एक जीव गेला ना वाईट तर वाटणारच.. मी सहज दुसर्या बाल्कनीत जावून गोठ्याकडे पाहिले तर त्याची आई म्हणजे ती मोठी म्हैस शांतपणे पुढ्यात काय ते खात होती... खरच हिला काहीच कल्पना नसेल का?.. की मुका जीव कसा दर्शवणार दुक्ख.. थोड्यावेळाने म्हशीचा रेकण्याचा आवाज आला.. मला राहवले नाही.. मी तिच्या मालकाला म्हंटले की कसे काय झाले हो.. ते म्हणाले आधीच अशक्त त्यात थंडीने गारठले.. रात्री जास्तीचे गोणपाट टाकायला इसर पडला.. मोठी म्हैस परत शांत होऊन गेली होती.. मालक म्हणाले काही नाही फार तर दोन दिवस वरडेल मंग शांत हुईल.. हे सारे ऐकून मी मात्र खूप व्यथित झाले आहे... माणसासारखे जनावरांनाही असतीलच ना भावभावना.. मग तरी अस का.. काय करू?... सारखे त्या गोठ्याकडे लक्ष जात आहे.. दुभती म्हैस दुध देत राहिली.. तिचे कुणी सांत्वन पण नाही करत.. रोज दिसणारे बच्चू आता तिला

नक्कीच दिसणार नाही.. एकटीच सोसत असेल का.. मुका जीव बिचारा.... लहानपणीची गोष्ट आठवली जेव्हा मावशी सासरी गेली तेव्हा कपिला गाय कुणालाच दाद देत नव्हती की चार्याला तोंड लावत नव्हती.. ती जणू काही सवयीप्रमाणे मावशीची वाट पाहत असायची.. शाळेत एकदा स्नेहसंमेलनाला आम्ही दूरदर्शनवरील मुकबधीर लोकांसाठी असलेल्या बातम्या हातवारे करून सादर केल्या होत्या आणि खुप वाहवा मिळवली होती.. मोठेपणी आता ती वेदना समजते आहे.. धन्याचे दुक्ख पाहून व्यथित होणारे इनामदार श्वान आपण पाहत असतो.. शिवाजीमहाराजांच्या चितेत उडी घेणारा वाघ्या नावाचा कुत्रा आपल्याला माहित आहेच.. मुकी पाखरे.. मुकी जनावरे.. मुकी झाडी.. मूकपणाने ही बरेच काही बोलून जातात नाही का?...

मुकेपणाबद्दल लिहितांना शब्द मात्र सजीव होऊन पुढे सरसावले.. मुके शब्द शुभ्र कागदावर आरामात पहुडले..

# 12
# क्षण निरोपाचा..



आज तिला अचानक मोबाईलला त्याचा संदेश आला की मी काही दिवसांसाठी कॅनडाला एका कॉन्फेरेंसनिमित्त जात आहे… त्याच्या आठवणीने तिला एकदम भरून आले.. डोळ्यातून टपकन दोन अश्रू टपकले.. तिला पुढचे काही वाचता येईनासे झाले.. तिला स्वतःबद्दल आश्चर्य वाटले की ह्या काळजात त्याच्याबद्दल इतके प्रेम कसे काय सामावलेले असावे की तो इथे काही दिवस नसणार तर एकदम जीव घायकुतीला यावा.. तसेही ते दोघे इतके व्यस्त असायचे की एका शहरात असून कैक दिवस कैक महिने प्रत्यक्ष भेट होत नव्हती कारण ते शक्यही नसायचे आणि दोघांकडून भेटीचा अट्टाहासही नसायचा.. दोघे एकमेकांशी निखळ मैत्रीच्या नात्याने बांधले गेले होते.. मनाच्या तळाशी केवळ एक नितांत प्रेम भावना असायची की तो आहे इथेच कुठेतरी आसपास भले नजरेला न पडू दे.. आपले कुणीतरी आहे ही भावना किती आश्वस्त

असते की त्या भावनेला कशाचेही लेबल लावायला नको वाटते.. खुपसे उत्कट अन जगराहाटीपेक्षा आगळेवेगळे त्यांचे नाते होते.. आणि आता त्याच नात्याची जाण ठेवत त्याने तिला कळवले होते.. काय सांगावे कळवले नसते तर तिला कळलेही नसते.. आता तो परत इकडे येईपर्यंत हुरहूर वाटत राहणार.. सगळ्यांमध्ये असूनही खुपसा एकटेपणा ती अनुभवणार होती.. पण जास्त शोधाशोध दोघांना नको होती.. तिनेही हैप्पी जर्नीचा मेसेज पाठवून दिला.. डोळे मात्र सारखे भरून येत होते..

अशीच आणखी निरोप घेण्याची एक गोष्ट .. आज ती बाहेरगावी जायला निघाली.. दहा तासाचा कारप्रवास कुटुंबियांसमवेत करावयाचा होता.. सामानाची आवराआवर झाली आणि ती हातात फोन घेवून बसली.. अगदी जवळच्या मैत्रिणींना तसेच काही काळजातील लोकांना तिने आवर्जून सांगितले मी अशी अशी ह्याह्या कारणाने इतक्या दिवसांसाठी बाहेरगावी जात आहे.. मलाही फोन आला हे सांगायला.. तिने मला जवळचे समजून सांगितले त्यामुळे माझेही मन भरून आले. नकळत मैत्रीची गाठ अधिक पक्की झाली.. ती म्हणाली की अग हो कानावर घातले पाहिजेच ना ग जरी आपण नेहमी भेटत नसलो तरी.. अप्रत्यक्षरीत्या जणू दुसरेच स्वर लागत होते की काय सांगावे

दूरच्या प्रवासाला निघालो आहे.. घराबाहेर पाऊल टाकल्यावर सगळीच अनिश्चितता काळजाला भेदून जाते.. नकळत मन थोडे हळवे होवून जाते.. आपल्या माणसांचा काही काळापुरता विरह होत असतो.. माझी आणखी एक सखी तिचे माझे हे लहानपणाचे गाव नवऱ्याच्या बदलीनिमित्त सोडून जाण्याची वेळ आली तेव्हा तीही अशीच भावूक होऊन गेली.. तिची माझी फोनभेट तुरळक असायची.. तिने ही फोनवरून निरोप घेतला.. तिला थोडे वाईट वाटत होते पण तिला राहते शहर सोडून जावे लागणार हे मात्र नक्की होते.. घरातून निघतांना येतो म्हणयचे असते.. ऐशी वर्षाच्या आईला साठीतला मुलगा घराबाहेर पडतांना येतो ग आई असे म्हणतो तेव्हा आई नकळत म्हणते नीट जा हो.... जेष्ठ पिढी लेकीसुनांना सांगत असते काही पद्धत आहे की नाही सांगून जाण्याची?.. नेहमी सांगून मग घराबाहेर पडले पाहिजे.. मी पणाच्या भिंती तसेच आत्मकेंद्रित वृत्ती ह्यामुळे तुम्हाला काय घेणे देणे असे सरळ सरळ भाव चेहऱ्यावर दिसून येतात..

मागे माझ्या परिचयाच्या एका वाचकआजींचे अचानक निधन झाले.. खरेतर रोज मी म्हणायचे आज कसेही करून आजींना भेटायचेच पण शेवटच्या भेटीचे योग नसावे.. आजी एकट्याच

राहायच्या.. अधूनमधून कधी परदेशातल्या मुलांकडे तर कधी बाहेरगावी नातेवाईकांकडे राहायला जायच्या.. प्रत्येक वेळेस मला सांगून जायच्या की नाहीय बरे का सध्या मी घरी नाहीतर तू फोन करशील .. त्यांच्याकडे मोबाईल नसल्याने दुरध्वनीवर बोलणे व्हायचे.. माझ्या प्रत्येक लिखाणाबद्दल त्या भरभरून बोलायच्या.. मलाच त्यांना वेळ देता येत नव्हता म्हणून हुरहूर वाटायची .. आज त्या नसल्याचा निरोप आला आणि डोळे भरून आले.. नेमके त्या दूरच्या प्रवासाला निघतांना माझा निरोप घेण्यास कशा बरे विसरल्या असतील? लहानसहान गोष्टीत एकमेकांचे निरोप घेणारे आपण सर्व तेव्हा अगदी हतबल असतो.. जगण्याच्या भर मैफिलीतून मृत्यु आपल्याला अलगद उचलून नेतो.. आणि निरोप घ्यायचे राहूनच जाते..

असा हा निरोप... असा हा मनीचा संदेश.. पुढच्या भेटीची बीजे पेरणारा निरोप.. एखादा तीन-चार वर्षाचा चिमुरडाही शाळेच्या बसमध्ये बसल्यावर कितीतरी वेळ आईला टाटा करत राहतो.. माहेरचे पाश सोडून सासरी निघालेली लेक पुन्हा पुन्हा परतून बघते..

‘ बघू नकोस मागे मागे लाडके बघ पुढे..

नकोस विसरू परी आईला .. जा.. जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा.. '.. लाडक्या लेकीला निरोप देतांना आईच्या डोळयात गंगा जमुना उभ्या ठाकतात.. पितृह्रुदय ही लेकीला निरोप देतांना कळवळते.. हे गाणे ऐकून गहिवरला नाही असा एकही मुलीचा बाप जगात नसेल..

' बाबुल की दुवाये लेती जा..

जा तुझको सुखी संसार मिले.. '


एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडालेले प्रेमीजन गुणगुणतात.. 'पाखरा जा दूर देशी.. सांग माझा निरोप माझ्या साजणा.. 'किंवा 'अच्छा तो हम चालते है.. '.. 'कल की हसी मुलाकात के लिये . आज रात के लिये . हमतुम जुदा हो जाते है.. अच्छा तो हम सो जाते है.. '.. प्रियकराला संदेश देणारे कबुतर असतेच गाण्यात .. कालिदासाला तर त्यासाठी मेघदूत गवसला होता.. निरोप घेणे असह्य होते... सायोनारा सायोनारा करत ती त्याला टाटा करत राहते.. दिन सारा गुजरा तोरे अंगना. अब जाने दो मुझे मोरे सजना ह्यावर तो ही म्हणतो.. मेरे यार शब्बाखैर.. मेरे यार शब्बखैर.. भावनांचा तो भुकेला असतो आणि म्हणतो 'कभी अलविदा ना कहना... चलते चलते.. 'हा निरोप बघा सख्या पांडुरंगालाही द्यायचा असतो कारण त्याच्याशी भक्ताचे जिवाशिवाचे नाते

जडलेले असते.... 'एवढा निरोप सांगा सख्या श्रीहरीला.. '.. निरोप निशब्दपणेही घेतला जातो.. निरोप निखळही असतो..

.. शिक्षणासाठी घराबाहेर पडणारे मूल घरापासून विलग होते तेव्हा निरोप घेतांना मन जडजड होवून जाते.. परदेशात वास्तव्य असलेल्या पण कधीतरीच मायदेशी भेटीसाठी येणाऱ्या लेकरांना निरोप देतांना विमानतळावर अश्रूंचा बांध कोसळतो.. असे कितीतरी निरोपाचे प्रसंग आपल्या आयुष्यात येत असतात.. सेवानिवृत्त होतांना निरोपाचा नारळ स्वीकारतांना मनात संमिश्र भावनांचा कल्लोळ उठतो.. खुर्चीचा निरोप घेतांना खुप काही हरवल्यासारखे वाटत राहते.. लेखक मंडळींना आवडत्या वर्तमानपत्रात लिहित असलेल्या सदरचा अचानक निरोप घ्यावा लागतो.. सारे काही आपल्या संवेदनशीलतेचे खेळ असतात. व्यवहारी जगाला त्याची जाण असतेच असे नाही..

# 13

# भेटी लागी जीवा लागलीसे आस..



'अय्या अग किती दिवसांनी भेटतोय आज.. खूप आनंद झाला आहे.. ये ना ग घरी.. जवळ तर राहतो आपण.. आपले म्हणजे दोन डोळे शेजारी पण भेट नाही.. हो ना'

'या या एकदा घरी.. वाट पाहतोय आम्ही.. :

'हे घ्या माझे कार्ड.. त्यावर घरचा पत्ता आहे.. नक्की या बरं का.. '

'काय तू.. इतक्या वर्षांमध्ये माझ्या घरी आली नाहीस..?आता जरा मुहूर्त काढ आणि ये निवांत.. '

'काय सांगता काय.. आमच्या गावात आले आणि आमचे घर विसरले तुम्ही.. काय हे राव.. यायचे ना हक्काने.. '

'जा बाई नाही बोलणार तुझ्याशी.. माझ्या घराजवळ आली होतीस आणि घरी नाही आलीस ते.. '

'यायचे हो घरी.. त्यानिमित्ताने ओळखपरिचय वाढतो.. शब्दांची देवाणघेवाण होते.. क्षेमकुशल कळते.. '

असे आणि अशा प्रकारचे संवाद अगदी सहजतेने आपल्या कानावर पडत असतात.. शब्दांची साखरपेरणी काळजाला सुखावते.. असे वाटते की जग किती सुंदर आहे.. आजही नात्यात पूर्वीचा ओलावा आहेच.. आमंत्रणात कधी केवळ औपचारिकता असते तर कधी अंतरीची कळकळ देखील असू शकते.. आपण अगदी सहजतेने एकमेकांना घरी बोलवत असतो कारण आपल्याला त्या व्यक्तीबद्दल आपुलकी देखील असते.. आपले छानसे सजवलेले हसरे घर अतिथीच्या आगमनाने प्रसन्नपणे हसू लागते.. घराला घरपण येत जाते.. घराला चक्क जाग येते.. निर्जीव वस्तूला सजीवता जाणावी इतके त्यात भावनांचे भारावलेपण असते.. मला नेहमीच प्रश्न पडतो की हे आमंत्रण पोटातून असते की ओठातून..? पण असो.. लोक तोंडदेखले का होईना पण असे मधाळ बोलत असतात.. अजूनही आपल्या भारतात अशा प्रकारे सहजच एकमेकांना एकमेकांकडे बोलवतात हेही नसे थोडके.. !काही आचारविचार असतात.. एटिकेट्स देखील असतात हेही मान्य आहे त्यासाठी व्यस्त लोकांची पूर्वनियोजित वेळ ठरवून घेणेही गरजेचे असते.. कारण एकदम कुणी पाहुणे येऊन धडकले

की गडबड गोंधळ होतोच होतो.. खरंच कुणी प्रत्यक्षात दारात दत्त म्हणून हजर झाले की तारांबळ नक्कीच उडते.. पण लोक येतजात राहिले की सामाजिक जाणीवा समृद्ध होतात.. इकडचे तिकडचे इतिवृत्तांत समजते.. जगात काय चालले आहे ह्याबद्दल सावध कानोसा घेतला जातो.. हल्ली काय फोनाफोनी सुरू असतेच त्यामुळे सगळ्यांना सगळे काही ठाव असते पण तरीही फोनवर काही ना काही सांगायचे राहूनच गेलेले असते.. संभाषणात आपण त्या व्यक्तीच्या प्रत्यक्ष सहवासात येत असतो.. हस्तालोंदनात आश्वासक स्पर्शाची अनुभूती असते.. आणि त्या मायेच्या हळव्या स्पर्शाने मनाची कवाडे एकदम उघडली जातात.. व्यवहारी जगाला ही भावनांची भाषा समजेलच असे नाही.. तरीही असे भावनांचे भुकेलेपण असतेच असते..

मानव हा समूहप्रिय प्राणी असल्याने त्याला आपल्या आजूबाजूला माणसे असले की आश्वासक आणि सुरक्षित वाटू लागते.. म्हणून तो असा आग्रहाने माणसांच्या कळपात राहू इच्छितो अर्थात काही सन्माननीय अपवाद असतातच.. ह.. तर तेच की आपण एकमेकांना एकमेकांच्या घरी बोलावतो पण प्रत्येक वेळी त्या आग्रहात आत्मीयता असतेच असे नाही.. अनेकवेळा त्यात केवळ औपचारिकता निभावणे असते.. शब्दांचे बुडबुडे

असतात.. केवळ पोकळ शब्द असतात... अहो फोन करून यायचे होते असे हसत हसत ऐकवले जाते.. एकीकडे अतिथी देवो भव असे लाख म्हंटले जाते पण प्रत्यक्षात समोर पाहुणा पाहिला की पोटात गोळे येतात.. किंवा त्याची पाठ फिरली की ह्यांना काही कामधंदा नाही का.. थोडा तरी स्वतःचा मान ठेवावा ना.. उठवळासारखे सगळीकडे जात असतात .. असे का म्हंटले जात असावे ह्यामागे फार मोठी कारणमीमांसा आहे.. हेच की जगण्याचा वेग प्रचंड वाढला आहे.. जगण्यातला निवांतपणा शोधावा लागत आहे.. काहीजण तर कुणी घरात येऊन बसल्यावर दोन शब्द बोलतात आणि आपल्या आवडत्या मालिकेमध्ये गुंगून जातात.. मग बोलते हं तुमच्याशी.. तुम्ही पण पहा ही मालिका असा प्रेमळ आग्रहही होतो.. टिव्ही पेक्षा सजीव माणूस महत्वाचा हे त्यांच्या गावी नसते.. मालिकेतील सुखदुःखे त्यांना महत्वाची वाटतात.. हे सगळे विकतचे दुखणे असते पण त्यांना कोण समजावून सांगणार..? काहींचा पिच्छा ते कर्णपिशाच्च अजिबात सोडत नाही.. घरात आलेली व्यक्ती जी आपला वेळ आर्जवाने मागत आहे त्याकडे सरळ सरळ दुर्लक्ष करत लांबच्या व्यक्तीला मोबाईलद्वारे वेळ दिला जातो हेही खटकतच जाते.. एकच मिनिट बरं का.. इतका फोन आटोपून घेते असे म्हणत ऐसपैस दहा मिनिटे बोलून होतात.. आलेला पाहुणा तोपर्यंत आपले फोन आटोपून

घेतो.. काय राव अहो मी तुमच्या घरी आलो म्हणजे मी काय रिकामटेकडा आहे का..?मलाही व्याप आहेतच असे त्याला नकळतपणे सांगायचे असते.. दोघांच्या फोनाफोनीत प्रत्यक्ष संवाद घुसमटून जातो.. आणि हो मी काय सांगायला आलो होतो हे त्याला आठवावे लागते.. काही केल्या संभाषणाची गाडी मूळ पदावर येत नाही.. नीरस कंटाळवाणी भेट कशीतरी आटोपती घ्यावी लागते आणि मग वाटते की बराय तो फोन ज्यावर निदान आपण कामापुरतेच बोलतो.. वेळेची बचत होते.. भेटीचा अट्टाहास हवाच कशाला..?

त्या दिवशी रविवारची सकाळ होती.. अचानक बेल वाजली तर मनात विचार आला की आता कोण असावे बरे..?पेपरवाला, दूधवाला, कचरा नेणारा, कामवाल्या ताई सगळेच तर येऊन गेले होते.. आपले कान पण सवयीने तयार झालेले असतात.. चाहूल घेतल्यानंतर देखील लगेच कळत असते की कुणाची पावले असावीत ते.. फोन करून जे येतात त्यांच्याशी आपले औपचारिक नाते असते.. आता तर फोनही नाही कुणाचा मग बेल कशी काय वाजली असावी बरं अशा विचारांच्या फाफटपसाऱ्यात मी दार उघडले.. आणि माझ्या आश्चर्याला पारावार राहिला नाही.. दारात माझी काळजातील जीवलग सखी होती.. मधली काही वर्षे ती

नाशिकबाहेर असल्याने प्रत्यक्ष भेटीत आता खंड पडला होता पण मागच्याच महिन्यात ती इकडे परतली होती.. फोनवरून बोलणे व्हायचेच पण प्रत्यक्ष गळाभेटीचा आनंद आगळावेगळाच असतो नाही का..? मी तिला म्हणाले.. 'आज काय सुदिन ग की तुला माझी आठवण आली?.. आज सकाळीच मी चहा पितांना तुझी आठवण काढली होती.. तुला अगदी उकळता गरम चहा आवडतो असे मी नवरोजीला सांगत होते.. ' त्यावर ती स्मितहास्य करत म्हणाली.. 'बघ.. मला टेलीपॅथीने समजले की तू माझी आठवण काढत आहे.. तुमने पुकारा और हम चले आये.. ' मी खूप मनापासून तिचे स्वागत केले आणि गप्पाष्टकात आम्ही रंगून गेलो.. ती काही कामानिमित्ताने ह्या भागात आली होती आणि त्यातच तिने हा भेटीचा हवाहवासा घाट घातला होता.. ती म्हणाली.. 'अग आपली मैत्री वय वर्षे तीन पासूनची आहे.. फोन, मोबाइल आणि व्हाट्सअँप तर आताआताचे आहे.. मैत्रीत कशाला हवी नको तितकी औपचरिकता जी आपल्याला जगात नेहमीच निभवावी लागते पण काही हक्काची अशी नाती असतात की जिथे ही झूल फेकून द्यावी आणि आपण अगदी जसे आहोत तसे स्वतःला ठेवावे.. म्हणूनच फोन न करता मी आले आहे. मी पंधरा मिनिटे आहे तुझ्याकडे.. फारतर तू तुझी सकाळची कामे चालू ठेव आणि एकीकडे गप्पा मार माझ्याशी.. किंवा मी तुला काही मदत करू

शकते का तेही सांग.. '.. तिला थोपवत मी म्हणाले की बैस ग निवांत.. हल्ली असे मैत्रिणीचे अवचित येणे हरवले आहे.. आपण संसारात इतके अडकलेलो असतो की .. जाऊ दे.. नको तेच ते रोजचे पुराण.. त्यावर तीही गप्पांच्या मूडमध्ये आली आणि धुव्वाधार गप्पांचा पाऊस पडला.. तिच्या डोळयातील ऊनपावसाचा श्रावण बरंच काही सांगून गेला.. भरून आलेले आकाश निरभ्र होवून जावे अशी आमची गत होती.. लोक आपल्याला चुकीचे समजतात हे दुःख जवळच्या लोकांनाच सांगता येते ग असे म्हणत ती बोलती झाली.. फोन होतात आपले पण नेमके जे बोलायचे आहे तेच हरवून जाते बघ.. तुला समोर पाहिले की असे अंतरीचे सल उमळून येतात त्याला मी थोपवू शकत नाही.. पंधरा मिनिटांसाठी आलेली ती माझ्या घरी दोन तास रेंगाळली.. गप्पांची ही शिदोरी दोघींना आता खूप दिवस पुरणार होती.. तिला निरोप देतांना लक्षात आले की मला पण मनावर साचलेले मळभ दूर झाल्यासारखे वाटते आहे.. अवचित भेटीचा आनंद अगदी अवर्णनीय असतो हेच खरे.. म्हणूनच त्या भेटीची आस मनात ठेवत प्रत्येकजण म्हणत असतो.. 'या बरं का घरी.. वाट पाहतोय आम्ही.. 'म्हणूनच आपल्या माणसांसाठी जरा वेळ काढायला काहीच हरकत नसते.

# 14

## बोलू कौतुके..



घरातून बाहेर पडल्यावर अगदी प्रत्येकाशीच काही ना काही संवाद साधत पुढे जाणे आता अगदीच अंगवळणी पडले आहे.. त्यात कोपऱ्यावर बसणारी पेरुवाली मावशी असो.. की भाजीवाली शेतकरीण असो.. दुकानदार असो... शेजारीपाजारी असो दोन शब्द खर्च करणे तसे फारसे अवघड नसते.. मग आपोआपच शब्दांची देवाणघेवाण होते जी हल्ली काहीशी पारखी होत चालली आहे.. पण असे म्हणून चिंता व्यक्त करण्यापेक्षा आपण त्यातून बाहेर येण्याचे ठरविले की आपल्यापुरते बरेच काही सोपे होत जाते.. शब्दांचा मुलामा नेहमीच माणसे जोडत जातो.. कधीकधी तर असेही होते की आपण अगदी सहजपणे शब्दांचे लिंपण केलेले असते आणि त्याचा विसरही पडलेला असतो.. एखादी सुहृदयी व्यक्ती मात्र ती शब्दांची पखरण बरोबर लक्षात ठेवते आणि त्या मलमरूपी शब्दांना काळजात जपून ठेवते.. खरे सांगायचे तर व्यक्ती कुठल्याही स्तरातील असो ती आपल्याला नक्कीच काही ना काही शिकवून जाते.. लिहिणाऱ्या हातांना

जगण्यातले विषय मिळत असतात.. जगण्याचा अफाट पसारा शब्दात पकडायचा झाला तर ते केवळ अवघडच आहे.. जगण्याचा केवळ एक कवडसा आपण शब्दबद्ध करत आहोत असे वाटू लागते.

सगळ्यांनाच असे एकमेकांशी सहज बोलणे आवडतेच असेही नाही.. अनेकदा असेही असते की जे लोक आपल्याशी बोलत नाही अशी आपल्याला खंत असते ती खंत देखील अनाठायीच असते.. आपण त्यांच्याशी बोलल्यावर ते अगदी भरभरून बोलतात आणि समजा नसेल त्यांना आवडत तर ज्याची त्याची स्पेस आपण ज्याला त्याला दिलीच पाहिजे.. दरवेळेस अपेक्षांचे डोंगर रचून चालत नाही.. अहंकाराच्या भिंती त्यांनी स्वतःभोवती बांधलेल्या असतात आणि तो त्यांचा प्रश्न असतो.. असो.. लहान मुलांशी बोलण्यात तर कोण आनंद असतो!.. ते तर जणू काही प्रांजळाचे आरसे असतात.. आपली मुले ह्याच टप्प्यांमधून मोठे झालेले असतात ना.. त्यामुळे तो गोंगाटही कधीकधी हवाहवासा वाटतो.. छोट्या मुली पण माझ्या मैत्रिणी होतात.. मला त्यांच्या भावविश्वात छोटे होवून डोकावणे मनापासून आवडते.. त्यांच्यातील लुटुपटूची कट्टीबट्टी बघतांना आपले बालपण आठवते.. किती निर्व्याज आणि निष्पाप जीवन असते की पुढच्याच क्षणी ते एकत्र येतात आणि आनंदाने बागडू लागतात..

त्यांच्याकडूनही मोठ्या झालेल्या लोकांना खूप काही शिकता येणे शक्य आहे... ती छोटी मुलगी मला म्हणाली.. 'आमच्या टीचर शाळा सोडून गेल्या तर मला त्यांची खूप आठवण येत आहे.. 'क्षणभर मलाही गलबलून आले.. त्या चिमुकलीने मनापासून नाते जोडले असल्याने तिला ते जड जात असावे..

आता हेच बघा ना दर वेळेस ती मला लिफ्टपाशी सकाळच्या प्रहरी भेटायची.. जेव्हा मी प्रभातफेरीसाठी बाहेर पडत असे तेव्हा ती शेजारघरी स्वयंपाकासाठी येत असे.. तिची छान स्वच्छ राहणी आणि हसतमुख चेहरा त्यामुळे ती मला नेहमीच खूप आवडते.. मी भेटले नाही की तीही विचारते.. 'काय ताई कधीच्याच भेटल्या नाही तुम्ही..?'आताशी हल्ली हल्ली मात्र ती माझे फिरणे आटोपल्यावर बऱ्याच वेळाने येत असते.. मला राहवलेच नाही म्हणून विचारूनच घेतले.. 'का ग सरुबाई.. इतक्या आरामात येत असते अगदी.. आधी किती धावतपळत यायची की लिफ्ट खाली येईपर्यंत तुला धीर नसायचा.. 'त्यावर सरू तोंडभरून हसली आणि म्हणाली की अहो आमच्या ताई नोकरीवरून निवृत्त झाल्या ना मग माझीही गडबड संपली.. आधी त्यांना मस्टर गाठायची घाई असायची मग मलाही लवकर यावे लागायचे.. ताई मोठ्या ऑफिसर ना.. मग मी स्वयंपाकघर सगळेच सांभाळायचे.. त्यांचा नाश्ता मग दोघांचे टिफिन आणि संध्याकाळच्या स्वयंपाकाची तयारी पण करून

जायचे ना.. मग वेळेतच सगळे हवे असायचे.. आता थोडेफार इकडेतिकडे झाले तर चालते.. ताई आमच्या फार शिस्तीच्या आहेत बरं का.. '

सरुचे ताईपुराण सुरू झाले.. ताई आहेतच तशा चांगल्या कारण त्यांना सरूच्या योगदानाची पुरेपूर जाणीव होती.. त्या म्हणायच्या देखील की सरूमुळे मी ही इतकी जबाबदारीची नोकरी करू शकले.. ती केवळ पगाराची अपेक्षा ठेवून काम करत नाही तर अगदी घरचे काम समजून कामाला येत असते.. दोघींचे सूर चांगलेच झंकारले होते असे म्हणायला हरकत नाही.. माझे दोघींशी येता जाता बोलणे होत असल्याने मलाही ती कल्पना होतीच.. सरूच्या संसारातील प्रत्येक अडचणीत ताई देवासारख्या तिच्या पाठीशी उभ्या राहिल्या होत्या.. मुलांच्या शिक्षणात हातभार लावला होता.. दोघींचे नाते अगदी पूरक होते.. दोघी एकमेकींना कधीच अंतर देणार नव्हत्या..

सहज मनात आले की अशा असंख्य सरुबाई असतील ज्या आपल्या आयुष्याला वाहून देत असतील.. आपल्या रोजच्या जीवनातील त्या मदतनीस आहेत.. सावित्रीच्या काही लेकी खूप शिकल्या आणि जेव्हा स्वतःला सिद्ध करण्यासाठी घराबाहेर पडू लागल्या तेव्हा त्यांची घरातील उणीव अशा सरुबाईंनी भरून काढली आणि त्यांची चूल सांभाळली.. दोघींचे काम नक्कीच

महत्वाचे आहे.. काम कमी दर्जाचे किंवा छोटे आहे असे न समजता त्यात आपले शंभर टक्के त्या देत असतील आणि भिंगरीप्रमाणे काम करत असतील.. पण त्या ह्या सरुबाई इतक्या खुश असतीलच असे नाही.. कधी कधी स्वतःच्या घरातील दोन जणांच्या स्वयंपाकाचा कंटाळा येऊ शकतो.. इथेतर ती भल्या पहाटे उठून घरातले आटोपून कामाला हजर होत असे.. त्यात तिला समाधानही नक्कीच होते.. अगतिकता, अपरिहार्यता किंवा हतबलता असे म्हणत मोलाचे काम उरकत जाणारे असतातच त्यातून कामाचा आनंद अभावानेच मिळत असतो.. सरुशी सहजपणे बोलले तर जीवनातले फार मोठे सत्य उलगडले.. आयुष्यात जे काही रंग लाभले आहे त्या रंगांच्या साहाय्याने आयुष्य उत्कटपणे रंगवले आहे.

तर असे हे आपल्या रोजच्या आयुष्यातील सगेसोबती असतात.. कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तरी थांबून दोन शब्द बोलायला काहीच हरकत नसते.. आहे जरा बडबडी.. तिला ना फार बोलायला लागते असे फारतर लोक म्हणतील.. पण तिचा उद्देश तर माणसे जोडण्याचा आहे आणि हो तीही एक कलाच आहे हेच खरे.. !

# 15

# मुझ को मुझमें रहने दो..



ती एकदा तावातावाने म्हणाली.. 'मी ना वर्तमानपत्र कधीच वाचत नाही.. प्रत्येक वर्तमानपत्र म्हंटले की काही ना काही गुन्हेगारी वृत्त असतेच असतेच.. मला इतक्या नकारात्मक बातम्या वाचायला नाही आवडत.. मी बघतही नाही मग वृत्तपत्राकडे.. ' ती अगदी तावातावाने बोलत होती.. सामाजिक कार्यकर्ती म्हणून लोक तिला ओळखायचे.. ती थोडेफार कार्यही करायची.. तिचा अविर्भाव पाहता मी म्हंटले.. 'तू वाचत नाही हे ठीक आहे.. तो तुझ्या आवडीचा प्रश्न आहे.. पण तू न वाचल्याने गोष्टी घडायच्या थोडीच थांबणार आहे..? कुठे ना कुठे गुन्हा घडतच असतो पण तू मात्र अगदीच अनभिज्ञ राहशील.. अगदी तुझ्या घराजवळ काही चुकीचे घडले तरी तुला कळणार नाही त्याचे काय..?बातमीकडे

बातमी म्हणून पाहिले पाहिजे.. तिला चांगली किंवा वाईट हे ब्रीद आपणच लावत असतो.. '

त्यावर ती काहीच बोलली नाही.. स्वतःपुरते जगणारे लोक कधीच जास्त त्रास करून घेत नाही.. एकदा आपल्या कोषात गेले की जगाचे काहीच घेणेदेणे नसते.. काय सांगावे तिच्या ठिकाणी ती बरोबरही असेल.. आपले जगणे गुंतागुंतीचे करू नये असा तिचा विचार चुकीचा नक्कीच नाही.. आयुष्यात शांती हवी असेल.. कदाचित तिला जगण्यातले वास्तव जीवघेणे वाटत असेल म्हणून तिने स्वतःपुरता तो प्रश्न सोडविला आहे.. विकतचे दुखणे हवेच कशाला?शेवटी काय कसे जगावे हा ज्याचा त्याचा चॉईस असू शकतो.. पण मग समाजसेवा कुठे कुठे करणे गरजेचे आहे हेही समजले पाहिजे ना.. असो.. मी आणि माझे वर्तुळ असे प्रत्येकानेच जर म्हंटले तर समाजातील विषमता दूर करणे केवळ अवघड आहे.. सकारात्मक गोष्टी तर सगळ्यांनाच आवडतात पण सत्यापासून दूर पळता येत नाही.. तुम्ही कितीही चांगुलपणाचा अर्क असलात तरी समोरची व्यक्ती ते स्वीकारेलच असे नाही.. देवापुढे हात जोडल्यावर स्वतःसाठी तर सगळेच मागतात मग विश्वकल्याणाची आस फक्त संतांनीच ठेवली पाहिजे का..? आपण

सामान्य माणसेही मोठे योगदान देवू शकतो त्यासाठी मनाचा संकुचितपणा सोडता आला पाहिजे..

माझ्या डोळ्यासमोर माझे अनेक पत्रकार बांधव तरळून गेले.. चॅनेलवाले आठवले.. ज्यांना अशा बातम्यांचा शोध घ्यायचा असतो आणि त्यावर लिहायचे असते.. लिहितांना ते सत्य अधोरेखित करावे लागत असणार.. अर्थातच ही फार मोठी सामाजिक जबाबदारी आहे.. एक माणूस ह्या नात्याने त्यांच्या मनाला नक्कीच यातना होत असणार.. पुराची बातमी सांगतांना ते पाण्यात उभे असतात.. अपघाताचे वृत्त सांगत असतांना एकीकडे ते अपघातस्थळ दाखविले जाते.. आपल्याला ते बघवले नाही की आपण लगेच चॅनेल बदलवतो कारण रिमोट तर आपल्याच हातात असतो नाही का..? कधी कधी कणभर घडलेल्या गोष्टी मणभर दाखविल्या जातात.. तसे असेल तर तेही आपल्यावर आदळतच जाते.. मन खरोखरच उद्विग्न होते मग आपल्याला वाटते की पेपर न वाचणारे किंवा बातम्या न पाहता आभासी मालिकांमध्ये जगणारे लोक किती सुखी आहेत.. त्यांचा हेवा वाटू लागतो.. कशाचाच काहीच त्रास न करून घेता जगता आले पाहिजे जे सर्वांना जमतेच असे नाही.. एखादी संवेदनशील व्यक्ती आजूबाजूच्या नकारात्मकतेने विचलित होत जाते.. त्यांच्या वाटेला खूपशी

सकारात्मकता आलेली असते तरी त्यांना आजूबाजूच्या जगातले दुःख टोचत जाते आणि ते आनंदी राहूच शकत नाही.. त्यांनी आनंदी राहायचे अगदी जाणीवपूर्वक जरी ठरवले तरी काही ना काही गुन्हेगारी वृत्त त्यांच्यावर आदळत असतेच.. काही लोक असे निराशाजनक वृत्त सतत वाचल्याने निराशेच्या गर्तेत जातात.. त्यांना मानसोपचार तज्ञ मंडळींची मदत घ्यावी लागते.. मनावर ओझे साचले की आयुष्य जड होत जाते पण बऱ्याच वेळा केवळ कर्तव्य म्हणून त्यांना हे सगळे पार पाडावे लागते.. सेवाभावी संस्थांना तात्काळ पुढे येत असतांना जीवाची पर्वा करून चालत नाही.. वैद्यकीय सेवकांना साथीच्या आजारात घरात बसून चालत नाही.. मास्क चढवत डॉक्टरमंडळी रुग्णतपासणी करतात.. सफाईकामगारांना कचऱ्याची किळस करता येत नाही.. काही गोष्टी टाळता येत नाही किंवा तसा पर्यायही नसतो.. पाण्यात राहायचे तर माश्याशी सख्य ठेवावे लागते.. स्वतःला त्या साच्यात नाही बसवले तर आपण जगापासून वेगळे ठरतो.. जगातल्या प्रत्येक गोष्टीबद्दल तक्रार सुरू होते..

माझी एक सखी स्वभावाने अतिशय शांत आणि मितभाषी आहे.. ती केवळ रेडिओवरील प्रादेशिक बातम्या ऐकते आणि स्वतःला कधीच जखमी करून घेत नाही.. कदाचित तिने

आयुष्यात खूप काही सोसले असावे.. घरातही ती कुणालाच एकही शब्द नकारात्मक भाषेत बोलू देत नाही.. अगदी दुःखद घटनांवर अवाक्षर बोलत नाही किंवा ती चर्चा पुढे वाढवत नाही तरीही अप्रिय बोलणे चालूच राहिले तर ती हळूच काढता पाय घेते.. शुभ बोला.. पुढे चला असे म्हणत जाते त्यात वावगे काहीच नाही.. खेद हाच की लोक संवेदनशून्य बनले आहे.. भंजाळून गेले आहेत.. शायरजी म्हणतात..

'कितना और बदलू खुद को जीने के लिये..

ए जिंदगी थोडा सा तो मुझको मुझमें रहने दो.. ' असे वाटू शकते पण मला काय घेणेदेणे असे प्रत्येकानेच म्हंटले तर सामाजिकतेचा ऱ्हास होत जाणार हे एक त्रिकालाबाधित सत्य आहे.. सामाजिक चौकट त्यामुळे खिळखिळी होत चालली आहे.. जाणिवांच्या खिडक्या खाडकन उघडल्या गेल्या पाहिजे हेच खरे.. !

प्रश्न हाच आहे की आपल्या वास्तवातील जगण्याचे व्यवस्थापन कसे करायचे?खूप काही आपल्यावर आदळत जाते तेव्हा त्याचा सामना कसा करावा हा देखील एक यक्षप्रश्न आहे.. खरंतर आनंदी राहणे हा एक उत्तम पर्याय आहे .. ती तर जगण्याची कला आहे पण ते सगळ्यांना अवगत असतेच असे नाही.. देवाने

प्रत्येकाला काहीतरी वेगळेपण देत घडविले आहे.. अन्यथा एकाच गोष्टीकडे पाहण्याचा प्रत्येकाचा दृष्टीकोन वेगवेगळा कसा काय असू शकतो..? काही सख्या खूप सुंदर जणू काही मिट्टी की गुडिया असतात.. मातीत भावना कालवायला देव जणू काही विसरलेला असतो इतक्या त्या भावनाशून्य असतात.. पण सुखी असतात कारण तिथे विचारांचा फाफटपसारा नसतो.. मनाचे खेळ ज्याचे त्याला ठाव असतात पण जग ते समजून घेईलच ही शाश्वती नसते. मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण.. !

# 16

# खुशीया ही खुशीया हो दामन मे जिसके..



सणासुदीचे दिवाळीचे दिवस होते.. गावातील मध्यवर्ती भागात ते प्रदर्शन आले होते.. गृहोपयोगी वस्तू तिथे मिळत होत्या.. देशातील विविध राज्यातून आलेले कारागीर आपली हस्तकला दाखवत होते.. मी तर अगदी मनापासून रमून गेले.. जे काही वेगळे नाविन्यपूर्ण असते ते अशा प्रदर्शनातून नक्कीच भेटत असते.. सोबत असलेल्या मैत्रिणीने अगदी कपबशीपासून ते गालिच्च्यापर्यंत बरेच काही खरेदी केले होते.. इतके की आता ते सामान पिशवीतून ओसंडून वाहत होते.. तिचे हातही जडावले होते पण उत्साहाला तोड नव्हती.. मीही गरजेच्या वस्तू घेतल्या होत्याच त्यामुळे मीही हौशी तिच्यासारखीच असे म्हणायला हरकत नाही.. काही 'आनंद' शब्दात सांगता येत नाही आणि ते कुणाला

समजावून सांगितले तरी कळत नाही.. आणि त्यासाठी नेहमीच फार पैसे मोजावे लागतात असेही नाही.. आम्ही स्त्रिया म्हणजे काय तर मोठ्या झालेल्या मुलीच असतो ज्यांना स्वतःला सजवायला नटवायला आवडत असते.. आणि त्यात घरदारही सोबत असतेच.. त्यामुळे अशा प्रदर्शनात खरेदी करत असतांना तासंतास उलटून जातात ते समजतच नाही.. कुत्सित शेऱ्यांकडे चक्क दुर्लक्ष करायचे असते.. आम्ही दोघीजणी समाधानाने कृतकृत्य होत गेटमधून बाहेर पडलो.. अर्थात गप्पा ह्याच की किती परवडले ना आपल्याला.. अग कधीपासून मला घरात ही वस्तू हवीच होती ती आज घेता आली..

बाहेर पडल्यावर समोरच रहदारीचा मुख्य रस्ता होता.. चला आता रिक्षात बसायचे आणि घरापर्यंत रिक्षा न्यायची अशा विचारात आम्ही होतो तोच करकचून ब्रेक्स लागले आणि एक कार आमच्याजवळ आली.. थोडे त्रासिक नजरेने पाहिले तर काय ती माझी बालमैत्रीण सुधा होती.. दोघींना एकमेकींना भेटल्यावर आनंद उधाणला होता.. माझ्या हातात सामान आहे हे पण ती विसरून गेली.. आणि काय काय घेतले ग अशी विचारणा देखील झाली.. तिच्याच कारमध्ये तिने आग्रहाने बसवून घेतले.. मी तिला विचारले .. 'काय ग सुधा.. ठिक आहेस ना..?आपली फारा

दिवसांनी भेट झाली आहे.. फारच व्यस्त असतेस तू .. काही ना काही व्याप असतात तुझें पण बालमैत्रीण म्हणून मला तुझा अभिमान वाटतो बरं का..?'

ती काहीशी गप्पगप्प भासली आणि माझ्याकडे असुयेने पाहत म्हणाली.. 'मला तुझा फारच हेवा वाटतोय ग.. अशी प्रदर्शने तर मी किती वर्षांत फिरले नाही.. जमाना झाला असावा.. ' 'हो का ग.. ज्याचे त्याचे आनंद ज्याने त्याने शोधायचे असतात.. ' त्यावर ती खुलुन म्हणाली.. 'अगदी बरोबर.. आपल्या मैत्रीचा अभिमान तर मलाही आहेच पण आजचा तुझा हा आनंद पाहता मला सारखे वाटतेय की मला अशा छोट्या छोट्या गोष्टीत आनंद का नाही वाटत..?.. म्हणजे माझे मन ना इतके निरुत्साही असते ना की कशाचेच काही वाटेनासे झाले आहे.. मन असे आतून आनंदाने फुलून येतच नाही.. '.. तिच्या अशा गंभीर बोलण्याने मी पण बुचकळ्यात पडले.. नेमके काय दुःख असावे बरे सखीचे.. ती बोलतच होती.. एखादी ठसठसणारी जखम भळभळून वाहावी तशी ती अखंड बोलत होती.. ती म्हणाली.. 'मी अशी स्थितप्रज्ञ पाहून माझे जवळचे काळजातील लोक अस्वस्थ होतात.. आयुष्यात सगळंच काही इतके भरभरून आणि न मागता वेळेत मिळाले की माणसाला त्याचे अप्रुपच वाटेनासे होते.. अगदी तसेच

माझे झाले आहे.. आज तुझ्याकडे आनंदित होण्यासाठी किती कारणे आहेत.. मला माहिती आहे तुझ्या बागेतील कुंडीतल्या रोपाला पहिली कळी लगडली तरी तू किती आनंदी असते.. घाईघाईत तो आनंद तू सर्वांना शेअर करत असते.. तुझा तो धडपडा स्वभाव तुला कधीच गप्पा बसू देत नाही.. कुठेही गेलीस तरी तू आपल्या स्वभावाचा तसेच उपजत चांगुलपणाचा सुगंध मागे ठेवून जातेस.. तू नसलीस तिथे की लोक तुझी आठवण काढतात.. माझे मात्र मन रमतच नाही.. असे वाटते की जगातल्या प्रत्येक गोष्टीबद्दल मला तक्रार आहे किंवा जगाला माझ्याबद्दल तक्रार आहे.. मला वीट आला आहे त्याच त्या मानभावी जगाचा.. काय करू ग.. कुठून आणू स्वतःमध्ये उत्साहाचे झरे..?काहीच कळत नाही.. '

सुधा बरच काही साचलेले बोलत होती आणि शांतही झाली होती.. मला वाटले की खरच ही एकटी पडली आहे आणि तिचा संघर्ष स्वतःच्या मनाशीच आहे.. कुणी कितीही बाहेरून सांगण्याचा प्रयत्न केला तरी तिच्या पर्यंत पोहोचणे जरा अवघडच आहे.. मी तिच्याशी बोलत राहिले आणि पुढे तिलाही वेळ देण्याचे ठरविले.. मला तर अनेक वेळा ती जास्त सुखी असावी असे वाटत होते.. म्हणजे सुखाचा तो केवळ एक आभास होता तर.. मला वाटायचे की हिला तर सगळी भौतिक सुखे हात जोडून उभी

आहेत.. आयुष्यात आवडत्या गोष्टींसाठी मन मारणे म्हणजे काय हे तिला ठाऊकच नसणार.. एक मात्र खरे की जी गोष्ट अथक परिश्रमाने किंवा प्रतिक्षेने मिळते तिची किंमत मोजताच येत नाही..

खरंच तर आहे सुख उपभोगण्यास देखील सुदृढ मानसिकता असावी लागते.. सुख दाराशी आले आहे आणि त्याचे जर स्वागतच केले नाही तर ते नक्कीच हिरमुसणार.. आल्या पावली परतणार.. आणि मग पुन्हा त्याच सुखाची मनाला आस लागणार.. हे सगळे दृष्टचक्र प्रत्येकाच्या लक्षात आले पाहिजे.. खूप छान सुग्रास अन्न ताटात वाढले आहे आणि जेवण करणारा जर रोगी असेल किंवा त्याला त्या अन्नाची किंमत नसेल तर त्याला जेवण बेचवच लागणार.. काय सांगावे त्याचे पोट कदाचित आधीच भरलेले असावे.. किंवा त्याची पचनशक्ती खालावलेली असावी.. मग ते अन्न रांधणाऱ्या अन्नपूर्णेला दोष देऊन काय होणार..? तेच अन्न एखाद्या भुकेल्याला दिले तर तो अन्नदाता सुखी भव असा तोंड भरून आशीर्वाद देखील देईल.. एखादी विचारी व्यक्ती आयते अन्न समोर आले त्याचा मनापासून आस्वाद घेईल आणि अन्नपूर्णेची प्रशंसा देखील करेल.. नावे तर नक्कीच ठेवणार नाही..

'अति झाले आणि हसू आले' असे म्हणतातच ना.. आयुष्याचे देखील असेच असते.. जे सहजगत्या मिळालेले असते त्याची

किंमत असतेच असे नाही.. शाळेत असतांना संत तुकडोजी महाराजांची एक कविता अभ्यासली होती.. त्या शब्दांचा अर्थ वयाच्या आजच्या वळणावर उलगडत होता..

'राजास जी महाली, सौख्ये कधी मिळाली

ती सर्व प्राप्त झाली, या झोपडीत माझ्या.. '

सिग्नलवर भीक मागणारी छोटी मुले खळखळून हसत असतात तेव्हा वाटते की पैशाने गरीब असणे हे दुःखाचे कारण असू शकत नाही.. निखळ आनंद घेणारी माणसाची एक जमात असते जी कुठेही कुठल्याही नकारात्मक परिस्थितीत आनंदी राहू शकते.. त्यासाठी बाह्य कारणांची गरज नसते.. आनंद हा स्वयंप्रकाशित असतो आणि तो आतून आतून कारंज्याच्या स्वरूपात बाहेर पडत असतो.. आनंदाचे डोही आनंद तरंग.. भले कुणाला ते कारण क्षुल्लक वाटू दे पण ते एक जगण्याचे कारण असू शकते.. अन्यथा का आणि कशासाठी जगावे हाही एक प्रश्नच असतो जो प्रत्येकाने आपापल्या पद्धतीने सोडवायचा असतो...

# 17

# आगे भी जाने ना तू..



आज श्रद्धाची खुप गडबड होती.. तिची लग्न झालेली लेक आर्या फक्त एक महिन्यासाठी भारतात येणार होती.. जसे लेकीचं लग्न झाले तसे ती विमानात बसून उडाली ती थेट तीन वर्षांनी भेटणार होती.. श्रद्धाला अगदी काय करू आणि काय नाही असे झाले होते.. आर्या म्हणत होती .. 'नको ग इतकी धावपळ करू आणि दमूही नको.. तिकडे सगळे काही मिळते.. 'पण आईच्या जीवाची घालमेल विचारूच नका.. ! दिवसाचे चोवीस तास कधी संपायचे पत्ता लागत नव्हता.. स्वतःकडे पाहायला तर त्याहून वेळ नव्हता.. लेक आर्या म्हणेल तो सर्व खाऊ तिने तयार करण्याचा चंग बांधला होता.. आर्याचे बाबा म्हणाले पण अग तिला विचारून पॅकिंग कर उगाच जास्त ओझे नेता येणार नाही त्यावर अगदी उसळून श्रद्धा म्हणाली की अहो आपला नवा संसार होता तेव्हा मी किती काही काही जिन्नस आईकडून आणायचे .. आठवतंय का

तुम्हाला..?आई अगदी सर्व प्रकारची पीठे, लोणची, मसाला आणि वाळवणाचे पदार्थ बांधून द्यायची.. तिचा अगदी अट्टाहास असायचा जणू काही.. लेकीचा संसार जणू काही मांडून देत होती.. ' आईच्या आठवणीने श्रद्धा गहिवरली पण तो गहिवर बाजूला सारत ती कामाला लागली..

आर्या आपली एकटी लेक पण तिचे काहीच माहेरपण मला करता येत नाही असे म्हणत तिने डोळ्याला पदर लावला.. त्यावर नेहमीप्रमाणे बाबा काहीच बोलले नाही.. हल्ली हल्ली ती अशीच वागत होती.. आर्यावर वैतागत होती की मला रोज फोन का नाही करत?.. आर्या तिकडे नोकरी करायची आणि उरलेल्या वेळात घरकाम असायचे मग तिला वेळ मिळायचा नाही .. बाबा समजून घ्यायचे पण आई मात्र नाराज व्हायची मग आर्याला उगाच अपराधीपणाची भावना खात राहायची.. आताही ती येणार तशी सासरी जाणार होती मग आठ दिवस माहेरी येणार त्यावर आईने आक्षेप घेतला मग आर्या म्हणाली मी दोन्हीकडे सारखेच राहीन त्यावरही आई दुखावली.. 'कशी हो लेक परकी झाली.. ज्या घरात लहानाची मोठी झाली तिथे ती जास्त दिवस राहू शकत नाही.. '.. बाबा म्हणाले.. 'किती अभिमान वाटतो ग आपल्या लेकीचा.. सासरी माहेरी अगदी सगळ्यांच्या मनाचा विचार करत असते...

तिचा आता प्राधान्यक्रम बदलला आहे लग्नानंतर.. आपण आहोतच प्राधान्याने पण तरीही तिकडे तिला रुजण्यासाठी वेळ द्यावा लागत आहे' त्यावर श्रद्धाने खोल सुस्कारा सोडला.. मग तिची ही गडबड खरेदीची.. लेकीसाठी सारखे बाजारात हेलपाटे घालत होती.. दमतही होती आणि चेहऱ्यावर समाधान देखील होते.

बघता बघता आर्या आपल्या माहेरी आली आणि विसावली देखील.. दर वेळेस श्रद्धा म्हणायची फक्त आठ दिवसच राहणार आहे लेक माझी आणि असे म्हणत असतांना तिचा चेहरा उदास होत झाकोळून जात असे.. प्रत्येक क्षणी जणू तिच्या मनावर प्रचंड दडपण असायचे मग तिची चिडचिड व्हायची.. लेकीच्या मैत्रिणींना पण परस्पर सांगितले की ह्या वेळेस ती नाही भेटू शकणार तुम्हाला.. आर्या जितक्या वेळेसाठी वाटूयावर येणार होती त्यात कुणाचीही भागीदारी आईला नको होती.. एकदोनदा तर भरून येणारे डोळे वाहिले देखील.. ! कसे समजून सांगावे हेच कुणाला कळत नव्हते.. आर्या चिवचिव करत आली पण प्रत्येक क्षणी आई आठवण करून देत असे.. किती कमी दिवसांसाठी आलीस ग माहेरी.. आर्या म्हणाली की अग आई मी जितके दिवस आलेय माहेरपणासाठी तितके दिवस प्रत्येक क्षण आनंदात घालवू या.. उगाच कशाला

दडपण घेऊन वावरते आहेस तू.. चल मस्त पाणीपुरी खावू या. श्रद्धा आपल्या लेकीकडे पाहतच राहिली आणि अभिमानाने मनही भरून आले.. जे तिला कळते ते आपल्याला कळू नये का?.. लेकीकडून शिकले पाहिजे.. आयुष्य भरभरून जगता आले पाहिजे.. आपणच जर जगण्याला अशा फुटपट्ट्या लावल्या तर मनमोकळे जगायचे कधी..?आर्या तेच तर करत होती.. भावनांच्या अतिआहारी न जाता आपले जगणे साधे आणि सोपे करत होती जे तिच्या आनंदासाठी खूपसे गरजेचे होते. कालच तिची मैत्रीणही अगदी असेच बोलली होती की श्रद्धा अग लेक आली तर तो निखळ आनंद घे.. उगाचच पसाऱ्यात जगू नको आणि मनावर मळभ पण नको तुझ्या... वास्तव स्वीकारले की फारसे अवघड नसतेच काही..

काय आश्चर्य की श्रद्धाने मनावरची मरगळ एकदम झटकली आणि कॉलेजकन्यकेप्रमाणे ती आर्यासोबत बाहेर पडली... आहे तो लाभलेला सहवासाचा क्षण तिला पूर्णत्वाने जगायचा होता.. उद्या आर्या तिच्या घरी गेल्यावरही ही शिदोरी तिला ऊर्जा देणार होती.. मॉलमध्ये मायलेकींनी मनसोक्त खरेदी केली.. तिथे गाण्याचे सूर दरवळत होते.. 'आगे भी जाने ना तू.. पिछे भी जाने ना तू.. जो भी है बस यही एक पल है.. '

# 18

# तुम इतना जो मुस्कुरा रहे हो..



आज सईला सकाळपासूनच खूप उदास वाटत होते...तरी पण ती निग्रहाने उठली होती.. आपल्याच घरात आनंद दिला पाहिजे आपण.. आनंदी राहिले पाहिजे म्हणून ती त्यातून बाहेर येण्याचे ठरवते...अतिशय सुज्ञ विचारांची सई आता मोजून मापून जगायला शिकली होती. जे काय अप्रिय आपण स्वतःबद्दल बोललो ते पुसून टाकण्याचा प्रयत्न करते.. खूप छान तयारी करते.. आवडती साडी घालते.. त्यावर दागिने घालते.. थोडेसे हटके दिसण्याचा प्रयत्न करते मग ती स्वतःचे फोटो काढते .. फोटोतल्या तिच्याकडे पाहून तिलाच खूप छान वाटू लागते.. तिला ती खूप आवडते मग ती म्हणते की या फोटोतल्या मुलीला मी नेहमीच आनंदी ठेवले पाहिजे ते माझं कर्तव्यच आहे .. त्या मुलीला आपल्याशिवाय दुसरे कोण आहे..?.ही मुलगी जीवापाड सगळी नाते जोडण्याचा प्रयत्न करतेय पण काही लोक तिच्यावर उगाचच नाराज असतात मग ते तिला

दुखावतात.. ती काहीच करू शकत नाही.. कुणाचे स्वभाव बदलवता येत नाही.. कडू कारली कशातही घोळली तरी कडूच राहणार.. दुसऱ्या कुणाच्या आनंदी ठेवण्याने ती आनंदी होत असेल तर तो आनंद चिरकाल नक्कीच असणार नाही.. स्वतःलाच घट्ट मिठी मारली पाहिजे.. आपल्या रुपाकडे डोळे भरून पाहिल्यावर तिला स्वतःच्याच रूपाचा हेवा वाटू लागतो मग ती स्वतःचे फोटो धाड धाड अपलोड करू लागते आणि फेसबुक, इंस्टाग्राम व्हॉट्सॲप वर छान छान सुंदर सुंदर फोटो पाहून तिच्यावर सुखद स्तुतीसुमनांचा वर्षाव पडतो.. काहींना तर थोडीशी असूया पण वाटते.. अगदी जवळचे काळजातले लोक असतात ते तिच्या उत्साहावर खुश होतात आणि ती आनंदी आहे हे पाहून ते पण आनंदी होतात.. आपण हे सगळं का करतोय हे तिला क्षणभर कळतच नाही.. आपण आनंदी आहोत हे जगाला दाखवत आहोत की आपण तसा आव आणत आहोत हे पण तिला कळत नाही पण ती तसा देखावा मात्र आवर्जून दाखवत असते की हो मी खूप खूप खूप सुखात आहे.. ते सर्व कमेंट्स वाचत असताना तिला स्वतःबद्दल आत्मविश्वास वाटू लागतो त्यात तिला आभासी जगातले मैत्र तिला जवळचे वाटू लागतात.. काय मग कशी आहेस असे विचारल्यावर एकदम मजेत एकदम छान असे प्रत्येकाला सांगतांना हृदयाच्या तळाशी मात्र एक कळ उमटत असते..

आजच सकाळचा प्रसंग.. तिचे नवऱ्याशी भुषणशी चांगलंच भांडण झालेलं होते...कारण तसे क्षुल्लक असेही म्हणता येणार नाही.. नेहमीप्रमाणे तिला वाटत होतं की भूषणने तिला छानसे गुड मॉर्निंग म्हणून उठवावे.. थोडेसे लाड करत गोड बोलावे.. डोक्यावरून केसांमधून हात फिरवावा आणि मग तिला खूप छान छान सुखाची समाधी लागावी की आपला नवरा आपल्यावर खूप खूप प्रेम करतोय.. आयुष्यात अजुन काय हवं मग अशी भावना मनात जागृत व्हावी आणि तो दिवस कसा आनंदाने पार करावा.. ही सगळी सुखद क्षणांची शिदोरीही दिवसभर पुरवावी असं तिला वाटत असतं प्रत्यक्षात मात्र तसे होणारच नसते.भूषण हा भावनांनी अतिशय रुक्ष असा माणूस असतो.. त्याला अंतर्यामी प्रेम असायचं पण ते व्यक्त कसं करावं हे कधीच जमलच नाही.. त्याबद्दल त्याला अपराधी भावना कधीच नव्हती.. लग्नानंतर सुरुवातीच्या दिवसात पण त्याला ते जमतच नव्हतं.. दरवेळेस ती पुढाकार घ्यायची पण आता मात्र तिला खूप कंटाळा आलेला असतो दरवेळेस मीच का पुढाकार घ्यावा? सुखी संसाराची आज त्याला नसावी का? ती आज खूप चिडते.. नाही नाही ते बोलत सुटते.. माहित नाही तिला आज अचानक काय होते.. ती त्याला म्हणते मी तुला सोडून जाईन .. मी माझ्या जीवाचं काही तरी बरे वाईट करून घेईल मग तू मला मिस करत बस.. ती त्याला असं म्हणते खरी पण एकदम अशी

भीती दाटून येते आणि मी असे अभद्र का बोलले ते कळत नाहीये.. त्याला तर काहीच फरक पडणार नाही.. आताही तो नेहमीप्रमाणे ऑफिसला जातो.. ती खदखदत राहते आणि सगळ्यातून नेहमीप्रमाणे बाहेर येण्याचा प्रयत्न करते.. तिच्या जिवाची खूप फडफड होते.. मनातल्या मनात दहापर्यंत आकडे म्हणते.. आपोआप शांत होते. स्वतःला विस्कटून घेण्यात काही अर्थ नाही म्हणून स्वतःला आवरत बसते.. आपल्याच जखमा शिवायला आपलीच हातशिलाई बरी असते.. दुर्लक्षित असल्याच्या मनाच्या तळाशी वेदना होत्याच.. स्वतःचं मन रिझवण्यासाठी मग ती असे फोटो काढत बसते स्वतःच्या प्रतिमेवर खूप खूप प्रेम करते आणि आणि छान छान म्हणवून घेते.. तिच्या मोहक हास्यामागे दुःखाची झालर आहे हे हे फारसे कुणाच्या लक्षातही येत नाही.. ती त्या आभासी जगात मनापासून रमते..


ही सई मला जेव्हा जेव्हा भेटते तेव्हा तिच्या डोळ्यात मला दुःखाची एक झालर दिसून येते.. सईला आपला जोडीदार दुर्लक्ष करत आहे हेच दुःख नाही तर तिच्या दुःखाचे अगणित पसारे आहेत.. ओळखीचे कुणी भेटल्यावर समरसून बोलले नाही तरी ती विचार करत बसते.. संवेदनशीलता हा जणू काही तिला शाप वाटू लागला आहे.. हल्ली तर काय कधी कुणाचे मन कुणाबद्दल

कलुषित करण्याचा प्रयत्न होईल सांगता येत नाही.. छोट्या छोट्या अहंकारात अडकणारी माणसे पाहिली की कणव दाटून येते.. सईला पण काहीच सोडून देता येत नव्हते मग ती दुःखाला कुरवाळत बसायची.. काही ठिकाणी गटबाजी असायची मग सरळ स्वभावाची सई फारशी विचारात घेतली जात नव्हती कारण ती गोष्टी सोडून द्यायला शिकली होती.. तिला वाईट वाटत नाही म्हणून कुणीही पटकन तिला दुखवायचे.. अशी आहे सईची गोष्ट जी आपल्या आजूबाजूला दिसते.. कधी कधी ती ही चुकत असते पण पुन्हा धडपडत जगण्यास सज्ज होते.. गोष्ट तर अगदी साधी .. म्हंटली तर मेख असते नाहीतर नसतेच पण लक्षात कोण घेतो..?

सध्याचे सोशल मीडियाचे चित्र थोड्याफार फरकाने असेच आहे.. लोक व्यक्त होत असतात.. आभासी जगात रमत असतात.. 'तुम इतना जो मुस्कुरा रहे हो.. 'असा प्रश्न पडतो.. सुखाचा भास नेहमीच निर्माण केला जातो.. मग वाटते खरंय जे दिसते तसे प्रत्यक्षात नसते आणि असले तरी आनंदच आहे.. दुःख तळघरात आणि सुख झळकते झुंबरी..!!

## 19

## मीच माझ्या जीवनाची सारथी ग..



मध्यंतरी माझी एक हसरी मैत्रीण मानसिक नैराश्याने घेरली गेली होती.. तिला त्यातून बाहेर काढण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न करत होतो परंतु काही केल्या ती आपल्या नकारात्मक विचारातून बाहेर येत नव्हती.. विशेष म्हणजे तिने स्वतःभोवती एक कुंपण आखून तर घेतले होतेच पण त्या कुंपणाचे दार उघडून ती कुणालाही आत येऊ देत नव्हती.. अर्थातच मैत्रिणीची खूप काळजी वाटू लागली कारण मनाने ती खूप चांगली होती.. तिला सगळ्यांनी खूप काही समजावून सांगितलं की बाई ग तुझं दार बंद आहे म्हणून जगाचे काहीच बिघडणार नाही उलट तूच एकटेपण सहन करशील.. आणि एकटेपण तुझ्यावर लादले जात आहे असे तुला वाटेल याचा तू नक्कीच विचार केला पाहिजे.. पण ती अगदी ढिम्म असायची.. मग काहींनी सुज्ञ विचार केला की असू दे तिला आपल्या आपल्या स्पेसमध्ये.. कंटाळली की येईल परत माणसाच्या कळपात.. ज्याची त्याची स्पेस ज्याला त्याला मिळालीच पाहिजे ना.. !

ही मैत्रीण तिला काहीही आपण सल्ला दिला तर ती त्यावर एकच उत्तर द्यायची की तुम्हाला काय होते नुसते सल्ले द्यायला.. ज्याच्या त्याच्या अडचणी ज्याला त्याला ठाऊक असतात.. जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे.. आणि तुम्हाला बरे वेळेत सगळे जमते?... तुमचे काय सगळेच छान आहे.. कसे काय शक्य होते तुम्हाला इत्यादी इत्यादी.. खरेतर हेच वाक्य तिलाही लागू पडत होते.. स्वतःच्या आवडत्या गोष्टींना ती पुरेपूर वेळ देत होती.. त्यात तिला कुठलीच आडकाठी नसायची.. कुणाचेच चांगले उदाहरण दिलेले तिला चालत नव्हते.. तिला सांगावेसे वाटायचे की अग सहजासहजी काहीच जमत नाही.. महत्प्रयासाने सगळ्या गोष्टी जमवून आणाव्या लागतात.. मलटीटास्किंग जमाना आहे तर व्याप वाढले आहेत. आपणही गती वाढवत जायची अन्यथा मागे पडायचे भय आहेच... थोडक्यात काय तर तिने आपले आयुष्य एका ठराविक सुळयाला लटकवून घेतले होते आणि खाली जमिनीवर येण्याची तिच्या इच्छा नव्हती.. ती कोषातून बाहेर यावी म्हणून काळजातले लोक काळजी करत होते.. कालांतराने ही गोष्ट तिच्या लक्षात आली आणि ती पूर्वीप्रमाणे आनंदी दिसू लागली.. प्रत्येकाच्या वाटेला आलेला आयुष्याचा तुकडा अगदी वेगवेगळा असतो त्यामुळे दोन व्यक्तींच्या आयुष्याची तुलना होऊ शकत नाही

आणि जग नेमकी तीच तुलना करत जाते.. जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे.. असो..

खूप वेळा आपल्या कानावर असे एक वाक्य नेहमी येत असते तेवढे सोडून बोला किंवा मला ते जमणे शक्यच नाही. फार अवघड आहे हे दिव्य माझ्यासाठी.. असे वाक्य जेव्हा आपण ऐकतो तेव्हा आपण समजून जायचे की ती व्यक्ती तिथेच अडकून पडलेली आहे.. हूक अप झालेली आहे म्हणजेच काय तर त्या व्यक्तीने तिथे स्वतःला नको तितके बांधून घेतलेले आहे.. स्वतःच विणलेल्या कोषात असहाय्यपणे अडकून गेली आहे.. आपल्या आजूबाजूला जर आपण नजर टाकली तर अशा अनेक व्यक्ती आपल्याला दिसून येतात की त्या व्यक्ती आपल्या झोनमधून किंवा आपल्या कोषातून बाहेर यायला अजिबातच तयार नसतात.. त्यांच्या मनामध्ये अनेक पूर्वग्रह असतात.. त्यांची काही पूर्वग्रहदूषित मते देखील असतात.. मला हे जमणे शक्य नाही कारण माझ्या आजूबाजूला इतकी काही नकारात्मक परिस्थिती आहे की त्यातून मी मान वरती काढू शकत नाही.. माझी ती क्षमताच नाही.. अमुकतमुक व्यक्तीला कसे काय यशस्वी व्हायला जमते असा प्रश्न त्या व्यक्तीला भंडावून सोडत असतो.. स्वतःच्या मनात डोकावून पाहिले पाहिजे... एखादीला घरात अतिस्वच्छतेचे वेड असते.. त्या स्वच्छतेच्या नादात ती


आपले स्वास्थ्य बिघडवून घेते.. आणि तिची नेहमीच चिडचिड होत जाते.. पाहुणे येणार म्हंटले की आता घराची इस्त्री मोडेल ह्या विचाराने ती व्यथित होते.. खरंतर तिचे आनंदी असणे महत्त्वाचे असते पण ती सदा घराच्या नीटनेटक्यात गढून गेलेली असते.. अगदी काळजातल्या व्यक्तीची भावनिक भूक तिला समजत नाही इतकी ती कोषात अडकलेली असते.. काहींना सगळे काही मीच करेन.. मला कुणाचीच मदत नको.. मला कुणाचीच गरज नाही असे म्हणत अट्टाहासाने कामे रेटायची सवय असते आणि त्यातच ते थकून जातात.. उगाचच त्यांना साक्षात्कार होतो की आपल्या मदतीला कुणीच नाही.. 'ऐकला चलो रे.. :असे आपले आयुष्य आहे.. असे ज्या व्यक्तीला वाटते त्यालाआपण समजावून सांगू शकत नाही..

खरंय हा सगळा गोंधळ आपल्या मेंदूतून येत असतो आणि तिथूनच सुरू झालेला असतो.. आपल्याला जर एखादया घोडयावर स्वार होत रपेट घ्यावी असे वाटत असेल तर त्या घोड्यावर आपली पकड घट्ट हवी.. घोड्याची क्षमता माहित असली पाहिजे.. त्याच्या उधळण्यावर काबू ठेवता आला पाहिजे. ध्येयासाठी मग आपण वेळ काढलाच पाहिजे..

'वेळ' या डोमेन मधून स्वतःच्या जीवनाकडे आपण कसे बघत आहोत हे खूप महत्त्वाचे आहे.. एखादा व्यसनी माणूस दारू सोडू शकत नाही किंवा एखादी चेन स्मोकर व्यक्ती सिगारेट सोडू शकत नाही कारण त्या गोष्टीला ते 'युज्ड टू' झालेले असतात.. त्यांच्यासाठी ती गोष्ट सोडणे हे अतिशय अवघड होऊन बसते.. त्या गोष्टी शिवाय जीवन जगण्याची कल्पना देखील केलेली नसते त्यासाठीच आपण हे अडकून जाणं सोडले पाहिजे आणि स्वतः स्वतःचे गुरु बनले पाहिजे.. आत्मगुरु बनल्याने आपल्याला आपल्या समस्यांवर उत्तर मिळते.. कधीकधी माणूस वर्तमानकाळात एखादी गोष्ट जगत असतो तेव्हा तो त्या गोष्टीवर लक्ष केंद्रित न करता भूतकाळातील संदर्भ देत जातो.. जरतरची भाषा तशी निरर्थक असते.. आणि वेळही वाळूगत हातातून निसटून गेलेली असते.. आपण त्यासाठी व्यर्थ हळहळ व्यक्त केली तर गेलेली वेळ कधीच परत येणार नसते त्यामुळे माणसाने आता स्वतःला त्या खिळ्यावर लटकवून घेणे सोडले पाहिजे.. किंवा आपल्याला लटकवले जात आहे असे लक्षात येताच त्यातून बाहेर यायला शिकले पाहिजे..

# 20

# मैत्रं प्रीतीरसायनम



मानवी नातेसंबंधात मैत्री ही सर्वोच्च स्थानावर आहे. जैविक नाते नसताना जवळीक वाटणे, मनात प्रेमभाव उत्पन्न होणे ह्याचे कारण मैत्री असू शकते. उभयपक्षी व्यावहारिक नाते नसताना एकमेकांना समजून घेत कोणत्याही प्रकारच्या स्वातंत्र्यावर बाधा न येऊ देता म्हणजेच अवकाश देत नाते बहरते.. फुलते आणि आनंद देऊन जाते. परिपूर्ण कोणीच नसते. प्रीतीरसायन भावनेने बुद्धीने काम करायचे असते.

मैत्री हे आयुष्याला लाभलेलं सुंदर असे वरदान नक्कीच आहे.. मैत्रीशिवाय आपले जीवन आपण कल्पनाही करू शकत नाही.. वयाच्या प्रत्येक टप्प्यावर ही मैत्री आपल्याला भेटत असते.. नकळतपणे आपल्या आयुष्यात डोकावत असते.. अनेकदा ती आपल्याला प्रगल्भ बनवत असते.. मैत्रीचे विविध धागे जीवनाला रंग देत असतात.. आपले आयुष्य त्यामुळे विविधरंगी होत असते

मग असं वाटतंय की हे मैत्र जीवाचे म्हणजेच माझे जीवन आहे पण कधी कधी असेही होते की अगदी आपल्या जवळच्या मैत्रिणीला देखील आपल्या काळजाचे आतले आतले स्तर ओळखता येत नाही तेव्हा खूपच खेद वाटतो.. वेदनेचा डोह उमळतो.. खेद मैत्रिणीबद्दल वाटत नाही तर स्वतःबद्दल वाटत जातो की का इतके भरभरून आपण मैत्रीत गृहित धरले की आता असं काही असू शकते हे मन स्वीकारुच शकत नाही.. आपल्या सोबत ती असावीच असे जेव्हा वाटू लागते तेव्हा नकळत आपण अपेक्षा लादत असतो त्या विचारातून बाहेर आले पाहिजे.. प्रत्येकाच्या आवडीनिवडी भिन्न असतात.. प्रत्येकाचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन देखील भिन्न असतो त्यामुळे मैत्री जाणून घेण्याचा प्रत्येकाचा आयाम देखील भिन्न असू शकतो.. पण मग जर इतकं सगळं भान जागृत ठेवत मैत्री केली तर ती अनौपचारिक नाही का ठरू शकत असा भाबडा प्रश्न मला नेहमीच सतावत असतो.. खरे तर खूप मनापासून मैत्री केली की असा भेद सहन होत नाही परंतु ते जीवनाचे वास्तव असते म्हणूनच आता मैत्री करताना मी प्रत्येक पाऊल जपूनच टाकत असते आणि मनात खूप समाधान असते की मी माझ्या बाजूने हे मैत्रीचे शिवधनुष्य नक्कीच पेललेले आहे आणि मैत्रीला न्याय पण दिला आहे.. काय सांगावे कदाचित ते जाणून घेता आले नसावे किंवा ते रुजलेही नसावे.. पण हा प्रवास

यातनामय देखील तितकाच असतो.. विशेषतः आपण खूप मनापासून मैत्री करतो तेव्हा पराकोटीचे दुखावले जातो.. एकांतात अश्रूंची गर्दी होते.. मैत्रीच्या झाडाला गैरसमजाही वाळवी कधी लागते कळतच नाही.. एखादे काचेचे सुंदर भांडे जीवापाड जपावे आणि अचानक हातातून निसटून जावे असे काहीसे होत जाते.. तड पोटात घेवूनच काच जन्माला आली असावी का..?कारण मैत्रीचा शेवटही सुखद असला पाहिजे. गरजेपुरती केलेली मैत्री ही कधीच चिरंतन नसते. गरज संपल्यानंतरही जी सुरु असते ती खरी मैत्री होय. फार थोड्या लोकांना मैत्रीचा खरा अर्थ उमगला आहे असे म्हणावे लागेल.

हातचे राखून मैत्री केली असती तर कदाचित इतका त्रास पण झाला नसता पण त्यातून निखळ आनंद देखील मिळाला नसता.. अतिशय सावधपणे आताशी मैत्री करते.. मनाला सतत बजावत जाते की मला सवय नको व्हायला त्या मैत्रीची की दुरावतांना सारेच अवघड होत जाईल.. मैत्री ही आयुष्याची गरज असते जी सरतच नाही.. जे मैत्र हरवले तेच आठवणींचे डंख देत जातात.. जे सोबत असतात आणि ज्यांना आपल्या निस्सीम, निखळ, निर्मळ मैत्रीची आस असते त्यांना जीवापाड जपायचे असते. मैत्रीला कधीच वय नसते.. ती असते काळजातली सय..

'ढल जाती है हर चीज़ अपने वक़्त पर,

बस एक ' दोस्ती ' है जो कभी बूढ़ी नहीं होती.. '

हो पण मी खरंच खूप भाग्यवान आहे.. जोडलेल्या मैत्रमनोऱ्याला

मला मनापासून जपायचे आहे.. निदान माझ्याकडून तरी.. कुणी चुकून देखील दुखावले गेले की अस्वस्थ होत जाते. माझ्या आयुष्यातील मैत्रीला दिल से सलाम.. ऑगस्ट महिन्यात पहिल्या रविवारी मैत्रीदिन नुकताच साजरा झाला.. सगळेच सगळ्यांनाच भरभरून शुभेच्छा येत आहेत.. त्या निमित्ताने मनात उमटलेले एक चिंतन.. आभासी आहे हे जग पण खोटेही म्हणवत नाही..

दिवसेंदिवस माझ्या आभासी दुनियेतील मित्रमैत्रिणींची संख्या वाढतेय.. मला ती माझी संपत्ती भासत आहे.. मी पण ती आभासी दुनिया मनापासून जगतेय.. हो मला आवडते त्या उबदार शब्दांच्या दुनियेत डुंबायला.. सगळे कसे गुडी गुडी छान छान.. असे वाटते झोकून द्यावे स्वतःला.. फार काथ्याकूट हवीच कशाला..? आधीच काय कमी ताणतणाव आहेत का रोजच्या आयुष्यात?.. काही बालमैत्रिणी तर काही माहेरची मंडळी, काही वाचक मंडळी सारे कसे प्रेमाचा वर्षाव करत असतात.. चांगले वाईट तर सगळीकडेच असते.. नात्याचा पाऊस तिथेही पडत असतो.. खरे सांगायचे तर

आपल्यापासून कोसो मैल दूर असणारे आपले जिव्हाळयाचे मैत्र त्या निमित्ताने भेटतात.. एका क्लीकनिशी त्यांचे हालहवाल समजते.. भले नेहमीच संवाद झाला नाही तरी चालेल पण त्यांचे अस्तित्व देखील मनाला सुखावते हे मात्र नक्की..


लिखाण करत असल्याने माझे लिखाण निदान माझ्या ग्रुपने तरी डोळयाखालून घालावे असे मला वाटणेही साहजिक आहे कारण माझ्या लिखाणात रोजच्या जीवनातील विषय असतात.. आणि त्यांच्याकडूनही नेहमीच आवर्जून स्वागत केले जाते.. हेही तितकेच खरे की त्यावर त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केलीय पाहिजे असेही नाही.. काय सांगावे कदाचित त्यांना नसेल वाटले व्यक्त व्हावेसे.. हे ज्याचे त्याचे स्वातंत्र आहे.. मला नेहमीच वाटते की ह्या आभासी जगाचे पण काही नियम असावेत.. तुम्ही स्वतःला काही मोजमाप नक्कीच लावले पाहिजे.. अतिउत्साहाच्या भरात स्वतःच्या नादात त्याचा भडिमार तर आपण करत नाही ना हे तारतम्य पाळले गेले पाहिजे.. काही व्यक्ती अगदी मनाने पारदर्शक असतात आणि त्या सहजपणे व्यक्त होतात पण काही मात्र कावेबाजपणाने माहित करून घेतात आणि आपण त्या गावचेच नाही असं दाखवतात...

मनात मैत्रभावना असली तरच लिस्ट वाढवावी नाहीतर आहे तेही अधूनमधून चाळून घ्यावे.. शब्दांची भूक ज्यांना असते ते भाबडे मन रमून जाते.. न जाणो त्यांना कुठलाच कटू अनुभव न येवो म्हणजे झाले.. मध्यंतरी असेच झाले माझ्याशी अबोला धरलेली माझी मैत्रीण मला कुठेच दिसेना.. मग एकदम काळजी वाटली की ती अशी नेहमी व्यक्त होत असते मग अचानक अशी गप्प का.?. मला कासावीस व्हायला होत होते.. भले माझ्याशी नको बोलू बाई पण तुझी खुशाली तर दे.. तुझे खुश असणेही माझ्यासाठी महत्वाचे आहे आणि एक महिन्याने ती अचानक एका कॉमेंटमध्ये भेटली तेव्हा खुप आंनद झाला.. जणू काही हरवलेले मौल्यवान सापडले होते.. तेव्हा मी थोडे सावध पण झाले की इतके ह्या माध्यमांशी गुंतणे योग्य नाही.. असेही होते की समान आवडीनिवडीचे मैत्र इथे खुलतात.. गप्पांमध्ये रंगून जातात.. मैत्रीचा निखळ आनंदही देतात त्यामुळे ती मैत्री पण खरीच म्हंटली पाहिजे.. त्यातही काही गूढ स्वभावाची मंडळी ठाण मांडून बसलेली असतात की ज्यांना केवळ हेरगिरी करायला आवडते.. एका सखीचा असाच कटू अनुभव आला.. ती माझ्याबद्दल जाणून त्यावर माझ्यामागे चर्चा करायची आणि आपण त्या गावचेच नाही असे दाखवायची.. उद्वेग नक्कीच येतो पण तरीही मनाची आवराआवर करत फ्रेंडलिस्ट कमी करत जाणे सोयीस्कर ठरते..

शेवटी काय तर आपला कॉम्फर्ट झोन आपणच जपला पाहिजे.. जिथे योग्य वाटते तिथे रमले पाहिजे.. आपणच निर्माण केलेले हे आभासी जगत आहे तेव्हा त्यातून बाहेरही पडता आले पाहिजे.. अतिउत्साह टाळावा इतपत ठिक आहे पण मैत्री मात्र खरीच असते ह्यात काहीच शंका नाही...

## 21

## थोडे सहजतेने का नसावे..?



एका बसप्रवासातील ही गोष्ट आहे.. त्या दोघांनाही खिडकीजवळच बसायचे होते.. कितीतरी वेळ त्यांची कुरबुर सुरू होती.. कितीही दुर्लक्ष करायचे म्हंटले तरी ते कानावर पडतच होते.. त्रयस्थपणे थोडे समजावून पण सांगितले पण त्यांच्या मनात खदखद होतीच.. ज्याला खिडकी मिळाली त्याने मस्त ताणून दिली.. बाहेरचे हिरवे सृष्टीसोंदर्य त्यामुळे हिरमुसले असावे.. मनात आले की लोक अगदी साध्या साध्या गोष्टीवरून लगेच हमरीतुमरीवर येत असतात.. काही गोष्टी लगेच सोडून देण्यात शहाणपण असते नाही का..?हल्ली लोकांची सहनशक्ती जणू काही संपुष्टात आली आहे असे वाटू लागते.. कुणालाच धीर नसतो किंवा झटपट उत्तर हवे असते.. तुतु-मैमै करत प्रश्न सुटत नसतात.. तसे करण्यात आपली सक्रियता डागाळत जाते.. मनात एक प्रकारची निष्क्रियता साचत जाते.. कधी कधी तर जगातल्या प्रत्येक गोष्टीबद्दल लोक तक्रार करू लागतात.. जगाकडे

बोट दाखवत असतांना चार बोटे आपल्याकडे निर्देश करत आहे हे मात्र लक्षात येत नाही.. तितक्यात बसथांबा आला आणि खिडकीत बसलेला तो उतरून गेला.. जातांना शेजारच्याला खुन्नस द्यायला विसरला नाही.. लहानसहान गोष्टींना महत्व देणारे लोक आहेतच म्हणून भांडणतंटे आहेत.. सोडून देणारे आहेत म्हणून शांतता देखील आहे.. सोडून देणाऱ्या लोकांनाही स्व प्रतिष्ठा असतेच.. त्यांनाही वाईट वाटत असते पण त्यांना संघर्ष नको असतो.. त्यांना मात्र खड्यासारखे बाजूला केले जाते.. बसथांब्याप्रमाणे आयुष्याचाही अवचित शेवटचा थांबा येवू शकतो.. हे वास्तव पण लक्षात घेतले पाहिजे आणि छोटया गोष्टीतले लक्ष कमी केले पाहिजे..

बाहेर पावसाची रिपरिप चालूच होती आणि त्या घरात आजींचे आयुष्याबद्दल गार्हाणे मांडणे सुरू होते... आज त्या आजीबाई काही केल्या भूतकाळातून बाहेर येत नव्हत्या.. त्या तरुण असतानाच्या त्यांना खटकणाऱ्या गोष्टी सांगत सुटल्या होत्या.. कुठले नातेवाईक कसे कसे चुकीचे वागले माझ्याशी.. कसे कसे मला अपमानित केले गेले.. जावेने कसे टोमणे मारले आणि मी कसे ऐकून घेत गेले.. इकडची स्वारी मुखदुर्बळ असल्याने नातेवाईकांनी अकारण खूप त्रास दिला. मत्सर केला इत्यादी

इत्यादी.. आणि हो अजूनही ते शब्द मला जसे न तसे आठवत आहे ही टेप त्यांनी आजवर सगळयांनाच किती आणि काय वेळा ऐकवली असेल गणतीच नाही... मुलीला ऐकून घेण्याशिवाय पर्याय नव्हता.. त्या मन मोकळे करतात तर ऐकावे आपणही असा विचार ती करायची पण कधी कधी त्या गप्पांमधून नको तितकी नकारात्मकता घरात साचून राहायची.. तिची मधली सॅन्डविच पिढी ना.. दोन्हीकडून ऐकून घेणे भाग होते.. तिला माणुसकीच्या नात्याने माणूस म्हणून ऐकून घेणे हे आपले कर्तव्यच आहे हेही पटत होते.. संवेदनशीलता म्हणजे जणू काही जीवनाला शाप असतो.. पण त्या कटू आठवणींना वर्तमानकाळात रेंगाळू देणे हे तिला खटकत होते.. चुकीचे लोक चुकीचे वागतात आणि त्याची सजा चांगुलपणाला भोगावी लागते. शेजारीण म्हणाली सुद्धा तुम्ही ज्यांच्या बद्दल बोलताय ते लोक हयात देखील नाही तरी इतका कडवटपणा इतकी वर्षे कशासाठी जपलाय तुम्ही..? पण तिला माहित होते तिचा विचार त्यांच्यापर्यंत पोहोचणे अवघड आहे कारण अतिशय संकुचित आणि संमित आयुष्य आहे त्यांचे.. विचार करण्याची पद्धत वेगळी होती.. कदाचित तेव्हा प्रत्युत्तर देण्याची हिम्मतही नसावी.. त्यामुळे ती घुसमट मनात साचलेली असावी.. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोनही फारसा निकोप नव्हता.. त्यांनी खरोखरच सहनही केले असावे पण आता

वर्तमानकाळात त्या गोष्टी उगाळणे म्हणजे मन:स्वास्थ बिघडवून घेणे होय हे काही केल्या त्यांच्या लक्षात येत नव्हते.. हे सगळे ऐकून घेणारी ती मात्र उगाचच अस्वस्थ झाली होती.. आपण तर अशा कितीतरी गोष्टी सोडून दिल्या आहेत आणि त्या गोष्टींचा उच्चारही केला नाही. आयुष्याचा वेग इतका बेफाम की कटू सारे विसरण्यातच शहाणपण होते.. रेंगाळायला.. अडकायला.. कुढत बसायला तसेच वांझ चर्चा करायला वेळच नव्हता.. आहे तो वेळ चांगल्या गोष्टींना कसा पुरवावा ही विवंचना सतत सतावत होती.. त्या त्या वेळेस त्या त्या अप्रिय गोष्टींवर विजय मिळविला होता म्हणजेच काय तर त्यातून बाहेर यायला ती शिकली होती.. आता मागे वळून पाहिल्यावर धन्य धन्य वाटते आहे.. मनात कुठलाच किंतुपरन्तु येवू द्यायचा नाही हा तिचा प्रयत्न होता.. त्यात ती जाणीवपूर्वक यशस्वी झाली होती.. वास्तव स्वीकारत गेल्याने स्वतःची पाठ थोपटून घ्यावेसे वाटले पण ती विचाराधीनही तितकीच झाली.. खरंच इतके अवघड असते का वर्तमानकाळाचे बोट धरणे आणि त्याच्या सोबत चालणे.. तिला आजींचा तो सल कसा दूर करावा तेही कळत नव्हते.. कदाचित त्यांना ते आवडलेही नसते कारण वयाचा मान तर ठेवावाच लागतो.. आता असे कितीसे आयुष्य उरले आहे तर माफ करून टाकावे ना त्यांनी सगळयांनाच.. आणि टाळी ही कधीच एका हाताने वाजत नसते.. त्यांच्याही

नकळतपणे झालेल्या काही चुका असू शकतात पण आता तो सारा भूतकाळ होता.. त्यावर कितपत चर्चा करावी हे आपणच ठरविले पाहिजे.

व्यक्ती तितक्या प्रकृती असतात हेच खरे.. एकाच गोष्टीवर प्रत्येकाकडून येणाऱ्या प्रतिक्रिया वेगवेगळया असू शकतात.. काही लोकांवर तर नेहमीच अन्याय होत असतो पण त्यांना आपल्यावर अन्याय होत आहे हे त्यांच्या गावीच नसते.. अगदी सवयीचा आणि जगण्याचा भाग आहे असे समजून ते जगत असतात.. स्वीकारत जातात.. 'जीवनगाणे गातच जावे.. झाले गेले विसरून जावे.. पुढे पुढे चालावे' असे त्यांचे अवघ्या जगण्याचे गणित असते.. हत्ती चालत राहतो मागे कुणी भुंकत असले तरी तो मागे वळून बघत नाही.

परवा तिची स्मार्ट विचारी मैत्रीण म्हणाली अग एखाद्याचे वागणेबोलणे काही पटले नाही ना तर सरळ तोंडावर सांगून मोकळे व्हावे आणि त्या विषयाला तिथेच पूर्णत्व द्यावे.. मनात कुढत बसू नये.. स्पष्टपणे काय ते बोलावे आणि त्या विषयावर तिथल्या तिथे फुली मारावी.. पुन्हा पुन्हा तोच तो विषय नको.. लोक म्हणतात काय फटकळ आहे .. काय स्पष्टवक्ती आहे वगैरे वगैरे पण निदान पुढच्या वेळेस अकारण दुखवतांना थोडा विचार तरी करतात..

प्रत्येकाचे मनोव्यापार इतके अगाध आणि गुंतागुंतीचे असतात की शक्य नसते असे मनातून काढून टाकणे.. विज्ञान कितीही विकसित झाले तरी ह्या मनोव्यापारावर ठोस असे उत्तर नसतेच नसते.. पण विचार केला तर अवघड तरी काय आहे त्यात..?मनातला कचरा फेकता आलाच पाहिजे.. नेहमीच आपल्या मनासारखे होईलच असे नाही.. समोरच्यालाही तितकी वैचारिक खोली असेल असेही नाही मग असे पूर्णत्व देणे महत्वाचे नाही का..?कुठल्याही अडचणीवर आपणच तोडगे काढायचे.. नाहीच कुठे गुंतून पडायचे हे तिने ठरवूनच टाकले आहे.. बघू किती पुर्णत्व देणे शक्य आहे.. !.. काही फाईल्स वर्षानुवर्षे बंद अवस्थेत धूळ खात बसलेल्या असतात तसे काही शल्य बंद करून टाकायचे मनाच्या एका कप्प्यात.. पुन्हा पुन्हा तेच ते उगाळणे म्हणजे वर्तमानातील सुंदर सुंदर क्षणांना अकारण तिलांजली देणे होय.. गुलजारजी ह्यांच्या ओळी मला खूप भावतात..

'मिलता तो बहोत कूछ है


ईस जिंदगी में

बस हम गिनती ऊसीकी करते है

जो हासिल ना हो सका'

# 22

# शब्दांवाचून शब्दांपलीकडले..



एकदा ती आणि मी अगदी काळजातल्या गप्पा मारत होतो... दोघीही नेहमीच व्यस्त असल्याने व्हाट्सएपच्या माध्यमातून आमच्या गप्पा होत असतात.. आमच्याकडे सदा विषयांची रेलचेल असते.. गप्पांना वेळ तर कधीच पुरत नाही.. कधीतरी गॉसिपिंग देखील असते.. म्हणजे काय तर आपल्या आयुष्यात न पटलेल्या पण आपल्यावर आदळत असलेल्या काही गोष्टी किंवा व्यक्ती असतातच ना मग त्यामुळे अतिशय घुसमटायला होते.. मग ते मनातले सांगायला देखील काळजातीलच व्यक्ती हवी असते आणि ती खूप विश्वासातील हवी असते की त्या व्यक्तीजवळ आपल्या मनातील खळबळ मांडता येईल... किंवा एखादी गोष्ट जर अगदीच मनाविरुद्ध घडत असेल तर तो निषेध व्यक्त करायला देखील हक्काची व्यक्तीच हवी असते.. विशेषतः आपले कुठे चुकत असल्यास ती व्यक्ती आपला

कान उपटू शकते.. इतपत नात्यात मोकळेपणा असलाच पाहिजे.. तोंडदेखले कौतुक करणारे तर खूप असतात पण जे लोक खरोखरच आपुलकीची असतात तीच आपल्याला न राहवून समज देत असतात किंवा आपल्याला समजून घेण्याचा प्रयत्न तरी नक्कीच करतात..

हो पण तरी काही स्तर असतातच काळजाचे जे आपण कुणालाच उलगडून दाखवू शकत नाही.. काही शल्ये असतात.. काही अपमान असतात.. काही नैराश्य असते जे कुणालाच दाखवता येत नाही किंवा बोलूनही दाखवता येत नाही.. पांगळी व्यक्ती जाते तेव्हा सोबत त्याच्या कुबड्या पण जाळून टाकल्या जातात अगदी त्याच प्रमाणे काही शल्ये आपल्याबरोबरच संपणार असतात. एकदा आमच्या जीवलग मैत्रीत काही कारणाने गैरसमज झाला होता.. भेटीला वेळ नव्हता मग ती मोबाइलच्या आभासी खिडकीत लिहायची परत खोडून टाकायची.. लुटुपुटूच्या भांडणाच्या निमित्ताने तिचा हा एक पैलू माझ्या लक्षात आला अर्थातच मी ते सहजतेने घेतले.. मोबाईलवर शब्द आले..

This msg was deleted..

अशी वाक्ये जेव्हा व्हाट्सएप संभाषणात येतात तेव्हा आपण नकळतपणे विचाराधीन होत जातो.. मनाला उगाचच हुरहुर वाटते

की नेमके कुठले शब्द उडविले असतील.. काय म्हणायचे असेल बरे.?असा शब्दांचा गळा का घोटला गेला असेल.?खोडावेसे वाटले पण मनात तर होते ना..?सांगायचे आहे खूप खूप आणि मनातही आहे पुष्कळ पुष्कळ मग अशी आळी मिळी गुप चिळी का असावी बरं..?बोलायचे होते ना बिनधास्तपणे.. असेही जगण्यासाठी नेहमीच धैर्य जमा करावे लागते तसे धैर्य आता का नाही दाखविले सखीने.. काय झाले असावे..?कुठली अनामिक भीती तिच्या मनात असावी अशा अनेक विचारांमध्ये मग मीच गुरफटून गेले.. एक उत्सुकता नक्कीच असते की खरंच काय म्हणायचे असेल आणि अशी माघार का घेतली असावी.. हवेतच विरून गेलेले शब्द आता त्यांना कुठे शोधायचे..?ह्या खोडलेल्या शब्दांतून शब्दापालिकडले मात्र मनात रुंजू घालू लागले.. मोबाइलचे एक बरे असते.. ते एक निर्जीव यंत्र असल्याने आपण जे काही सांगू त्याची अंमलबजावणी लगेच होत असते आणि आपणही यांत्रिकतेने त्यात आपल्या भावना गुंफत जातो.. गुरफटत जातो.. व्यक्त होत जातो.. व्यक्त होता होता कधीतरी काळजातले मनाच्या पृष्ठभागावर अलगदपणे टुणकन उडी मारत येते आणि आपण खरडून मोकळे होतो .. थक्क व्हायला होते की अरेच्चा इतके काही साचले आहे तर... मग प्रत्यक्ष लिहायला किंवा बोलायला काय हरकत आहे?.. असो..

ग्रुपवर भिन्न भिन्न स्वभावाचे मनोवृत्तीचे लोक एकत्र नांदत असतात.. तिथेही असे वाक्य अधूनमधून आपण वाचत असतो..

This msg was deleted... त्यामागे नेमकी काय मनोभूमिका असावी बरे..?पुन्हा तो जीवघेणा विचार जोर करू लागला असेल का.. आपणही लिहिलेले नष्ट करतो.. वाटते की ग्रुपमध्ये रुचेल का आपले असे व्यक्त होणे.. सत्य खूप सुंदर असते पण ते एक जळजळीत वास्तव देखील असते.. ते सगळ्यांनाच सहजासहजी स्वीकारता येत नाही... मग काय करावे..?इथे तर फारशी संवेदनशीलताही नाही.. माणूसपण हरवल्यासारखे वाटते आहे मग मनात दाटलेले मनातच ठेवले पाहिजे.. उगाचच आपण त्या संभाषणात भाग घेतला.. कुणी समजून घेणारे नसेल तर वृथा समर्थन तरी कशाला हवे?.. मग लिहिलेले घाईघाईत पुसून टाकतो.. डिलीट मारतो.. You deleted this msg.. अगदी अशाच विचाराने सखीनेही डिलीट मारले असणार.. पण व्हाट्सअप्पने मात्र प्रामाणिकपणे सांगून टाकले सगळ्यांना की संदेश नष्ट करण्यात आला आहे.. म्हंटले तर रोजच्या जीवनातील ही सामान्य बाब आहे..

सगळे काही अंगवळणी पडले आहे तरीही मनात असंख्य प्रश्न आहेतच.. जगण्याच्या नानाविध पसाऱ्यांपैकी सर्वात मोठा पसारा

म्हणजे व्हाट्सएप पसारा होय.. तिथे सोशल विवेकबुद्धी खूप गरजेची असते.. नाहीतर मग टोळीयुद्ध अटळ होत जाते.. इथे प्रत्येकाला ताबडतोब व्यक्त व्हायचे असते पण बरंय की निदान डिलीट मारायचा पर्याय आहे आपल्याकडे.. प्रत्यक्ष जीवनात पण असा पर्याय असता तर किती छान झाले असते.. सगळे काही अप्रिय पुसता आले असते आणि पाटी कोरी झाली असती.. परवा त्या ऐशी वर्षाच्या आजी स्वतःशीच पुटपुटत होत्या.. आधी मला वाटले की त्या फोनवर बोलत असाव्यात मग मी सहज छेडले तर म्हणाल्या.. 'चुकलेच माझे अनेक वेळा.. मी इतके टोकाचे वाईट बोलायला नको होते सुनेला.. आता मलाच पश्चाताप होतो पण वेळ तर निघून गेली आहे.. '... मी त्यांना ओळखत होते म्हणून समजावले.. त्यांची सून चांगल्या संस्कारातील असल्याने त्या कशाही वागलेल्या असल्या तरी वावगे वागणारी नव्हतीच.. आजीबाईंना त्यांचे वय असुरक्षितता जाणवून देत होते म्हणून आता त्या नरमल्या होत्या.. असो.. त्यांना ती जाणीव झाली हे सुद्धा खूप होते.. सत्ता आणि अधिकार असला की भान नसते हेच खरे.. असे आपण कुणाशी चुकीचे वागलो तर तेही मनातून नष्ट करायला काहीतरी सोय हवी होती ना.. तसे होत तर नाहीच उलट प्राधान्याने कटू ते आधी आठवत जाते.. मन अनाकलनीय असते त्यामुळे आपणच आपल्या मनाचे शिकार बनत जातो.. आजीबाईंना जसा

आता स्वतःच्याच मनाचा त्रास आहे अगदी त्याप्रमाणे आपण खंत करत बसतो.. कधी कुणी नकळतपणे दुखावले गेले असल्यास आपण त्या व्यक्तीला स्पष्टीकरण देत जातो.. शब्द बाहेर तर पडलेले असतात पण त्या व्यक्तीला आपल्याला तोडायचेही नसते.

एकदा स्त्री मासिकात फार सुंदर कविता छापून आली होती.. मला ते शब्द मनापासून भावले.. कुणाचे शब्द ते माहीत नाही.

'हिला बोलू द्या..

कोणी म्हणतंय अशाने गेली..

कोणी म्हणतंय तशाने गेली..

हे झालं.. ते झालं..

मला तर वाटतं हिचे शब्द हिच्या घशात अडकले..

म्हणूनच ती गेली..


हिला जगू द्या.. हिला बोलू द्या.. '

खरंय.. जगण्यासाठी तिला व्यक्त होऊ देणे खूप महत्वाचे आहे.. ती बोलली नाही तर तिची घुसमट तिलाच गुदमरून टाकेल.. आताही तिला धैर्य जमा करायचे आहे.. आणि बोलायचे आहे.. भले माध्यम आभासी असले तरी त्याचा आधार घेत बोलायचे आहे.. शब्द बाहेर पडले नाहीतर ते काळीज जाळतात..

मग ते आत अडकायलाच नको.. इथे सशाच्या काळजाची माणसेही असतात जी अन्याय सहन करत जातात आणि होरपळून निघतात.. डिलीट न मारता सामोरे जाता आले पाहिजे... तिलाच असे नाही तर सगळ्यांनाच हे लागू पडत आहे.. प्रत्येकाने आपल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आनंद घेतला पाहिजे.. होते असे की मनात असते एक आणि ... आपण केवळ औपचारिकता कुरवाळत जगत असतो..

# 23

# नवे संकल्प नवे विकल्प..



नेहमीप्रमाणे यंदाही 31 डिसेंबर 2019 चा दिवस आला .. रात्री बारा वाजता सर्वांनी नववर्षाचा जल्लोष केला... सगळ्या माझ्या काळजातील लोकांबरोबर असूनही मी थोडे आत्ममग्न झाले होते.. मनातल्या एका कप्प्याशी मी गप्पा मारत होते.. पुढच्याच क्षणी 2020 असेल.. म्हणजे तारीख बदलेल.. काही दिवस सवयीने 2019 च लिहिले जाईल.. थोडीशी खाडाखोड होईल.. थोडी चिडचिड होईल स्वतःवरच.. पण लगेच दोन दिवसांनी 2020 लिहिण्याची सवयही होऊन जाईल.. 2019 चे कॅलेंडर नजरेआड करतांना उगाचच थोडी हुरहूरही वाटेल.. सुखदुःखाचा गतपट नव्याने साकार होईल.. आनंददायी तारखा सुखावत जातील.. कॅलेंडर फेकतांना जीव खालीवर होईल पण काय काय जपून ठेवायचे हाही विचार मनात येईलच.. एक खोल सुस्कारा सोडत

आपण 2020चे बोट पकडून वास्तवात येवू या.. खरंच.. आपण किती लगेच बदल स्वीकारत असतो.. नववर्षाचे स्वागत करत असतो.. कालगणनेनुसार सारे काही घडते आहे त्यात जगावेगळे असे काहीच नाही.. कालगणना देखील पूर्वापार आहे.. मग हा जल्लोष नेमका कशाचा आहे तेच कळत नाही.. कुछ खोया कुछ पाया अशी आपली अवस्था असते.

सहज मनात आले तसे फारसे काय बदलणार आहे म्हणजे उद्या सूर्य, चंद्र, तारे नेहमीप्रमाणे तर उगवणार आहे.. आपलाही दिनक्रम थोड्याफार फरकाने तसाच असणार आहे.. नद्या, झरे ही तसेच वाहणार आहे.. पक्षीही तसाच किलबिलाट करणार आहेत.. आपली जिव्हाळ्याची नातीही तशीच चिरंतन राहणार आहेत.. शुभेच्छा दिल्या घेतल्या नाहीतरी शुभेच्छा सोबत असणारच आहे.. आपल्या हाकेसरशी ते धावून येणार आहेत.. तेच ते आठवणींचे जुने गाव आपल्या सोबत असणार आहे.. अनुभवांचे गाठोडे एक वर्षाने समृद्ध होणार आहे.. वय विचारतांना किती वसंत पाहिले अशी जी विचारणा होते त्यात एका वसंताची भर पडेल.. एका पावसाळ्याची भर पडेल.. आला दिवस गेला दिवस तसे कॅलेंडर पलटले जाईल.. पान बदलत असतांना स्वतःलाच प्रश्न विचारणार की समजलेच नाही वर्ष कसे गेले ते.. आत्मपरीक्षण

करत असतांना आपणही संकल्पशूर बनून संकल्प करणार आणि हळूच स्वतःला सूट पण देणार.. काही कबुलीजबाब पण देणार.. नेहमीच आपण बरोबर असतो असेही नाही.. कळतनकळत काही व्यक्ती दुखावल्या जातात.. काही जण मागे पडतात ते उगाचच आपल्याला काही ना काही लेबल लावत जातात.. पुढे गेलेला कारवा प्रेरणा देत जातो.. काही काही वेळेस आपल्या मर्यादा तसेच क्षमता आहे तिथेच खिळवून ठेवतात.. सगळयात त्रासदायक असतात मनात असलेले खंदक.. आपली रूढ मानसिकता जी अगदी कातडीला चिकटलेली असते.. त्यामुळेही एखादा थांबा वेळ घेतो.. त्यातून लवकर बाहेर पडता येत नाही.. आताही मागच्या वर्षी केलेले संकल्प हवेतच विरून गेले ही जाणीव नव्याने होणार.. पुन्हा तेच संकल्प मागच्या पानावरुन पुढे चालू.. हो ना!

ओळखीचे एक मध्यमवयीन गृहस्थ सांगत होते ते क्षणाक्षणाचा अधिकतम उपयोग व्हावा ह्या हेतूने दर एक तासानंतर एक आढावा घेतात की खरच ह्या एका तासात मी दर्जात्मक असे काय काय काम केले की उगाचच करायचे म्हणून काम केले.. मला नेमके काय हासील झाले ह्या एक तासातून.. आयुष्यात ठरविलेले ध्येय उद्दिष्टे आणि त्यानुसार ठरवलेल्या मार्गावर मी आहे का.. ध्येयवादी मी माझ्या ध्येयापासून विचलित तर नाही झालो ना..?

इत्यादी इत्यादी.. त्या गृहस्थांची ही किती छान कल्पना आहे ना.. !लक्षात आले की म्हणूनच ते आयुष्यात यशस्वी झाले असावे.. असे पण व्यवहारी होता आले पाहिजे.. यश मोजण्याची प्रत्येकाची फुटपट्टी वेगळी असू शकते हेही मान्य आहे.. आयुष्यातील सुखसमाधानाचे स्वागत करता आले पाहिजे.. असेही जे आपले असतात तेच आपले असतात.. जे मनाने चांगले असतात तेच चांगल्या गोष्टीला चांगले म्हणू शकतात.. असे म्हंटलेच जाते ना .. *दुनिया तो एकही है फिरभी सबकी अलगअलग है.. *त्या दुनियेत प्रत्येकाचे स्थान वेगवेगळे असते.

आपणच आपले मूल्यमापन केले पाहिजे.. आयुष्यात खूप काही करायचे असते पण कमतरता जाणवते वेळेची.. वेळेची पण एक गंमतच असते.. वेळ नाही असं म्हणत असतो आपण आणि नकळत वेळही खर्च करत असतो आपणच.. कुठे अटकाव करता येईल का.?तर नवीन वर्षापासून मी संकल्प केलाय की शक्यतो महत्वाचेच काम असल्यास फोनचा वापर करायचा.. आम्ही एकदा बाहेरगावी गेलो होतो तिथे फोनला रेंज नव्हती त्यामुळे कुणाच्याच हातात मोबाइल नव्हते.. खूपशा ऐसपैस गप्पा झाल्या.. मनात आले की खरंच इतके काही बोलायचे साचले होते की.. असा नो

मोबाइल डे पाळायला काय हरकत आहे अर्थातच ते अवघडच आहे.. मोबाइल म्हणजे जणू आपले आभासी ऑफिसच असते.

आता ठरविले पाहिजे की व्हाट्सएप दिवसातून ठराविक वेळीच अपडेट करायचे.. फॉरवर्ड सम्राटांकडे दुर्लक्ष करायचे.. माझा फोन म्हणजे जणू चौकशी केंद्र असं समजणार्यांना चार हात दूर ठेवायचे.. दिवसभरातील किती फोन फुकटची समाजसेवा ह्या सदरातील असावे ह्याची कल्पनाही करू शकत नाही.. खूप उद्वेग होऊनही उपयोग नाही.. मीच सवय लावली ना त्यांना.. हसतच सहन करावे लागणार. तर असो.. तसे फोन नाही आले तरी आपण फारच कुचकामी आहोत ही भावना छळत जाणार.. स्वतःवरच लक्ष केंद्रित केले तर तेही मनाला रुचणार नाही.. ठरवलेय खरे मनापासून.. पण.. पण.. हो नक्कीच ठरवले आहे.. ठाम निर्धार असला की निम्मे काम झाल्यासारखे असते.. जानेवारी महिन्याचा हा पहिला आठवडा आरंभशूरच असतो असे म्हणून मनाची समजूत घालणे आता तरी नको.. स्वीकारण्याची जादू अगाध आहे.. आणि स्वीकारण्यातच जीवनाचा आनंद आहे.

# 24

# शेअर ऍण्ड केअर..



जातकुळी तिच्या दुःखाची..

ती तशी माझी दूरची मैत्रीण.. म्हणजे जवळच्या मैत्रिणीची मैत्रीण आहे.. जवळची मैत्रीण तिच्याबद्दलच बोलत असते ना त्यामुळे ह्या चुलत मैत्रिणीचा माझ्या मनात शिरकाव कधी झाला समजलेच नाही..

मैत्रिणींचे ही वर्तुळे असतात ना.. काही आपल्याला शब्दावाचून समजून घेतात.. ज्यांच्याकडे आपल्याला कधीही केव्हाही मन मोकळे करता येते म्हणजे त्या प्रथम वर्तुळातील असतात.. मी म्हणजे केंद्रबिंदू मानले तर त्या भोवती असंख्य अगणित वर्तुळे आहेत.. काहीजणी उगाचच आपल्यापासून दूर जातात.. नकळतपणे दुखावल्या जातात.. अर्थाचा बेअर्थ होत जातो मग मैत्रीत पण मोजूनमापून बोलावे लागते.. मैत्री मोकळा श्वास घेवू शकत नाही.. सारखी मानेवर टांगती तलवार असते की ही दुखावली तर नाही जाणार ना..?त्यापेक्षा सुरक्षित अंतरावर बरी म्हणून तिचे वर्तुळ दूर जाते.. मैत्री तुटायला नको ही भीती असतेच.

मैत्रीचे परीघ कधी वाढतात तर कधी अकारण आकसून जातात.. शब्दांमुळे सारे काही घडत असते. कळतनकळतपणे काही वर्तुळे पुसट होतात तर काही गडद गडद होत आपले अवघे आयुष्य व्यापून टाकतात.. खरंतर काळच ठरवत असतो की आपण कुणासोबत राहायचे.. त्या त्या परिस्थितीजन्य अनुभवांनी आपण शहाणे होत जातो आणि त्या ठराविक वर्तुळात आश्वस्त होत जगत जातो.. जगण्यासाठी तेच तर हवे असते.. आपली आवडती माणसे आपल्या आजूबाजूला असावीत असे सारखे वाटते आणि मग तो एक सवयीचा भाग होत जातो.. भावनांच्या अतिआहारी गेल्यावर कुठेतरी प्रगती खुंटत जाते.. कळत असते पण ते पचनी पडते असेही नाही..

मैत्रीचे नाते बहरले की मनातले आपोआप ओठावर येते.. गप्पांच्या माध्यमातून सुखदुःखे ज्ञात होतात.. एक मात्र त्रिकालाबाधित सत्य असते की एकाच आयुष्यात आपल्याला सगळेकाही परिपूर्णतेने मिळत नसावे.. त्यामुळेच तर प्रत्येकाला काही न काही शल्ये असतातच असतात.. ती शल्ये आयुष्याला घेरून टाकतात.. ती बोच सतत वेदना देत जाते.. त्रयस्थ नजरेने पाहिले तर असेही वाटते की ह्याला काय दुःख म्हणावे का..?ही तर रोजच्या जगण्यातली बाब आहे आणी तेच कुरवाळत बसलो तर पुढच्या थांब्यावर कसे काय जाणार..?काही गोष्टींना पूर्णत्व देताच

आले पाहिजे.. पण मग विचार येतो की प्रत्येकाची दुःख सोसण्याची पातळी देखील भिन्न आहे.. प्रत्येकाची भावनिक पातळी भिन्न आहे.. जगण्याचा पोत वेगवेगळा आहे.. जडणघडण तसेच संस्कार सारेच भिन्न आहे मग हा भेद येणारच.. 'परदुःख शीतल' असेही असावे.. पण खरंय जावे त्याच्या वंशा तेव्हाच समजते सारे सारे.. असो

.. तर त्या मैत्रिणीच्या मैत्रीणीबद्दल जेव्हा मी जाणून घेतले तेव्हा मला भावनिक धक्काच बसला.. पन्नाशीची अतिश्रीमंत वर्गात मोडणारी ही रोज रात्री झोपतांना अँटीडिप्रेसंट गोळ्या घेत असे.. त्याशिवाय ती सलग पाच तास झोपू शकत नव्हती.. काळजी घेणारा पती, प्रेम करणारा हुशार मुलगा आणि सोबत खंडीभर मैत्रिणी.. तरीही ती नैराश्याने वेढली गेली होती.. सगळी तर भौतिक सुखे पायाशी लोळण घेत आहे.. अगदी सगळे काही जिथल्या तिथे तरीही निराशेची पोकळी तिला सतत सतावत होती.. मग ती आत्ममग्न राहू लागली.. कधीतरी उगाचच फटकळ होत गेली.. माणसे दुखवत गेली.. तिसऱ्या कोनातून जेव्हा मी तिच्याकडे पाहत होते तेव्हा ती मला उलगडत गेली.

जगात प्रत्येकाच्या दुःखाची जातकुळी वेगवेगळी असते.. त्या जातींना पोटजाती देखील असतात ज्याचा आपण कल्पनेतही

विचार केलेला नसतो.. एकदा निमित्ताने तिच्याशी मनमोकळया गप्पा झाल्या आणि ती जवळच्या वर्तुळात स्थानापन्न होत गेली.. मला तिच्याबद्दल आत्मीयता दाटून आली.. 'शेअर आणि केअर' म्हणजे कुठल्याही नातेसंबंधाचा आत्मा असतो.. कुणी काही शेअर केले तर त्या शेअरिंगची काळजी घेतली पाहिजे.. तरच ते नाते टिकत जाते.. शेअरिंग पातळी वाढत जाते.. पण नेमके तेच टाळले जाते आणि नात्याला बहर येतच नाही.. नातेसंबंधांचे 'पोत' तलम रेशमी होण्यासाठी मनातले ओठावर आलेच पाहिजे.. तर तीही बोलती झाली.. मुंबई महानगरात तिने आपल्या वयोवृद्ध आईवडिलांना आपल्या आसपास राहायला घर शोधून दिले.. तिला तिचा संसार नोकरी सांभाळून त्यांना वेळ देता येणे सोपे व्हावे म्हणून ती धडपडत होती.. एकुलती एक लेक आणि तीही जवळ त्यात ती कर्तव्यदक्ष मग तिच्या जबाबदाऱ्या वाढतच गेल्या.

जन्मदात्यांची तीच काळजी घेत गेली.. ज्याची परदेशातील भावाला ही सवय होत गेली.. केले तर काय बिघडले आई वडील आहेत ना तुझे असे प्रश्न तिला विचारले गेले .. वडील खूप शिस्तीचे काटेकोरपणे वेळापत्रक पाळणारे असल्याने ती अजूनही त्यांच्या रागाला घाबरत असे.. त्यांच्याकडे नोकरमाणूस टिकत नसे मग हिचीच ओढाताण होत असे.. आजही पहाटे सहाला आईचा फोन

की आम्हाला चहा प्यायचा आहे आणि सिलेंडर संपले आहे.. नवीन लावून द्यायला तू ये.. थकलेली ती भर झोपेत होती पण त्या फोनने ती अस्वस्थ झाली.. आणि मुकाटपणे माहेरी गेली.. वय झाले की असे विक्षिप्त पण येत असावे असे स्वतःला समजवत गेली पण तिला ते जड जात होते.. असे काही प्रसंग घडले की ती मनाने तुटत गेली.. ज्या पालकांवर आपण मनापासून प्रेम केले ते भावंड पक्षपात कसे काय करू शकतात अशी चीड मनात दाटून आली.. नवरा खूप समजूतदार असल्याने तो अगदी मुलाप्रमाणे सासुसासर्यांची सेवा करत असे.. तिला सगळे म्हणायचे बरंय ग तुला कधीही माहेरी जाता येते.. ते तिलाही मान्य होतेच पण ती खूप अडकून गेली होती.. आपली मुलगी मोठी झाली आहे.. तिलाही तिचे आयुष्य आहे ह्याचा विसर माहेराला पडला होता.. आता ती सांगणार तरी कुणाला..?देवतुल्य आईवडिलांना दुखवू शकत नव्हती आणि स्वतःसाठी तिला वेळ तोकडा पडत होता.. आतल्या आत घुसमट झाल्याने डोळ्याखाली काळे वर्तुळे आली होती.. आता ती स्वतःच उतरवयाकडे झुकत होती पण तिचे अडकणे सुटत नव्हते.. मग ती मानसोपचार तज्ञाकडे गेली आणि मग गोळ्या सुरू झाल्या.. डॉक्टरांशी बोलल्यावर तिला बरे वाटू लागले..

बोलण्यातून चर्चेतून काहीतरी मार्ग नक्कीच शोधता येतो.. सगळेच काही पांढरेशुभ्र वा काळेकुट्ट नसते.. त्यातून मधली राखाडी छटा शोधावीच लागते.. त्यालाच तर जीवन ऐसे नाव असावे..

मागे वाचनात आले होते की येणाऱ्या काळात एका सर्वेक्षणानुसार शंभर भारतीयांमागे 5 ते 6 जण नैराश्याने घेरलेले असणार आहे.. म्हणजे आपल्या आजूबाजूला अशा व्यक्ती नक्कीच असणार आहेत.. ते निराशेच्या जगात जातात म्हणजे काय तर स्वतःवरच थंडपणे राग करत जातात.. जगापासून दूर फेकले जातात.. अशांना आवर्जून समजून घेतले पाहिजे.. विक्षिप्तच आहे.. तिरसटच आहे असे लेबल लावून चालणार नाही.. सगळ्यांनी डोळस होत ह्या नव्या काळातील नव्या समस्यांकडे पाहिले पाहिजे.


'समझ सके तो समझ जिंदगी की उलझन को..

सवाल उतने नहीं है, जवाब जितने है.. '

किती अर्थ सामावला आहे ह्या ओळींमध्ये.. चला तर मग ती उत्तरे आपण शोधू या.. !

# 25

# नावडतीची कथा...



ती माझी एक उत्साही सखी आहे.. तशा सगळ्याच कमी जास्त प्रमाणात उत्साही असतात.. माझ्या सगळ्याच मैत्रिणी मला खूप खूप आवडतात.. काहींना मी आवडत नसले तर मीच माझी वाट बदलून घेते.. बाई तू रहा तुझ्याच विचारांसोबत.. मला तुझ्याबद्दल काहीच तक्रार नाही.. मग काळाचे पाणी डोक्यावरून गेले की काळाच्या ओघात मागे पडलेल्या मैत्रिणीही अवचित भेटतात.. भेटीत फारच मोठी दरी पडली ग अशी खंत व्यक्त करतात.. दरी पडली हे वास्तव असते ज्यामुळे भेटीविना अनेक वर्षे सरली असतात.. जरी कारणे अनेक असली तरी... ती कारणे पटणारी नसली तरी आपण कालप्रवाहात पुढे पुढे जाण्यातच शहाणपण असते.. कारवा चलता रहता है... प्रत्येकीच्या मनात तिने आखलेले एक विश्व असते..

प्रत्येकीची पुढे पुढे जाण्याची धडपड असते.. कुणी जात्याच आनंदी असते जिला आनंदी होण्यासाठी छोटेसे निमित्तही पुरेसे असते.. ती मुळातच आनंदयात्री असते.. तिला सुखीसमाधानी संसाराची आस असते.. मनातली खंत ती सहसा कुणाजवळ बोलून दाखवत नाही... आनंदाचा सडा शिंपत जाते.. मग बाह्यसोंदर्याने सुंदर नसलेली सखी देखील खूप सुंदर भासत जाते.. बॉडी शेपिंगबद्दल कुचकट शेरे मारणारे जग असते मग तीही दुर्मुखून जाते.. तिच्यात काहीसा न्यूनगंड निर्माण होऊ शकतो.. 'कायभुललासी वरलिया रंगा' असे विचारावेसे वाटते.. त्यामागे अशी सकारात्मकता देखील असू शकते की आपल्या सखीने फिट अँड फाईन असावे म्हणून त्या एकमेकींना सजगतेने सांगत असाव्या की तू जाड झालीस किंवा बारीक झालीस.. अशा जागरूक सख्या अपवादानेच आंतरसौंदर्याने भारलेल्या असतात.. जे सोंदर्य वयापरत्वे खुलत जाणार आहे त्या प्रत्येक वयावर प्रेम केले पाहिजे.. एखादी वयाच्या मानाने विचाराने पोक्त असते तर एखादीला खूपसे वय उलटून गेले तरी विचारांची ठाम बैठक नसते.. वारा येईल त्या दिशेने तिचे विचार भरकटत जातात.. तिला आपल्या पुढे कुणीच गेलेले चालत नाही.. वयामुळे जणू काही त्यांना सर्व अधिकार प्राप्त झालेले असतात त्यामुळे कुणी काही सुधारणा सांगितली तर तेही रुचत नाही.. तर असा असतो

चांगलावाईट असा सख्यांचा गोड गोड पसारा.. पण जेव्हा मी प्रत्येकीतले चांगुलपण हेरत जाते तेव्हा मीच थक्क होते.. जे हिला सहजतेने जमते ते आपल्याला अजिबातच जमत नाही किंवा तिला ज्या गोष्टीत गती आहे तिथे आपली मती अजिबातच चालत नाही.. मग प्रत्येकीची अशी चांगली बाजू अभ्यासत गेल्यावर कळते की मी किती गर्भश्रीमंत आहे.. माझ्या जीवनमाळेत इतके सुंदर सुंदर मोती आहेत मग ही माळ मी जपलीच पाहिजे मनापासून.. अगदी गुणदोषांसकट.. !

लहानपणी वर्गात एक गोष्ट नेहमी कानावर पडायची.. राजाला दोन बायका असतात.. एक आवडती आणि नावडती राणी वगैरे वगैरे.. नावडतीने मीठ जरी वाढले तर राजाला अळणी वाटत असे.. आवडतीच्या हातचा बीनमिठाचा स्वयंपाक देखील राजा चवीने खात असे.. तेव्हा त्या बालवयात गोष्टीतली मेख फारशी कळत नव्हती.. आवडती विरुद्ध नावडती इतकंच काय ते कळायचे.. !आज मात्र प्रगल्भ टप्प्यावर लक्षात येते की नावडतीचे मीठ खरोखरच अळणी असते.. जी व्यक्ती आपल्या काळजातील असते तिला आपण कळतनकळत झुकते माप देत असतो.. शंभर चुकांना देखील माफ केले जाते.. उगाचच आपण त्या व्यक्तीच्या बाबतीत पक्षपाती भूमिका घेत जातो.. वेडी माया असते हे कळत

असूनही असे का होत असावे हे एक कोडेच असते.. त्या व्यक्तीची भूमिका आपण संवेदनशीलतेने समजून घेतो.. आणि जी व्यक्ती नावडती असते तिचे नावच कानफाटी असते.. तिने कितीही चांगले वागण्याचा प्रयत्न केला तरी त्यात काही ना काही खोड दिसते.. कदाचित मैत्रीतले ते आंधळे प्रेम असावे.. प्रेम डोळे उघडे ठेवून केले पाहिजे पण डोळे मिटलेलेच असतात.. असे का घडत असावे हाही एक भाबडा प्रश्नच आहे.. बाकी लोक आपल्याशी फटकून वागले तरी फरक पडत नाही पण आपल्या विशेष मर्जीतली आपली माणसे कटुपणाने वागली तर काळजाला असंख्य इंगळ्या डसतात.. आपण आपला आनंदच त्यांच्यावर सोपवून देतो.. काही व्यक्ती स्वभावाने तुटक असतात.. व्यवहारी देखील असतात ज्यांना नात्याचे मोल असतेच असे नाही.. हं तर असा असतो मैत्रीतील नात्याचा पसारा.. जो आयुष्यभर जीवापलीकडे सांभाळायचा असतो.. कारण जोडलेली माणसे नेहमीच सुखदुःखाला धावून येतात..

अशा ह्या मैत्रिणींमध्ये प्रत्येकीची मनोभूमिका वेगवेगळी असते.. ती अभ्यासायची म्हंटली तर तो एक संशोधनाचा विषय होऊ शकतो.. त्या दिवशी माझ्या उत्साही सखीकडे संक्रांतीच्या निमित्ताने हळदीकुंकू होते.. थाटमाट तर काय वर्णावा..?जणू काही

तिच्या घरात छोटेखानी पार्टी होती.. ती पण येणाऱ्या प्रत्येक सखीची दखल घेत होती.. भारलेले आनंददायी असे वातावरण होते.. दुःखाचा कुठेही लवलेश नव्हता.. कुठलीच गडद छाया नव्हती... कुणालाही तिच्या सुखाचा हेवा वाटेल इतकी सारी रेलचेल होती.. तिच्या बोलण्यात नवरोबाचे अखंड कौतुक होते.. त्याला हे असे आवडते.. असे आवडत नाही.. तो इतका रसिक आणि हौशी आहे ना की विचारूच नका.. माझ्याशिवाय तर त्याचे पान पण हलत नाही इत्यादी इत्यादी.. ऐकणाऱ्याला जरा जास्तच अजीर्ण होईल असे त्यांच्या प्रेमाचे किस्से होते.. मला तर वाटले हे सगळे ऐकवण्यासाठीच तिने सगळ्यांना घरी बोलवले असणार.. असो.. पण तिचे आनंदी असणे महत्त्वाचे होते.. अगदीच आदर्श कुटुंब आहे म्हणायचे.. असेच काही दिवसांनी काही गोष्टी वाऱ्यावरून कानावर पडल्या.. तिचा नवरा ऑफिसमधील मैत्रिणीबरोबर परागंदा झाला होता.. आता पोलिस दोघांच्या शोधात होते.. सोबत हिचे दागिने लंपास केले होते.. आता त्या उत्साही सखीची मला काळजी वाटू लागली.. हिने हा आघात कसा सहन केला असणार.?तिच्यामागे चर्चा करण्यात रस वाटेना म्हणून तिला निमित्ताने भेटले तर ती अगदी नॉर्मल गप्पा मारत होती.. पुन्हा त्याचेच गुणगान मग प्रश्न पडला की ही खरंच अनभिज्ञ असावी का..?की तिने आपल्या सुखाचे आभासी चित्र बनवले आहे आणि

त्यात ती रमली आहे.. आपले दुःख तळघरात गाडून टाकले असावे.. त्याचा काहीच तसा विषय निघाला नाही आणि मी तिथून बाहेर पडले.. तिचे फसवे भावविश्व विस्कटवण्याचा मला काहीच अधिकार नव्हता.. ती एक नावडती राणी होती जिच्या डोळ्यात खोल वेदना नक्कीच होती.. ज्याच्यावर ती मनापासून प्रेम करत होती त्याचे धवल चित्र ती रेखाटत होती.. 'तुम इतना जो मुस्कुरा रहे हो.. क्या गम है जिसको छुपा रहे हो.. ' जगजित सिंग ह्यांचा स्वर जास्तच कातर भासू लागला होता.. खरंच जगाला जे चित्र दिसते ते प्रत्यक्षात तसे असतेच असे नाही.. जगाला वाटते की किती आखीव रेखीव चौकट आहे हिच्या संसाराची पण प्रत्यक्षात ती चौकट अगदीच खिळखिळी झाली होती..

आता एखादी सखी उगाचच सुखाच्या फुशारक्या मारू लागली की सजग व्हायला होते.. असे वाटते की प्रत्यक्षातही तसेच चित्र असावे.. जणू तिच्यासाठीच शायरने हा शेर लिहिला असावा..

'हसरते के धागे जोड कर..
हम ओढनी बुनते रहे..
विरहा की हिचकी में भी हम
शहनाई को सुनते रहे.. '

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

www.esahity.com

www.esahity.in